ॐ

श्री सतपंथ संप्रदाय

स्वरूप आणि कार्य

एम् फिल् कृति प्रकल्पकर्ति
सौ. ज्योति सुरेश पाटील
जळगांव

-: प्रकाशक :-
आचार्य श्री जगन्नाथ महाराज
श्री सत्पंथी मंदीर, फैजपूर

ॐ

श्री सतपंथ संप्रदाय

स्वरुप आणि कार्य

एम् फिल् कृति प्रकल्पकर्ति

सौ. ज्योति सुरेश पाटील

जळगांव

-: प्रकाशक :-

आचार्य श्री जगन्नाथ महाराज

श्री सत्पंथी मंदीर, फैजपूर

realpatidar.com

realpatidar.com

ॐ

श्री सतपंथ संप्रदाय

स्वरुप आणि कार्य

एम् फिल् कृति प्रकल्पकर्ति
सौ. ज्योति सुरेश पाटील
जळगांव

-: प्रकाशक :-
आचार्य श्री जगन्नाथ महाराज
श्री सत्पंथी मंदीर, फैजपूर

का. स. वाणी मराठी प्रगत
अध्ययन संस्था, देवपूर–धुळे
एम्. फिल्. (मराठी) साठी तयार केलेला
कृतिप्रकल्प नियमीत अध्ययन
१९९० – ९१

कृति प्रकल्प कर्ती –
सौ. ज्योति सुरेश पाटील
जळगांव

प्रकाशक –
आचार्य श्री जगन्नाथ महाराज
श्री सतपंथी मंदीर फैजपूर
ता यावल जि जळगांव

: किंमत :
रु. १६–००


प्रथम आवृत्ती
सन १९९२

– मुद्रक –
श्री. वाय. एम. नारखेडे
यशवंत प्रि प्रेस, फैजपूर
ता. यावल जि. जळगांव


श्रीमत्सद्गुरु इमामशाह महाराज
ध्यानमूलं गुरोर्मूर्ति पूजामूलं गुरोः पदम । मन्त्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोः कृपा ॥


युग प्रमाणे अवतारने ध्यावो तो पामसे मोक्षधाम —सद्गुरु श्री इमामशाह.
मत्स्य
कलियुग
अथर्ववेद
श्री निकलंकी
बौध्द
कूर्म
वराह
कृष्ण
राम
नृसिंह
वामन
परशुराम
दसही अवतार एक करी सेवो । पात्र दुजा मन मानोरे ।। श्री सत्पंथ ज्ञानसंग्रह -
जेणे नही मान्या तेणे सबकुछ खोया । तेणे यमका फासारे ।। सद्गुरु इमामशाह कृत.

realpatidar.com



श्री सतपंथी मंदीर फैजपूर

– अनुक्रमणिका –

प्रकरण क्रमांक	प्रकरणाचे नाव	पृष्ठ क्रमांक
	प्रास्ताविक	
१	सत्पंथ संप्रदायाचा उदय	१
२	सत्पंथाचे तत्वज्ञान	२०
३	सत्पंथांचा आचारधर्म	२७
४	सत्पंथातील काही सत्पुरूष	३५
५	समारोप	७८
	परिशिष्ट	८३
	संदर्भ सूची	८६

: प्रास्ताविक :

सत्पंथाचे स्वरूप आणि कार्य हा कृतिप्रकल्प आपणास सादर करतांना मला अतिशय आनंद होत आहे.

या संप्रदायाबद्दल मी ऐकून होते व मी जेव्हा फैजपूरला गेले तेव्हा जिज्ञासेपोटी सत्पंथी मंदिर बघितले. व एकूण वातावरण पाहून मी अतिशय प्रभावित झाले. या मंदिराचे सध्याचे गुरु महाराज यांचीही भेट घेतली व त्यांचेशी बऱ्याच मुद्यांवर चर्चा केली. सत्पंथ हाही एक प्रभावी असा भक्ति संप्रदाय आहे. तो लोकांना विशेषकरून माहित नाही. खानदेशातील जे सत्पंथी लेवापाटीदार आहेत त्यांना बहिष्कृत केले होते. त्यांना बहिष्कृत कां केले. ? ह्याचाही शोध घ्यावासा वाटला. म्हणून मी सत्पंथाचा अभ्यास करायचे ठरविले.

मंदिराचे गुरु महाराज प. पु. जगन्नाथ महाराज यांचा अभ्यास सखोल व सर्वांगिण असल्यामुळे मला या चर्चेतून लाभ झाला. हा भक्तिसंप्रदाय लोकांना माहित व्हावा या उद्देशाने मी माहिती मिळविली. आजही गुजराथेत सत्पंथाचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो. परंतु महाराष्ट्रात त्याची फारशी माहीती नाही. या कृतिप्रकल्पासाठी काही साहित्य व फोटो मी मिळविले.

हा कृतिप्रकल्प सादर करतांना आदरणीय प. पु. जगन्नाथ महाराज यांनी मला काहीं फोटो दिले व बहुमोल मार्गदर्शन मिळाले या बद्दल मी त्यांची ऋणीं आहे. त्याचप्रमाणे डॉ. रमेश वरखेडे सरांनीं आम्हाला अनेक विषय सुचविले त्यातील "सत्पंथाचे स्वरूप आणि कार्य" हा विषय मीं निवडला. त्याबद्दल मीं त्यांचे आभार मानते प्रा डॉ. श. रा. राणे यांनीं कृतिप्रकल्पासाठीं मला जे साहित्य व आपले बहुमोल असे मार्गदर्शन केले त्याबद्दल मीं कृतज्ञता व्यक्त करते. तसेच श्रीं. सरोदे यांनीं कृतिंप्रकल्प वेळेत पूर्ण केल्याबद्दल त्यांचींही आभारीं आहे

तसेच ज्यांनीं ज्यांनीं मला सहकार्य केले, त्या सर्वांच्या सहकार्याशिंवाय कृतिंप्रकल्प सादर करणे अशक्य होते, त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

ॐ श्री सद्गुरवे नमः

अल्पनिवेदन

सनातन सत्पंथ संप्रदायातील ज्ञान साहित्य प्रकाशनाचे हे नववे पुष्प धर्मप्रेमी वाचकांच्या हाती देतांना मनस्वी आनंद होतो. सतपंथ साहित्य प्रकाशनाचे कार्य अंगिकारतांना प्रथम झालेला मनाचा गोंधळ व संभ्रम सद्गुरु महाराजांच्या कृपा दृष्टीने व असंख्य वाचक बंधुंच्या सहकार्य व सौजन्याने दूर झाला व उत्तरोत्तर पुष्प प्रकाशित करतांना मनाला खूप उत्साह वाटून आनंद होत आहे.

Blatantly false and misleading statement

सत्पंथ संप्रदाय वैदिक सनातन धर्मांचा एक भागच काय पण पूर्ण अंगच आहे. वैदिक सनातन धर्मांची शिकवण, भक्ति, उपासना, ज्ञान व योग पद्धतीच्या रुपाने संक्षेपाने पण संपूर्ण सार रुपाने या संप्रदायातील साहित्यात वर्णिलेले आहे. ईश्वराच्या नर्गुणनिराकार स्वरुपापासून तो इंद्र, चंद्र, सूर्य, वरुण, वायु, अग्नि, पृथ्वी आदि प्रत्यक्ष प्रगट सगुण साकार स्वरुप ईश्वरमूर्तीच्या उपासना पद्धतीचा मार्ग निरनिराळ्या साधनांनी सत्पंथाच्या साहित्यात वर्णिलेला आहे. मानवी जीवन उन्नत व समृद्ध सुखमय करुन जीवात्म्याचा उद्धार करण्यासाठी परमात्म्याची कृपा संपादन करण्यास आवश्यक असा भक्ति मार्गाचा सुद्धा त्यात विचार केलेला आहे. ईश्वराने जगत्कार्य करण्यासाठी जे वेगवेगळे अवतार विग्रह धारण केलेले आहेत त्या मत्स्यकूर्म .... रामकृष्णादि संपूर्ण अवतारांचे वर्णन अत्यंत रसाळ वाणीत वर्णन करुन, सतपंथ प्रवर्तक सद्गुरु इमामशाहांनी भक्तिमार्गाला पुष्टी देऊन प्रेमभक्ति विचार सुंदर रीतीने आपल्या साहित्यात गुंफलेला आहे. थोडक्यात

सत्पंथ म्हणजे वेद उपनिषदें गीता व भागवत या धर्म ग्रंथांचे सारसर्वस्व आहे.

अशा या सनातन मार्गाचे बरेच हस्तलिखीत ज्ञान साहित्य काळाच्या ओघात गडप झाले. अत्यंत जुन्या हस्तलिखीत पोथ्या, गीनानपदे वगैरे लिखाणांचे अवलोकन व उतारे करुन हे ज्ञानकण गोळा केलेले आहेत. त्याच यथाउपलब्ध ज्ञान साहित्यावरुन जळगांव येथील सौ. ज्योति सुरेश पाटील यांनी अभ्यास करुन, एम्. फील करिता संक्षेपाने जो प्रकल्प लिहिलेला तोच ह्या " श्री सत्पंथ संप्रदाय स्वरुप आणि कार्य " या पुस्तक रुपाने प्रसिद्ध होत आहे. त्यांच्या या अपार परिश्रमाबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहोत. त्यांच्या या प्रकल्पाचे प्रसिद्धकरण करुन जनता जनार्दनापुढे उपलब्ध करुन देण्याचा हा प्रयत्न आहे. या प्रसिद्धिकरणाचे काम आमचे फैजपूर येथील यशवंत प्रेस चे मालक व सर्व कर्मचारी मित्र यांनी अत्यंत सुंदर सुबक व आकर्षक स्वरुपात अत्यंत अल्प मुदतीत करुन दिले याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोत.

— प्रकाशक —

आचार्य श्री. जगन्नाथ महाराज

श्री सत्पंथी मंदिर फैजपूर.

प्रकरण १ ले

सत्पंथ संप्रदायाचा उदय

हिंदुधर्म हा वेदकाळापासून मानला जातो आणि वेद हे अपौरुषेय असल्याने हिंदुधर्माचा प्रणेता कोणीही विशिष्ट व्यक्ती नाही. आज जगात प्रचलित असलेल्या बहुतेक सर्वच धर्माचा काल हा वेदकालानंतरचा ठरलेला आहे. प्राचीन मान्यवर ऋषिमुनींच्या आध्यात्मिक अनुभूतीतून त्यांना स्फुरलेल्या आंतरिक प्रेरणेने मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्याकरिता लागणाऱ्या साधनांची शिकवण त्यांनी मानव समाजास शिकवली. त्या सर्वास धर्माचे स्वरुप प्राप्त झाले.

हिंदुधर्मासारख्या हिंदुस्थानातील प्रचंड धर्मात अनेक धर्मपंथ निर्माण झाले. भारतात जे अनेक धर्मसंप्रदाय निर्माण झाले त्याला वर्णाश्रम धर्मव्यवस्था विस्कळीत होणे हे एक कारण आहे. मानवी आचार धर्मातले प्रमाद महात्मा पुरुष काढून त्यांचे जीवन उन्नत करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या या प्रयत्नासच संप्रदायाचे स्वरुप येते. म्हणून सर्व संप्रदाय हे एकाच झाडाला फुटलेल्या शाखा प्रशाखा आहेत व झाडाचे मूळ सनातन वैदिक धर्मच होय. परंतु प्रत्येक मनुष्य वेगळे अस्तित्व दाखविण्याचा प्रयत्न करीत असतो. ज्याप्रमाणे फुले, फळे येतात, ती फांद्या-उपफांद्यांनाच त्या धर्मप्रचार हा या संप्रदाय स्वरुपानेच पसरत असतो.

आज जगात बरेच धर्मपंथ, संप्रदाय प्रचलित आहेत. सनातन धर्म, जैन, बौद्ध, इस्लाम, ख्रिश्चन, कॅथालिक, यहुदी वगैरे अनेक धर्म, वैष्णव, शैव शाक्त, ब्रम्हच वगैरे अनेक देवतां-

False statement Founders of almost all religions claim that they were in existence since infinity. But that is not always true.

च्या उपासनेवरुन ते ते पंथ निर्माण झाले. त्या प्रत्येक पंथामधून आणखी अनेक उपपंथ निर्माण झाले. वारकरी, नाथ, महानुभव, स्वामिनारायण, प्रणामी असे उपपंथ निर्माण होऊन प्रत्येकाने वेगवेगळ्या साधनांनी इश्वरोपासना करण्याचे ध्येय ठरवून साधना केल्या तेव हे वेगवेगळ्या संप्रदाय रुपाने जन्माला आले. 'सत्पंथ' हा त्यातलाच एक विशेषत्वाने वेगळे स्वरुप धारण केलेला संप्रदाय आहे. भागवत धर्मातील वैष्णव मार्गाची उपासना करावयास शिकविणारा हा संप्रदाय आहे. पण त्यास वेगळे स्वरुप (वैशिष्ठ्य) कशामुळे प्राप्त झाले आहे हे पाहायचे आहे.

सत्पंथ संप्रदायाचे प्रवर्तक सत्पंथाच्या निर्मिती विषयी माहिती देतांना सांगतात की, हा सत्पंथ आजकालचा किंवा शे पाचशे हजार वर्षाचा नसून अनादि काळापासूनचा आहे. मी काहीही नवीन सांगितले नसून मूळ सनातन युगधर्माला उजाळा दिलेला आहे.

चंद्र, सूर्य, ग्रह, नक्षत्र, तारे, पृथ्वी नव्हती तेव्हा एक अविनाशी सत्-चित्-आनंद स्वरुप आपल्याच स्वरुप ध्यानात मग्न तेजोराशी चैतन्यरुप प्रकाशाने विलसत होते त्यानेच संकल्पमात्राने अनादि प्रकृति, सत्वरजतमात्मक मायाशक्ती निर्माण करुन तिच्या पासून पंचमहाभूतांची, पंचप्राण, पंचज्ञानेंद्रिये, पंचकर्मेन्द्रिये, मन, बुद्धि, चित्त, अहंकार महत्तत्वादि प्रकृति निर्माण झाली. अशा प्रकारे या साऱ्या चित् जड वस्तूमात्रांची उत्पत्ती एकमेव सत्चित् अविनाशी ब्रह्मापासून झालेली आहे.

सदेव सोम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीय

छांदोग्य /६/२/१/

हे सौम्य ! आरंभी हे एकमात्र अद्वितीय सत्च होते. सर्वांचे

मूळकारण सत्च आहे. तेच परमआश्रय आणि अधिष्ठान आहे. ज्याप्रमाणे अत्यंत सूक्ष्म सत् आत्मा या समस्त स्थूल जगताचा आधार आहे अशा त्या अविनाशी सूक्ष्म महान सत्‌ला जाणण्याचा जो मार्ग त्यासच इमामशहांनी "सत्पंथ" हे नाव दिलेले आहे.

Imamshah gave the name as Satpanth

सत्पंथ धर्म सो कहिये, जेणे ओळख्या सत्गुरु नुर रे ।
परिब्रह्मा विष्णुने ओळख्या, ते तो अमर हुवा ततखेवरे ॥
— गुरुवाणी

परब्रह्म परमात्म्याच्या स्वरुपाची जाणीव करुन घेऊन जो त्याच्या ध्यान चिंतनाने सद्रुप-तत्रुप होऊन जातो तोच मुक्त होतो.

योगवाणी शास्त्रात योगी लोकांना उपदेश करतांना सद्गुरु इमामशहा महाराजांनी त्यांना सांगितले आहे की, "पुराणपुरूष परमात्म्याची प्राप्ती ज्या साधनांनी होऊ शकते त्यापैकी प्रमुख साधन म्हणजे आत्मशुद्धी होय, आत्मशुद्धी नसलेल्या साधकास त्याची प्राप्ती होऊ शकत नाही." सत्यच विजयी होते, असत्य नव्हे. परमात्मा सत्यस्वरुप आहे म्हणून त्याच्या प्राप्तीसाठी मनुष्याने सत्याचीच कास धरावी. बुद्धीमान मनुष्य सत्यभाषण आणि सदाचारालाच सर्वश्रेष्ठ मानतो, असत्याला नाही. कारण की, ज्यांची भोग वासना नष्ट झालेली आहे असे पूर्णकाम वितराग ऋषीमुनीगण ज्या मार्गाने आचरण करुन त्या परमनिधान पूर्ण-ब्रह्म परमात्म्यास प्राप्त करुन घेतात तोच हा देवयान मार्ग, अच्युतपथ वा निर्वाणपदाचा रस्ता आहे.

These are mentioned in Vedas and Upanishads. Falsely crediting to Imamshah

इमामशहा महाराज म्हणतात "अहं ब्रह्मास्मि", "शिवः केवलोऽहम्" माझा आत्मा हाच गुरु, मन हे प्रधान, शक्ती हीच माझी माता व निरंजन हाच पिता, प्रणव ब्रह्म हाच माझा देव

अशा या माझ्या कायापुरी केवळ प्रारब्ध कार्याचे खेळ खेळण्याकरिता मी या जगतात आलेलो आहे. ही स्वरुपस्थिती हे योग्यांनो तुम्ही पहा व या मार्गाचे आचरण करुन मुक्त व्हा. हाच मार्ग इमामशहा महाराजांनी दिग्दर्शित केलेला आहे.

अशा अनेक प्रमाणांनी हेच सिद्ध होते की, सद्गुरु इमामशहा महाराजांनी सत्पंथ ह्या सनातन वैदिक धर्माचेच व मुक्तीमार्गाचेच दिग्दर्शन केलेले आहे. त्यांनी जो योगमार्ग आपल्या सद्भक्तांना शिकवविलेला आहे तो अप्रतिम आहे. मनुष्याने आपला गृहस्थाश्रम सांभाळून या योगमार्गाचे आचरण करुन जीवन नौका भवसागराच्या पार न्यायला हवी आहे आणि ती जीवन नौका सद्गुरुला नावाडी केल्यासच पार जाईल. अन्यथा षड्विकारांच्या आवर्तनात कोठे गोते खाऊन नष्ट, भ्रष्ट होईल तर त्याचा थांग पत्तासुद्धा लागणार नाही.

सत्पंथाच्या आचरणाने व सद्गुरु महाराजांच्या कृपादृष्टीने सत्साधक पंचकोशांचे आवरण भेदून परमानंद स्वरुपात विलीन होऊन जातो. अर्थात सत्पंथाचे आचरण करणेच फार अवघड आहे.

मोक्ष मार्ग दोहेला, चलना खंडाधार ।
सुळी उपर खेलना, कोई खेले खेलनहार ।
इळ भ्रमरी, पठंतरो, लई मंदरमा जाय ।
भ्रमरी चटको इळ खमे, तो आपसमाना थाय ।

— अमृतवाणी

अळी-भ्रमरीच्या दृष्टांतावरुन सद्गुरु महाराजांनी सत्पंथ-मोक्ष-मार्गाचे आचरण कसे करावे याचे स्पष्टीकरण केलेले आहे. तनमनाच्या उच्छृंखल वृत्त्या विसरुन सतत एकाग्रतेने एकमेव ईश्वराचे ध्यान केल्यास साधकास लवकर तद्रुप होता येते.

ब्रह्माकारवृत्ती ब्रह्म जाणल्यावाचून कशी होऊ शकेल ? आणि ते ब्रह्म जाणण्यास ज्या ज्ञानरुप साधनाची गरज असते ते " सत् " ज्ञान अनुभवी गुरुवाचून होणे कदापि शक्य नाही. श्रवण, मनन, निदिध्यास आणि आत्मचिंतन हेच ते ज्ञान प्राप्तीचे साधन आहे. सत्पंथ मार्गाचे विशेष स्पष्टीकरण करतांना सद्गुरु इमामशहांनी म्हटलेले आहे की,

"सतपंथाचे मूळस्थान -- जन्मस्थान सत् (निर्गुण निराकार परब्रह्म स्वरुप) होय. या सत् च्या आधारानेंच हे अखिल विश्व ब्रह्मांड उभारले गेले. सत् हे चिरकालाबाधित निरुपमेय एकमेवाद्वितीय ब्रह्म होय. त्या सगुण साकार–निर्गुण निराकार ईश्वराची नारायण रुपाने मूर्ती कल्पिल्यास सत् हे त्याचे शिरकमल म्हणजे तालू होय त्याची जीभ हेच स्हेहभाव व प्रेम निर्विषयी–निरिच्छ प्रेम होय. गुरुनराचे स्मरण-ध्यान-चिंतन हे त्या सत् नारायणाचे नाक होय. क्षमा आणि दया हे त्याचे दोन डोळे होत. सद्गुण आणि धारणा हे त्याचे कान होय. जप म्हणजे नामस्मरण - नाम चिंतन व तप म्हणजे संयम हे त्याचे श्वास व उच्छ्वास होत. सच्चिदानंद नारायणाचा देह म्हणजे धर्म होय. दान (निरहंकार बुद्धीने त्याग), दया (प्राणी मात्रांचे भरण पोषण व संरक्षण संगोपन करणे), तपश्चर्या (इंद्रियदमन व आत्मनिग्रह करणे) व शुचिर्भूतता (अंतर्बाह्य पावित्र्य) हे त्या धर्मरुप ईश्वराचे चार पाय आहेत. त्या देवाचे मन ज्ञान विज्ञान-आत्मज्ञान हे होय. विवेक व विचार ही देवाची वृत्ती आहे. संतोष हे देवाचे स्वरुप होय. देहात्मबुद्धिचा त्याग हेच दान हा देवाचा आहार होय. आकाशमंडळ हे देवाचे मुख तर पाताळ हे पाय होत. (आकाशी पाताळी तो एकमेव परमेश्वर भरुन उरलेला आहे) देवास काळ (जन्म जरा मृत्यू व्याधि) निद्रा वगैरे काहीही नाही. मनुष्याने त्याची मनोमन (मानसिक) पूजा करावी म्हणजे तो परमात्मा प्रसन्न

होऊन तुम्हास दर्शन देईल. त्यायोगे तुमचे जन्ममरणाचे बंध तुटतील व अविनाशी परम सुखात सत् चित् आनंद स्वरुपात निमग्न व्हाल. अशा प्रकारच्या दिव्य अविनाशी असा हा सत्पंथ मार्ग आहे. त्याची सेवा करीत करीत जीवात्मा भवसागर पार उतरून जातो. आजपर्यंत अनेकाकने सदभक्त याच मूळ सनातन मार्गांची सेवा करीत करीत मुक्त झाले आहेत. जेथे कलशस्थापना होईल व त्याच्या पूजा अर्चनेकरिता गत्‌गंगा एकत्र येईल, सत्संग करतील, तेथे गुरुचरणामृत वचनामृत पान करा. कारण, त्याच्याने सर्व पाप प्रायश्चित्ते हरले जातात व जीवात्म्याच्या चित्तात निर्मल विशुद्ध आत्मज्ञान जागृत होते. त्यायोगे तो जीवात्मा अपार अपरिमित असे अमर पदाचेसुख प्राप्त करुन घेतो. तो जीवात्मा अजर अमर असे सच्चिदानंद स्वरुप मोक्षसुख अनुभवतो. अशा प्रकारचा हा अमरपद प्राप्तीचा-मुक्तीचा मार्ग सद्‌गुरु इमामशहा महाराजांनी सत्पंथी अनुयायास दर्शविलेला आहे. त्यांनी एका पदात म्हटले आहे की,

आ सत्पंथ सेवो सत् भावसु, असे मलीया ते सत्‌गुरु ब्रह्मा ।
जेणे दर्शन किधा गत तिर्थना, तेना वैकुंठ पोता जीव ।।

— गुरुवाणी

जीवनमुक्तीचा लाभ झाल्याशिवाय जीवात्मा अमर होत नाही व आत्मज्ञानाची पूर्ण अनुभूती आल्या शिवाय जीवात्मा मुक्त होत नाही. जीवनमुक्तीचा लाभ घडविणाऱ्या मुमुक्षुस अपरिमित ज्ञान साधना, सत्संग, गुरुसेवा करावी लागते. मन उन्मन करुन प्रेमधन ईश्वरी स्वरुपात लावावे लागते. बुद्धि स्थिर करुन सतत आत्मचिंतन, वैराग्यविचार जागृत ठेवावे लागतात. तेव्हाच जीवात्म्याचे मन शांत व स्थिर होते व तो मोक्ष साधनाच्या एकेक पायऱ्या चढून मोक्षमंदिर गाठू शकतो.

अशा या दिव्य अमरत्वाच्या मार्गात मूर्तीपूजा, प्रतिकोपासना अन्योन्य देवदेवतांच्या उपासना साधारण कर्मकांड हे सर्व गौण मानले आहे. ती सर्व साधने सत्पंथात नाहीत असे नाही, पण त्यास गौणत्व मानलेले असल्याने प्राधान्यभूत नाही. कित्येक लोक याच अनुषंगाने सत्पंथाविषयी गैरसमज करुन घेतात. कित्येक लोक सत्पंथ शास्त्रातील उद्धरणे घेऊनच सत्पंथ प्रवर्तक इमामशहाना मूर्तीपूजा मान्य नाही असे प्रतिपादन करतात. उदा-

" पाषाणनी पूजा करवी नही । "
" जुवो जुवो पंडिता वेदपुराण,
किये अवतार हरी होते पाषाण । "
" पाणी पथ्थर पूजे नही पामे मोक्ष । "

वगैरे पदावरुन स्पष्टपणे शब्दशः अर्थ तर होतो की, सद्गुरु इमामशहांना मूर्तीपूजा अभिप्रेत नाही. पण वस्तुतः ज्या महात्म्याने आपल्या ज्ञानपद संग्रहात ही पदे सांगितली आहेत, त्यातच त्यांनी म्हटलेले आहे की, सद्गुरु इमामशाह महाराजांनी मूर्तीपूजेचा निषेध केलेला नाही. संत रामदास, संत कबीर, संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज वगैरे अनेक संतांनी ठिकठिकाणी आपल्या वाङमयातून मूर्तीपूजे विषयी कडाडून टिका केलेली आहे त्याचा अर्थ असा नाही की, त्यांनी मूर्तीपूजेचा निषेध केलेला आहे पण समाजातून मूर्तीपूजेत अथवा प्रतिकोपासनेत जे अवास्तव स्तोभ माजविण्यात येते, त्यामुळे त्यांचे विचार थोटे व संकुचित होतात. तो अंधश्रद्धेला बळी पडतो. मूर्तीपूजेच्या समयी कोणताही उपासक आपले पूजा नैवद्यादि उपचार या दगडास अथवा धातूस अर्पण करीत आहे असे तर समजत नाही. पण या ईश्वरी स्वरुपाला मी हे सर्व अर्पण करीत आहे याच भावनेतून श्रद्धेने सर्व उपचार

अर्पण करतो. म्हणजे त्यामूर्तीच्या ठिकाणी उपासकास ईश्वरी भावना कल्पावी लागते.

सत्पंथ संप्रदायात सद्गुरु इमामशाह महाराजांनी प्रणव ब्रह्माचे स्मरण–चिंतन, ज्योतींचे ध्यान, कलशपूजन व दशअवतार उपासना ह्या प्रमुख तत्वांना प्राधान्य दिलेले आहे.

प्रणव ब्रह्माचे स्वरुप स्वयं ज्योतीरुप असल्याने तसेच आत्म-ज्योतीस्वरुप भगवंताचे ध्यान करण्याचे माध्यम ज्योत, तेज, सूर्य, तारे, असेच असल्याने ज्योतीचे ध्यान सत्पंथ संप्रदायात प्रामुख्याने सांगितलेले आहे. ते निर्मल अवयवरहित परब्रह्म प्रकाशमय परम-कोशात विराजमान आहे ते सर्वथा विशुद्ध ज्योतींचीही ज्योती आहे. तिला आत्मज्ञानीच फक्त जाणतात. तेथे त्या ब्रह्मास सूर्य प्रकाशू शकत नाही. अथवा तारांगण अथवा विद्युतसुद्धा प्रकाशवू शकत नाही, तर मग अग्नीची तेथे काय कथा ? कारण की, त्या ब्रह्माच्या प्रकाशानेच संपूर्ण जगत प्रकाशित होत असते. ह्या शरीरांतर्गत हृदयात विराजमान ज्योतीस्वरुप परम विशुद्ध परमात्मा निःसंदेह सत्यभाषण तप व ब्रह्मचर्यपूर्वक यथार्थ ज्ञानानेच सदैव प्राप्त होणारा आहे. त्यास सर्व प्रकारच्या दोषानी रहित असलेला यत्नशील साधकच पाहू शकतो.

प्रणव ब्रह्माच्या चिंतनाबरोबर ज्योतीस्वरुप परब्रह्माचे ध्यान करणे सत्पंथ संप्रदायात प्राधान्यभूत गणले आहे. सत्पंथ घटपाट पूजा विधीच्या समयी शुद्ध घृताच्या तीन ज्योती, ब्रह्मा, विष्णू, महेश्वराच्या प्रतिकात्मक लावून त्यांचे एकरुपतेचे ध्यान करणे ही निर्गुण निराकाराची उपासना होय. या संप्रदायाची महत्वाची उपासना साधना होय. या संप्रदायात कलश घटपाट पूजा ही सुद्धा एक उपासना पद्धती आहे.

कलशपूजा म्हणजे सर्व देवतांच्या उपासनेचे साधन होय. मंत्रोपचाराने सर्व देवदेवतांना आवाहन, पूजन, अर्चन, वंदन करुन नैवेद्य समर्पण करुन त्यांचे ध्यान चिंतन स्मरण केले जाते, अर्थात मूर्तीपूजेप्रमाणे हे कलशपूजन प्रतिकोपासनाच होय, पण तद्वारा कोणत्याही ऐच्छिक देवतास्वरुपाचे आराधन करुन इप्सित हेतू पूर्ण करता येतो. अनादि काळापासून हे कलश पूजन यज्ञविधी चालत आलेले आहे. कलश घटपाट म्हणजे ब्रह्मा विष्णू महेश आद्यशक्ति व आद्यनारायण या सत्पंथ पंचायतनाची पूजा असा सत्पंथ संप्रदायाचा संकेत आहे.

सद्गुरु इमामशाह महाराजांनी युगधर्मानुसार वेगवेगळ्या युगातील वेगवेगळ्या उपासना पद्धती सांगितलेल्या आहेत. "मूळ स्तंभ" या फार जुन्या ग्रंथातसुद्धा युगधर्माची माहिती दिलेली आहे. त्याशी पडताळून पाहता इमामशहांनी दर्शविलेली युगधर्म परंपरेनुसार जुळत असल्याचे आढळून येते.

सत्ययुगाचा युगधर्म असा युगपुरुष ब्रह्मदेव, ऋगवेद प्राधान्य भूत, उत्तरदिशा ध्यानगम्य सुवर्ण घटपाट, कलशपूजा, अवतार च र - मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंह.

त्रेतायुगात युगपुरुष वशिष्टमुनि, प्राधान्यभूत वेद–यजुर्वेद, पूर्वदिशा पूजनीय, ध्यानकर्मास श्रेष्ठ. रुप्याच्या घटपाटाची कलश पूजा, उपासना, अवतार पात्र तीन–वामन, परशुराम व श्रीराम.

द्वापार युगात प्राधान्यभूत वेद–सामवेद, युगपुरुष वेदमूर्ती व्यास. दक्षिण दिशा पूजनीय. तांब्याच्या घटपाटाची कलशपूजा उपासना अवतार पात्र दोन–श्रीकृष्ण व बौद्ध.

कलियुगात प्राधान्य भूत वेद अथर्ववेद, पश्चिम दिशा

पूजनीय, ध्यान करण्यास श्रेष्ठ. मातीचा घटपाट कलशपूजा, उपासना. अवतार पात्र एकच श्री निष्कलंकी नारायण.

युगधर्मानुसार सद्‌गुरु इमामशाहांनी अथर्ववेदास प्राधान्य दिलेले आहे. अर्थात सत्‌पंथ घटपाट—कलश—पूजाविधी मंत्र हे अथर्ववेदाच्या अनुरोधाने तयार केलेले आहेत. असा उल्लेख सत्‌पंथ साहित्यात आढळतो. अथर्ववेद व त्याच्या उपनिषदांना आधारभूत मानून सद्‌गुरु इमामशाहांनी केलेल्या चेतावणी, गुरुवाणी, योगवाणी वगैरे अनेक तत्वग्रंथावरुन हे स्पष्ट दिसून येते.

सत्‌पंथ प्रवर्तक सद्‌गुरु इमामशहांनी अथर्ववेद आणि त्याचे ज्ञानगम्य उपनिषद ग्रंथ प्रमाणभूत-आधारभूत मानलेले आहेत. अथर्ववेदात व उपनिषदात सत्‌पंथाचा स्पष्ट उल्लेख जरी नसला तरी पण देवयान मार्ग, आत्मज्ञान योगमार्ग अथवा मुक्तीमार्गाचा उल्लेख तर स्पष्टच आढळतो. अर्थात त्या मार्गाचे अवलंबन करुन लक्षचौऱ्यांशीचे फेरे मिटवून जीवात्मा स्वयंप्रकाश आत्मस्वरुप ओळखू शकतो व स्मरण चिंतन ध्यानाने त्या स्वरुपात लीन होऊ शकतो. तीच ब्रह्मविद्येची क्रिया सद्‌गुरु इमामशहांनी सत्‌पंथ ज्ञान साहित्यात निवेदन केलेली आहे. असा ब्रह्मविद्येने ओतप्रोत भरलेला हा अथर्ववेद युगधर्मानुसार कलियुगात प्राधान्यभूत आहे. त्यातील कुंभ कलश घटपाट म्हणजे वरुणयज्ञ जलयज्ञ इमामशहांनी स्विकारुन त्याद्वारे मूळ सत् चित् आनन्द धन ईश्वराची उपासना व अन्योन्य देवदेवतांचे पूजन, अर्चन, नमन, नैवेद्यसमर्पण वंदन व तद्वारा त्यांचा कृपाशिर्वाद ग्रहण करण्याचे साधन सत्‌पंथ पूजाविधीद्वारा दिग्दर्शित केलेले आहे.

श्री निकलंकी गीता, चिद्‌विचार, श्रीदेवी नारायण संवाद, ब्रह्म प्रकाश, गुरुवाणी, योगवाणी वगैरे अनेक ग्रंथात कथन केलेला

हा योगमार्ग अथवा ब्रह्मविद्या प्राप्तीचा मार्ग सद्गुरु इमामशहांनी अथर्ववेद व त्याच्या उपनिषदांना प्राधान्यभूत मानून या सत्पंथाची रचना केलेली आहे.

सत्पंथाची शिकवण :

१) शुद्धबुद्धीचा उपयोग करुन कर्मे करणे, हृदय निर्मल पवित्र ठेवणे.

२) अंतरबाह्य मलिनतेचा त्याग, दयामय अंतःकरणाचे अवलंबन करणे, सद्विचार सतत जागृत ठेवून अमूल्य मानव जन्माचे सार्थक करणे.

३) दया, क्षमा, यथाशक्ति दान व यथालाभ संतोष याने आपले अंतःकरण आरशाप्रमाणे निर्मळ स्वच्छ करुन आत्मप्रकाश त्यात पहावा.

४) सत्पंथ सत्यधर्माचे आचरण करुन जीवनमुक्ती मिळवावी व त्यायोगे अमरपदाचे-आत्मानंदाचे सुख अनुभवावे.

५) शरीर हे नाशवंत आहे, जीवन हे दीर्घ स्वप्न आहे, जगत नाटच आहे.

६) अविद्या-अंधपणाचा त्याग करावा, ज्ञानदृष्टीचा अवलंब करावा, काम, क्रोध, मत्सर यांना थारा देऊ नका

७) सदैव सद्गुरुंचा-अनुभवी गुरुंचा दासानुदास होऊन वागा त्यांचा अनुग्रह प्राप्त करुन हे ज्ञान आत्मसात करा. त्यायोगे आपला व आपल्या एकशे एक पिढ्यांचासुद्धा उद्धार होईल.

These points are nothing but simple logic. Anybody without religious background would know them. Nothing great about it.

This is the key by which the gurus exercise authority on disciples and fully control the sect.

अशा प्रकारचा अमरपदाचा अमरमार्ग अस्थिर-चंचल अशा

मनास स्थिर करणाऱ्या साधना शिकविणाऱ्या अथर्ववेदावरुन इमामशहांनी उपदेशिलेला आहे.

कलियुगाच्या युगधर्माची शिकवण देतांना इमामशहांनी घटपाट स्थापनेचे एका मंत्रात म्हटले आहे की, हे स्थूल शरीर पृथ्वी तत्वाच्या आधिक्याने बनलेले आहे. युगधर्मानुसार पृथ्वीतत्व या शरीरात अधिक प्रमाणाने आहे. सत्ययुगात वायुतत्व अधिक म्हणून प्रेतसंस्कार वनदागाने होत असे, त्रेता युगात जलतत्व अधिक म्हणून प्रेतसंस्कार जलदागाने होई, द्वापारयुगात तेज तत्व अधिक म्हणून अग्निदाग दिला जाई व कलियुगात पृथ्वीतत्व अधिक म्हणून प्रेतसंस्काराच्या क्रिया दफन पद्धतीने कराव्या म्हणजे भूमीदाग करावा हे चारही वैदिक प्रथेवरुन प्रचलित आहेत म्हणून सद्गुरु इमामशहांनी युगधर्मानुसार प्रेतास भूमीदाग देण्याची आज्ञा केलेली आहे.

सत्पंथाचा प्रचार का झाला नाही !

सत्पंथ हा इमामशहांनी दिग्दर्शित केलेला आनादि काळा पासून प्रचलित असलेला युगधर्मानुसार बाह्यस्वरुपात बदल झालेला पण अंतरंग रुपाने मूळ सनातन वैदिक धर्माचाच एक भाग, शाखा आहे. देश काळ, वातावरण, परिस्थितीनुसार धर्माचे बाह्यरंग बदलत असते. सत्पंथात निर्गुण निराकाराची उपासना, दशावतारांची उपासना, शुक्रवार चंद्र दर्शनाचे व्रत, उपवास करणे, भूमीदाग करणे वगैरे अनेक अनेक प्रथांचे मूलतः समालोचन न झाल्याने व विधर्मी लोकांनी सत्पंथी संप्रदायाच्या अनुयायांवर केलेल्या अत्याचाराने या संप्रदायाचा पाहिजे तसा प्रचार होऊ शकला नाही.

This is blatantly wrong statement. Muslim rulers like Aurangzeb have donated land and money. Muhammad Begada married his daughter etc. They have always supported Pirana because of Imamshah.

तथाकथित हिंदुधर्मीयांनीसुद्धा अनेक अनिष्ट रुढींना जोपासून व अन्योन्य देवीदेवतांच्या आसूरी उपासनांना सामाजिक रुढीत अग्रगण्य स्थान देऊन सत्पंथासारख्या सत् उपासकांची ते केवळ इमामशाह प्रणित मार्गाचे आचरण करतात म्हणून वेळोवेळी त्यांची अवहेलना केली, त्यांना बाटलेले मुसलमान समजून विटंबना केली. अर्धदग्ध धर्म पाळतात, विधर्मी यांच्या धर्माचे आलंबन करतात असे समजून त्यांना अतोनात छळले, वाळीत टाकले, हुटकले, दंड आकारले व धर्माचा त्याग करायला भाग पाडले. सत्पंथी अनुयायांवर अनेकानेक घाणेरडे व ओंगळ स्वरुपाचे आरोप करुन त्यांच्याशी रोटी–बेटी व्यवहार बंद करुन त्यांची मानहानी करण्याचा प्रयत्न केला पण एवढा खटाटोप करुनही निष्पन्न काहीच निघाले नाही. शांत आणि निर्विकार वृत्तीने राहून व केवळ गुरुंची शिकवण शिरसावंद्य मानून सत्पंथी अनुयायांनी कालक्रमणा केली. त्यांनी कोणत्याही विवाद्य विषयाला बळी न पडता आपल्या जीवनाला–विचारांना प्रक्षुब्ध होऊ दिले नाही.

This is false statement. Exceptionally large breakaway group of satpanthis have converted to Hinduism in Kutch, Saurashtra, Gujarat, Kathiawad, Khandesh and MadhyaPradesh.

या पंथाचे अनुयायी बहुसंख्येने आहेत. कित्येक ठिकाणी गुप्तरितीने हा पंथ पाळण्याची अंधपरंपरा आहे. या पंथाच्या अनुयायांनी साहित्य विकासात फारसे लक्ष घातले नाही परंतु जुन्या काळचे लोक इमामशाहांची भजने म्हणजे ज्ञानपदे मुखपाठ करीत असत. त्यांनी ही ज्ञानपदे शद्धरुपाने कागदावर उतरविण्याला फारसे महत्वच दिले नाही. उलट ते ज्ञान अश्रद्धाळू माणसाच्या हातात गेल्यास त्याचे विडंबन होईल असे ते मानीत असत. म्हणून या पंथाचा योग्य तो साहित्यीक विकास आढळत नाही. या संप्रदायाच्या विकासास सर्वच विभागातून फार मोठा प्रतिबंध झाला. यास प्रमुख कारण म्हणजे संप्रदायाचे प्रवर्तक जातीने सैय्यद ते वैदिक धर्माबद्दल काय सांगू शकतील. हा केवळ वरुन देखावा

Gupt = Hidden
This is in line of Islamic Taqiyya.
Like in love jihad, typically a muslim boy would hide (gupt) his islamic identity and inturn would keep Hindu name/identity with indention to trap a hindu girl to marry him.

अश्रद्धाळु = Unbelivers

How can this be true in case of genuine religion?

Imamshah came from Muslim Saiyed family

आहे आतून तर इस्लाम धर्माचा प्रचार असावा हा संभ्रम व ते मुसलमान जातीचे असूनही हिंदू धर्माचा उदो उदो का करतात ? म्हणून मोगलांनी त्यांना छळले. त्यांचे तत्व ध्येय, त्यांची पात्रता, योग्यता, ज्ञान वगैरे सर्वांविषयी दुर्लक्ष होऊन दोनही बाजूंनी उपेक्षा त्यांना पत्करावी लागली. समाजातील उच्चश्रु लोकांनीसुद्धा त्यांच्या ज्ञानमार्गाची उपेक्षाच केली. त्याकाळात सद्गुरु इमाम शाहांविषयी दैवी विभूती एवढ्या मर्यादेतच पाहण्याचा त्या समाजाचा दृष्टीकोण असल्याने त्यांच्या सेवेने व कृपेने आपण सुखी होऊ एवढ्याच भावनेतून ते त्यांच्या संप्रदायात सामील झाले. पण मुसलमान गुरुवा अनुग्रह घेतला म्हणून इतर समाजबांधवांनी त्यांचा तिरस्कार करुन अवहेलना केली. त्यामुळे सत्पंथी अनुयायी वर्ग सामाजिक कार्यक्रमामधून अलिप्त राहू लागला. हेच वैगुण्य कालांतराने दृढमूल झाले म्हणून सत्पंथ संप्रदायाचा पाहिजे तसा उत्कर्ष होऊ शकला नाही.

खानदेशातील या सत्पंथी समाजास ज्ञातीबांधवांशी खूप मोठ्या प्रमाणात तोंड द्यावे लागले. रोटी-बेटी व्यवहारात अनेक प्रकारचा विरोध व अपमान सहन करावा लागला. सत्पंथ संप्रदाय वेदान्तर्गत आहे किंवा वेदबाह्य आहे असे अनेकानेक प्रश्न, शंका-कुशंका उपस्थित होऊन त्यात सत्पंथाची नाव वेदान्तर्गताच्या किनाऱ्यास लागली. श्रीमत शंकराचार्यांकडून सत्पंथ संप्रदाय वेदान्तर्गत असल्याचे मान्यतापत्र मिळवून शेवटी सत्पंथीयांना जातीत सामावून घेतले. त्यात सत्पंथीयांचे ब्रेच श्रम, द्रव्य व शक्ती वाया गेली व त्यामुळे संप्रदायाचा सांस्कृतिक, वाङ्मयीन अभ्यास होऊ शकला नाही.

सत्पंथाच्या अनुयायांमध्ये सर्व हिंदू लोकच असून त्यात लेवा-कडवा-पाटीदार, मराठा गुजर, राजपूत, भावसार, माळी,

This again is a blatantly false statement

This means the author clearly says that Imamshah was a muslim guru

This is completely false statement. Shankaracharya has actually certified that Satpanth is not a vedic religion. The author is giving false information

बारी, कासार, सोनार,राणा, काछीया, कोळी, रबारी वगैरे अनेक जाती उपजातींचा समावेश आहे. कच्छ, सौराष्ट्र, भावनगर खंबात, उत्तर गुजराथ, सांबरकाठा, दक्षिण गुजराथ, काठा विभाग महाराष्ट्रातील जळगांव, धुळे जिल्हा (पूर्व व पश्चिम खान्देश) मध्यप्रदेशातील निमाड विभाग, बनासकाठा, विदर्भात आकोट, अंजन वगैरे भागात या पंथाचे अनुयायी बरेच आहेत.

This statement is misleading. The true picture is that this sect is mainly followed by Kutch Kadva Patidar community, which is the governing community. People from other community do come, but in very-very limited number.

पीराणा हे या पंथीयांचे मुख्य पवित्रधाम आहे. गुजरात मध्ये भामाराम (देवा), कीकीबाई (रुण) नायकाका (कुकस) ही या पंथीयांची मुख्य धर्मस्थाने आहेत. त्याशिवाय भावनगर, अंगिया कादिया, खंबात, आवाखल, सुरत, वडाली वगैरे अनेक गावी सत्पंथाची बरीच मंदिरे आहेत. प्रत्येक ठिकाणी स्थानिक लोक त्याला अत्यंत भक्तिभावाने मान देतात. परंतु ज्ञान प्रचाराचे कार्य त्या ठिकाणी काहीही पाहण्यात येत नाही. भारतभर सर्वच सत्पंथी मंदीरांमध्ये नित्यपाठ, दर्शन, सत्संग, पुजापाठ करतात पण इमामशहांचा मुख्य हेतु जो ज्ञान प्रसार तो मात्र आढळत नाही कारण शिक्षित समाज त्यात भाग घेत नाही.

How can this be true? Such statements are generally made with the intent to spread lies and false narrative.

या संप्रदायाची सविस्तर माहिती फक्त खान्देशातील "फैजपूर" या गावी सुमारे ३०० वर्षापासून जुन्या असलेल्या मंदीरात मिळू शकते. सत्पंथाचे रक्षण याच ठिकाणी झाल्याचे आढळून येते. या मंदीरात सत्पंथाचे जे मूळ स्वरुप अस्तित्वात आहे. तसे अन्यत्र कोठेही नाही. त्याचे कारण या पंथावर व पंथीय वाड्मयावर गुजरातमध्ये जे भरगच्च मुसलमानी हल्ले झालेत तसे खान्देशात आणि त्यातल्या त्यात फैजपूरच्या परिसरात मूळीच झालेले नाहीत म्हणून या पंथाचे व साहित्याचे रक्षण मूळ स्वरुपात येथे आढळते.

Completely false statement.
Further the Kutch area has never been ruled by any muslim. But there also religious books of Satpanth were of muslim religion

खान्देशातील लेवा पार्टीदार लोकांमध्ये फक्त चार पंथ प्रचलित आहेत. १) सत्पंथ २) स्वामीनारायण ३) वारकरी ४) महानुभाव पंथ या पैकी महानुभाव व वारकरी हे महाराष्ट्रात मूळचेच चालू होते. परंतु स्वामी नारायण आणि सत्पंथ हे दोन पंथ मात्र गुजराथ मधून या लोकांनी बरोबर आणलेत. कारण स्वामिनारायणाचे मूळस्थान हे वडताल या गावी गुजरातमध्ये आहे आणि सत्पंथीयांचे मूळस्थान अहमदाबाद जवळ ११ मैलावर पीराणा या गावी आहे.

सत्पथाची सुरुवात पाहू गेले असता, इमामशाह व त्यांच्या काळा पासून बरेच मागे जावे लागेल. काही पुस्तकांच्या मताप्रमाणे पीरशमसच्या नंतर पीर सदरुद्दीन पासून जे लोक इस्लामी धर्माच्या प्रचारासाठी हिंदुस्थानात आलेत. त्यांनी त्यांच्या धर्म प्रसाराच्या विशिष्ट पद्धतीला सत्पंथ नाव दिल्याचे आढळून येते. काहींच्या मते नवसारीचे नुर सत्गुरु यांनी सत्पंथाला सुरुवात केली असे आहे तर काही सत्गुरु हेच इमामशाह असा दावा करतात. एकंदरीत माहितीवरुन सत्पंथ हिंदुस्थानात चालू झाल्याला एक हजार वर्षाचा कालावधी आढळून येतो आणि त्यांच्याच मालीकेतील इमामशहा यांनी इस्लामी धर्म प्रचारकांच्या अनिर्बंध वागणूकीला कंटाळुन स्वतःचा स्वतंत्र प्रचार चालू केला. इमामशाहा महाराज हे अलौकिक सिद्ध पुरुषापैकी एक होते. इमामशाहा यांच्या शिष्य सामुदायाने त्यांचा एक स्वतंत्र पंथ स्थापन केला व त्याला " इमामशाही पंथ " अथवा " पीराणा पंथ " म्हणू लागले. लोक आदराने त्याला " सत्पंथ " देखील म्हणतात. यांचे अनुयायी सर्व हिंदूच आहेत आणि त्यांची आचारसंहिता संपूर्ण हिंदू सनातन धर्म मार्गाप्रमाणे आहे.

Atleast admitted that roots of Satpanth are muslim

सद्‌गुरु इमामशाह यांनी मुलतान येथील खोजा लोकांपुढे

Why promise to Khojas?

Goal of Imamshah was to convert Hindus to Islam. Hence there was no need to preach to Muslims.

शपथ घेतली होती की मी एकही मुसलमानाला उपदेश देणार नाही, खरोखरच त्यांच्या उपदेशात एका शब्दानेही मुस्लीम धर्माचा अथवा रिवाजांचा उल्लेख नाही व एकही मुसलमान त्यांचा शिष्य नाही. एकदा एक पठाण त्यांच्यावर प्रभावित होऊन त्यांच्याकडून अनुग्रह घेण्याचा हट्ट करुन बसला. परंतु इमामशाहांनी त्याला दुसऱ्या एका मुसलमान गुरुकडे पाठविले व शेवटपर्यन्त आपले वचन खरे करुन दाखविले.

इ. स. १५ व्या शतकाच्या मध्यास इमामशाहा महाराज नावाचे एक प्रसिद्ध औलिया होऊन गेले. ते बुद्धीमान, धर्मपरायण व सदाचारी असून लोकोत्तर दैवी शक्तीचे प्रवर्तक होते. यांचा जन्म हि. स. ८५६ म्हणजे इ. स. १४५२ मध्ये पंजाबात "उंच मुलतान" गावी झाला इमामशाहांच्या वडिलांचे नांव कबीरुद्दीन होते. इमामशहा हा कबरुद्दीनच्या तिसऱ्या बायकोचा तिसरा मुलगा आहे. त्यांच्या वडिलांनी त्याला गुजराथेत पाठविले त्यांचे मुळ नाव सैय्यद अब्दुल रहिम होते. तारुण्यात त्यांना इमाम म्हणत. पुढे त्यांचे शिष्य लोक त्यांना इमामशाहा म्हणू लागले. इमामशाहांनी साध्या सरळ भाषेत लोकांना आध्यात्मिक विकासाचा मार्ग दाखविला. "पीराणा" हे सत्पंथी लोकांचे मुख्य आणि परमपवित्र तिर्थस्थान गणले जाते. काही भाविक लोक त्यास 'इमामपूर' "हेमपूर" "निकलंकीधाम" "कुमारिका क्षेत्र" वगैरे अनेक नावांनी ओळखतात. सत्पंथात इमामशाहा हे मुख्य संस्थापक मानले जातात. त्यांच्या शिष्यांपैकी चार मुख्य गणले जातात. संत भाभाराम, साध्वी कीकीबाई, संत नायाकाका व संत शाणाकाका. यांच्यापैकी संत शाणाकाका हे इमामशाहानंतर त्यांच्या पीराणा येथील मुख्य गादीवर बसलेले होते. पीराणा येथील गादीवर पाटीदारच गादीपती होतात. असा नियम चालत

Imamshah's real name was Abdul Rahim and his father's name was Kabiruddin

Founder of Satpanth is Imamshah

आलेला आहे. दुसऱ्या शिष्याचे स्वतंत्र स्थान दुसऱ्या गावी प्रसिद्ध आहे. त्यांची मंदिरे देखील सत्पंथी लोक यात्रेचे ठिकाण या उद्देशाने मानतात. सत्पंथात पाचीया, सातीया व आठीया असेही काही भाग आहेत. इमामशाहीचे सत्पंथी लोक फक्त इमामशहांच्या चार शिष्यांनाच मानतात. परंतु त्यांच्या वंशावळीला मानत नाहीत. इमामशाहांच्या सत्पंथात वंशावळीला स्थान नाही असे त्यांच्या वांङमयावरुन दिसून येते.

Attempt to de-link from descendants of Imamshah

सत्पंथ-सत्पथ-सत्पदाकडे जाणाचा पोहचण्याचा मार्ग अशी इमामशाहांची मान्यता आहे. ते म्हणतात की, " पंथी रे कोई खोटा नथी, चांदरण मार्गे नयने जोये ।। " कोणताही मार्ग खोटा अथवा निरुपयोगी नाही, परंतु या पंथाच्या तत्वरुपी प्रकाशाकडे दृष्टी करुन पहा. या प्रकाशाचा अनुभव करुन पहा. इमामशाहांनी भजनाद्वारे अत्यंत सरळ भाषेतून व व्यवहारिक उदाहरणे देऊन लोकांना ब्रह्मज्ञानाचा-आत्मज्ञानाचा उपदेश केला आहे. त्यांच्या उपदेशात सत्य आणि शुद्ध नीतीचाच समावेश झालेला आहे म्हणून या पंथात सत्पंथ असे नाव पडले. सत्पंथी लोक शुद्ध, पवित्र आचरण करुन व्रतांचे पालन, घटपाट पूजा यज्ञविधीचे आचरण करतात. मादक पदार्थांना त्याज्य समजतात. म्हणून अभक्ष-भक्षण व अपेयपान यापासून ते अलिप्त राहतात. कुलाचार पाळणे व स्पर्शास्पर्श यांचा सुक्ष्म विवेक ठेवणे यातही ते चूकत नाही. परमेश्वर एक आहे जेथे निश्चय कराल तेथेच तो तुम्हास लाभेल असे त्यांच्या गुरुचे त्यांना सांगणे आहे.

Imamshah as Saiyyed = Muslim

इमामशाहांच्या अलौकिक दिव्य प्रभावामुळे व ते स्वतः सैय्यद फकीर असल्याने त्यांचे अनेक सैय्यद मुसलमानही शिष्य होऊ पाहात पण त्यांना इमामशाहांनी स्पष्ट नकार दिला. तसेच त्यांच्या वेदवेदान्ताच्या गहन अभ्यासामुळे व अध्यात्मिक शक्तीमुळे

If this statement is true, why muslims were not made followers?

व ते स्वतः दैवी विभूती असल्यामुळे त्यांच्या बाबतीत बरेच मुसलमान व बरेच कट्टर हिंदू हे दोन्हीही त्यांचा द्वेष करू लागले, तर कित्येक हिंदू श्रद्धाळू लोक त्यांचा अनुग्रह घेऊ लागले. त्यांचा श्रद्धेचा व दानधर्माचा ओघ इमामशहांकडे त्यांच्या हयातीत व त्यांच्या नंतरही पीराण्यास चालू राहीला. त्या संपत्तीच्या मोहाला बळी पडून सैय्यद लोकांनी या ठिकाणावर आपला हक्क गाजविण्यास सुरुवात केली व त्या काळातील मुसलमानी सत्तेच्या वर्चस्वाचा फायदा घेऊन इमामशहांच्या हस्तलिखीतात स्वतःच्या मुस्लीम धर्माप्रमाणे फेरफार घडवून आणले. खान्देशातील अनेक लोकांनी यावर फार मोठा हल्ला केला पण तरीही वैदिक धर्माप्रमाणे हा धर्म वाढत आहे. सत्पंथाचे साहित्य पाहिले असता त्यातील इमामशाहाचे ज्ञानपदसंग्रह यातून फारच उच्च कोटीचे तत्वज्ञान आढळून येते. याचे एकंदरीत निरीक्षण केले असता हे अथर्ववेदाच्या आधारे निर्माण झाले असावे असे दिसून येते. अथर्व वेदाचा ब-याच ठिकाणी उल्लेख केलेला आढळतो.

This is false statement. Imamshah himself, during his lifetime, has built his tomb with the help of money from Muslim King

सत्गुरुरुपी प्रकाशाचा म्हणजे सत्चा ज्याने अनुभव केला तोच खरा सत्पंथी म्हटला पाहिजे. सत्पंथ हा ज्ञानाच्या अनुभुतीचा मार्ग आहे. म्हणून ते तत्व समजणे अत्यंत कठीण असते. जन्म सफल होण्याकरिता जीवीताची सदैव फिकीर बाळगा. जीवनाची क्षणभंगुरता जाणून सदाचाराने वागा. हीच इमाम शाहांची शिकवण आहे. मानव जीवन सफलतेच्या तळमळीनेंच त्यांनी हा सत्पंथ मार्ग दिग्दर्शित केलेला आहे.

This is in line of concept of Islamic "Nur", the sacred light

This is used as a weapon to "avoid" difficult questions or when questions that "expose" satpanth.

If Imamshah has given knowledge in simple terms they why this Nur is very difficult?

प्रकरण २ रे

सत्पंथातील तत्वज्ञान

सत्पंथ संप्रदायातील अध्यात्म विषयक तत्वज्ञान –

This is copied from hinduism with the aim to attract hindus to Satpanth, so that they can be at a later stage converted to Islam.

सत्गुरु इमामशाह प्रणित सत्पंथ ज्ञान साहित्यात तत्वज्ञानाला फार मोठे प्राधान्य दिलेले आहे कर्म भक्ती, उपासना, ज्ञान व प्रेमभक्ती या साऱ्या साधनांचा अवलंब करुन आत्मज्ञान साध्य करुन मनुष्य मुक्त होऊ शकतो हे त्यांनी आपल्या साहित्यात ठिकठिकाणी दर्शविले आहे. आत्मअनात्म, तत्वविवेक, वैराग्य, शम, दम, उपरति, तितिक्षा, श्रद्धा, समाधान, मुमुक्षुत्व म्हणजेच प्रभुकृपा संपादन करण्यासाठी अनन्य भक्तीचा तत्वप्रयोग यामुळे तत्वज्ञान उत्पन्न होते.

Original teaching of Satpanth and Imamshah does not say so.
This is shoddy work by the author

मुलतत्वे दोन आहेत. १) आत्मत्व २) अनात्मत्व. ज्या प्रकृतीला परमेश्वराने गती दिली ती तीन गुणांनी युक्त होती. १) सत्व २) रजस ३) तमस्. हेच तीन गुण पुढे सर्व तत्वात मिसळले. हे त्रिगुण जगतातील संपूर्ण वस्तूमात्रात न्यूनाधिक अनेक मात्रांनी विद्यमान आहे याच कारणाने सृष्टीत भिन्नता दिसून येते. मनुष्यास आत्मिक शांती उपलब्ध करुन देण्याचे काम धर्म संतपुरुष आणि महात्मा पुरुष करु शकतात. त्यांच्या अनुभूतीतून हेच सिद्ध होते की, सुख प्रवृत्तीत नाही पण निवृत्तीत आहे. हेच दोन मार्ग सृष्टीसमोर खुलतात. १) एक प्रेय २) दुसरा श्रेय. या मार्गातून एकतर आसुरी संपदा संगहीत होते किंवा दैवी संपदा तत्वज्ञान प्राप्त करणारे दैवी संपदा जोडून चालतात. तत्वज्ञान शून्य लोकच आसूरी संपत्तीच्या नादाने दुःख सागरात जाऊन

Concepts of Bhagvad Gita have been super imposed as work of Imamshah and teachings of Satpanth

पडतात. जगतातील कोणतीही वस्तु धन, वैभव, ऐश्वर्य इत्यादि आसुरी किंवा दैवी नाहीत. त्या निर्विकार आहेत पण त्यांचा प्रयोग ज्या भावनेतून, ज्या लक्ष्यातून आणि ज्या उद्देशाने केला जातो त्यास आसुरी किंवा दैवी बनवितो. धन एक साधनमात्र आहे. त्याचा दुरुपयोग आसुरी आहे आणि सदुपयोग दैवी भावनेंने केला आहे.

जगतात आत्मतत्व व जीवतत्व हे दोन पृथक व स्वतंत्र सत्ता धारण करणारे चैतन्य प्रवाह आहेत. जीवतत्व त्रिगुणात्मक प्रकृतिच्या अविष्काराने बनलेले जडरुप तत्व आहे तर आत्मत्व चिन्मय ज्योतीस्वरुप चैतन्य स्वरुप आहे. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा ध्यान, समाधि या अष्टांग साधनाच्या दृढ अभ्यासाने जीवात्मा जेव्हा आपले मलिन अविद्यास्वरुप जड तत्व जाणून त्याचा त्याग करण्याचा अभ्यास करतो तेव्हाच चेतन स्वरुप ज्ञानावलंबाने तो दुःखमुक्त होतो. कारण असलेल्या त्रिगुणात्मक प्रकृतिला आपल्या विवेक बलाने तो दूर करतो.

योगज्ञानाच्या दृढबलाने आठही अंगाचे तीव्रतेने अनुष्ठान करावे यम म्हणजे अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह आणि नियम म्हणजे शौच, संतोष, तप, स्वाध्याय व ईश्वर प्रणिधान या दहाही यम नियमांचे आचरण आपल्या जीवनात करावे. यमाकडे दुर्लक्ष करुन केवळ नियमांचेच पालन केले तरी जीवात्म्याचे पतन होऊ शकते. म्हणून यम व नियमांचे यथार्थतेने दृढतेने आचरण करावे.

साधकाने समाधी अवस्थेत या साऱ्या तत्वांचा साक्षात्कार करुन घ्यायचा असतो. साक्षात ज्ञान प्राप्त करणे म्हणजेच 'जाणणे' तत्वज्ञान वाचणे अथवा ऐकल्याने होत नसते तो जाणण्याचा विषय

आहे. ध्यान अवस्था विवेकख्यातीत प्रवेश करुन तत्वांचे साक्षात ज्ञान जाणण्याकरिता प्रथम शाब्दिक ज्ञान प्राप्त करणे व नंतर मनोमन जाणण्याने साक्षात्कार होतो.

कपिलमुनिप्रणित " तत्वसमास " तसेच भगवान शंकराचार्य कृत " तत्वबोध " तद्वत वेद, उपनिषद, गीता, योगवाशिष्टच, भागवत आणि अन्य ऋषिमुनि योगी पुरुषाद्वारे जे सृष्टीविज्ञान, तत्वव्याख्या आणि तत्वनिर्णय केला गेलेला आहे तो केवळ शाब्दिक आहे. प्रथम अनादि तत्वे तीन आहेत.

१) ब्रह्मतत्व २) आत्मतत्व ३) प्रकृतितत्व

प्रकृतिचे तीन गुण आहेत. १) सत्व २) रज ३) तम

हे तीनही गुण जोपर्यंत सम अवस्थेत असतात तोपर्यंत सर्गकाल म्हणजे निष्क्रिय अशी प्रलयावस्था असते. परमात्मा जेव्हा आपल्या सामर्थ्याने प्रकृतीस गती देतो तेव्हां या त्रिगुणात विषमता येते व तद्वारा विविध प्रकृति निर्माण होते. प्रकृति आठ आहेत.

१) अव्यक्त २) महत् ३) अहंकार, आणि पाच तन्मात्रा. विकार सोळा आहेत. पंचभूते व अकरा इंद्रिये असे मिळून २४ तत्वे आहेत. १) अव्यक्त-प्रकृति २) महत्बुद्धि ३) अहंकार ४) शब्द ५) स्पर्श ६) रुप ७) रस ८) गंध ९) आकाश १०) वायू ११) अग्नि १२) जल १३) पृथ्वी १४) त्वक् १५) नेत्र १६) कर्ण १७) घ्राण १८) रसना १९) वाक् २०) हस्त २१) पाद २२) उपस्थ २३) गुदा २४) मन २५) रज २६) सत्व २७) तम आणि २८) पुरुष

या २८ तत्वानी मिळून जीवात्म्याचा पिंड म्हणजे स्थूल शरीर बांधले जाते. याच्या पलिकडे आत्मतत्वाची स्थिती असते.

कारण आत्मतत्वाचा संयोग जोपर्यंत या पिंडात नसतो तोपर्यंत तो पिंड जड असतो. आत्मतत्वाच्या संयोगानेच तो चेतनामय होतो व तेव्हांच ही जिवपिंडाची सृष्टी दृष्टीगोचर होते.

प्रकृतित भगवंताच्या सामर्थ्याने जेव्हा गती प्राप्त होते तेव्हा प्रकृति ही द्रव्यावस्थेत येऊ लागते. याच अवस्थेत वेदात "समुद्रो-अर्णवः" (लहरणारा समुद्र) असे म्हटलेले आहे. प्रकृतीत जेव्हा प्रभुसामर्थ्य प्रकटते तेव्हा त्या अव्यक्तात नित्य पदार्थ अवस्थित झाले तेच महतत्व होय. या अवस्थेस समष्टि बुद्धि असे म्हणतात. या महत्तत्वात आणखी गती प्राप्त होऊन सुक्ष्मता कमी होत जाऊन जडता येते. त्यास अहंकार म्हणतात. अहंकार म्हणजे अहं-भाव. जेंव्हा ही भावना होते की हे काम मी केले आहे. मी पणाची अवस्था म्हणजे अभिमान होय. ज्या प्रकृतीस भगवंताने गती देऊन कार्यान्वित केली ती सत्व, रजस, व तमस् गुणांनी युक्त आहे. अहंकारात सुद्धा हे तीन गुण असणारच. अहंकारापासून पाच भूते व पाच सुक्ष्मशक्ती तन्मात्रा निर्माण होतात. शब्द, स्पर्श, रुप, रस ग्रंध या सुक्ष्म तन्मात्रा पासून आकाश, वायू, अग्नि, जल व पृथ्वी उत्पन्न झाली आणि याच महाभूतांपासून अनेक प्रकारची सृष्टी निर्माण झाली.

अहंकारापासून अकरा इंद्रिये उत्पन्न झाली आणि त्या साऱ्यांचा संयोग जेव्हा घडून आला तेव्हा जीवात्म्याने पूर्व कर्मानुसार बुद्धि अहंकार मनाने युक्त जन्म धारण केला. म्हणून पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, मन, अहंकार व बुद्धि यामध्ये बुद्धिच प्रधान पदावर आहे. एक प्रकृतीने २४ रुपे धारण करणे व शिवाय तीन गुणांच्या योगाने अनेक रुपे प्राप्त करणे, हे कशाकरिता आहेत की मनुष्याने भोग अथवा अपवर्ग प्राप्त करावेत. यासाठी अव्यक्ताचे तीन

धर्म आहेत. १) एकत्व २) अर्थवत्व ३) परार्थ्य.

एकत्व म्हणजे केवळ एक आत्मरुप होऊन राहणे. अर्थवत्व म्हणजे प्रयोजन, पुरुषाला भोग आणि अपवर्गाची प्रेरणा करणे आणि परार्थ्य म्हणजे दुसऱ्यांच्याकरिताच केवळ कार्य करणे, स्वतःकरिता नव्हे.

जेव्हा आत्म्याचा या जड तत्वाशी संबंध घडून आला तेव्हा समष्टीत जे महत् झाले तेच मानवात बुद्धीरुपाने अवस्थित झाले. तेव्हाच प्राण, अपान, व्यान, उदान, समान हे पाच वायू कार्यरत झाले आणि तेव्हाच पाच प्रकारच्या अविद्येने त्यास घेरले. १] अविद्या २] अस्मिता ३] राग ४] द्वेष ५] अभिनिवेश मनुष्य जेव्हा आपल्या शरीरावर आत्मबुद्धिची धारणा करतो त्यासच अविद्या म्हणतात. आपल्या बुद्धिला आत्मा समजतो ती अस्मिता. माझ्याजवळ हे हे पदार्थ असायला पाहिजे अशी लोभी वृत्ती म्हणजे राग आणि हे हे पदार्थ दूर व्हावे अशी घृणावृत्ती म्हणजे द्वेष. मी सदै अमर राहावे, मृत्यूवश होऊ नये अशी वृत्ती म्हणजे अभिनिवेश. या पाच प्रकारच्या अविद्येने जीवात्म्यास दृढ बंधनात फसविले आहे.

बुद्धिचे सुद्धा आठ रुप आणि तीन वृत्त्या आहेत. धर्म ज्ञान वैराग्य, ऐश्वर्य, अधर्म, अज्ञान, अवैराग्य व अनैश्वर्य ही बुद्धिची आठ रुपे आहेत. शांत, घोर, व मूढ ही सर्व रुपे व सत्व, रज, तम या तीन गुणांच्या अनुसार कार्य करीत असतात. साधकाने हा प्रयत्न करायचा असतो की चांगले रुप अथवा वृत्त्या उन्नत कराव्या आणि विरोधी रुप अथवा वृत्त्या दाबण्याचा अभ्यास करावा.

बुद्धित जेव्हा सत्व वाढते, रजस्, तमस् दाबले जातात, तेव्हां मनुष्य धर्माचे पालन करण्यास (दान, दया, तप, यम, नियम

पालन करण्यास) प्रवृत्त होतो. ज्ञान म्हणजे प्रकृतीचे अथवा आत्म्याचे तत्वज्ञान प्राप्त करतो. वैराग्य अर्थात इंद्रियांना विषयापासून परावृत्त करतो. ऐश्वर्य म्हणजे तत्वज्ञानाच्या मार्गानुसार वर्तन करुन मन प्रसन्न सत्यसंकल्प युक्त आणि अद्‌भूत ज्ञानानंदात मग्न होतो हे बुद्धीचे चार सात्विक रुप आहेत. याच्या विपरीत चार तामस रुपापासून स्वतःला वाचवून आत्मिक उन्नती करत राहावे.

ब्रह्म सत् चिद् आनन्द आहे. याच्याशी मित्रत्व पावून सत् चिद् रुप असलेला जीवात्मा आनंद प्राप्त करुन घेतो. संसारात दुःखाची गणता करता येण्यासारखी नाही पण त्या सर्व दुःखांचे तीन विभाग केले जातात.

१] अध्यात्मिक दुःख – रोगादिद्वारा, अपघात द्वारा शरीरात उत्पन्न झालेले दुःख आणि कामक्रोधादि विकारांनी मनात झालेले दुःख.

२] अधिभौतिक – म्हणजे विषाक्त जीवजंतुपासून अथवा व्याघ्र-सिंहादी क्रूर प्राण्यापासून झालेले दुःख, अग्नि, वारा, पाणी इत्यादिंनी निर्माण झालेले दुःख.

३] आधिदैविक – अतिवृष्टी, अनावृष्टी, दुष्काळ, भूकंप, महापूर इत्यादिद्वारा निर्माण झालेले दुःख.

सर्व अनुभवी महात्म्यांनी दुःखाचा आत्यंतिक नाश आणि सदैव सुखात मग्न राहण्याचा मार्ग अथवा साधन एकच सांगितलें आहे ते म्हणजे तत्वज्ञान प्राप्ती. तत्वज्ञानाशिवाय त्या उद्देशापर्यंत पोहोचणे कठीण आहे.

दुःखापासू सुटून मोक्ष-आनंद प्राप्त करण्यासाठी योग अथवा विज्ञान अथवा तत्वज्ञानाच्या सामर्थ्याने उपासना योगद्वारा आत्म्यास

शुद्ध करुन परमेश्वरात प्रकाशरुप आनंद प्राप्त करुन घ्या. शरीर आणि ब्रह्मांड दोघाचे तत्व एकच आहे. दोघात खूप साम्य आहे. पृथ्वी, जल, वायू, अग्नि ,आकाश आणि अव्यक्त ब्रह्मा म्हणजे परमात्मा या सहा धातूंनी बनलेले हे जगत आहे. त्याचप्रमाणें शरीरातही पाच भूत आणि आत्मा आहे. साधकाने सर्व प्रथम आकाश, वायू, अग्नि, जल, पृथ्वी यांचे यथार्थ ज्ञान प्राप्त करावे. त्यात सात्विकता, राजसता, तामसपणा कशा प्रकारचा आहे याचे ज्ञान संपादन करावे. नंतर आपल्या शरीरात हे पंच प्राण कोठे आहे आणि कसे काम करीत आहेत हे सारे ज्ञान महान ज्ञानी अशा वितरागमुनि, गुरु महात्म्याद्वारा प्राप्त करुन घ्यावे.

स्वयमेव ईश्वर पाण्याच्या एका सूक्ष्म कणात सुद्धा सामाव-लेला आहे. भगवंताच्या परमतत्वाची ही महान शक्ती आहे. ती जगतातील एका सूक्ष्म जीवजंतूत, प्रत्येक प्राणिमात्रात तसेच प्रत्येक जड चेतन वस्तुमात्रात, एकेका गतीत, एकेका हावभावात, एकेका स्पंदनात ओतप्रोत भरलेली आहे. त्याच शक्तीला आपल्याला पाहायचे आहे, ही सम्यक दृष्टी ज्याची झाली त्याच्या हृदयात कोणत्याही प्रकारची कोणत्याही विषयाची पापवासनाच शिल्लक राहात नाही. तो पवित्र निर्मल होऊन जातो. शारीरीक दुःख त्याला दुःखात टाकत नाही, सुखे त्याला मोहवू शकत नाहीत. सतत फिरणाऱ्या चक्राप्रमाणे भोग्य पूर्ण होताच तसा जीवात्मा मुक्त होऊन जातो. परमतत्वात तो परमविलय पावतो.

याप्रमाणे सत्पंथात अध्यात्मविषयक तत्वज्ञान सांगितले आहे.

प्रकरण ३ रे

सत्पंथाचा आचारधर्म

जो धर्माचे रक्षण करतो, त्याचे रक्षण धर्मच करतो. धर्माचे रक्षण करणारा कदापि नाश पावत नाही. ज्याच्या रक्ताच्या थेंबा थेंबात धर्माची तत्वे भिनलेली असतात तेच धर्माचे व धर्मसंस्थांचे रक्षण करु शकतात.

मानव हा सुखप्रिय प्राणी आहे. त्यामुळे त्याने भौतिक सुख प्राप्तीच्या साधनात कितीतरी प्रगती केलेली आहे. पण त्यामुळे त्याचे समाधान झालेले दिसत नाही. त्यामुळे त्याची सदैव धावपळ व मानसिक अस्वस्थता दिसून येते. मनुष्याने आपले जीवन एका विशिष्ट नैतिक चाकोरीतुन व्यतीत केल्यास मात्र त्यास भावनिक अथवा सात्विक सुख प्राप्तीचे समाधान होते असा आपल्या संत महात्म्यांच्या अनुभवावरुन सिद्धांत मांडलेला आहे.

इमामशाही सत्पंथी लोकांचे आचरण इमामशाह यांनी घालून दिलेल्या शुद्ध आचारविचार यांच्या नियमाप्रमाणे चालते. त्यांनी नीतिशतक सांगितलेले आहे.

नीतिशतक : १ ते ८

100 Kriya / Satpanth Shikhaman / Shikshapatri

सकाळी सूर्योदयापूर्वी उठून शौचमार्जन करुन स्वच्छ व्हावे व त्यानंतर प्रथम हात व पाय चांगले माती लावून धुवावे. पाच आचमने म्हणजे गुळणे करावे. दंतधावनाने दात स्वच्छ करावेत. नंतर स्नान करुन निर्मल झाल्यावर देवतार्चन, पूजन, अर्चन करावे. सकाळच्यावेळी बाहेर मोकळ्या हवेत फिरावयास जावे. शुद्ध

हवेच्या पुरवठ्याने आरोग्य सुधारते. सकाळच्या प्रहरी मन प्रसन्न असावे.

नीतिशतक : ९ ते १८

जेवणाच्या आधी हात, पाय, मुख चांगले धुवून, आचमन करावे. आपल्या बसण्याच्या आसनापेक्षा उंच भागावर अथवा पाटावर ताट ठेवून अन्न ब्रम्हर्पणाचा मंत्र म्हणावा. ईश्वरी स्मरण करुनच अन्न सेवन करावे. जेवत असतांना कोणत्याही प्रकारची बडबड करु नये. मौन पाळावे. अन्नास नावे ठेवू नयेत, खारट, अनलवण, बे-चव वगैरे नावे ठेवून त्याचा अपमान करु नये. शक्य झाल्यास त्याची वाखाणणी करावी पण हेटाळणी करु नये. चालता फिरतांना अन्न सेवन करु नये. एकेठिकाणी बसूनच जेवावे.

आश्रयदोष, जातीदोष आणि निमित्तदोष असलेले अन्न सेवन करु नये. तसेच उष्टे, खरकटे, करपलेले, शिळे, कुजलेले अन्न खाऊ नये. एवढेच नाही तर पशूंनासुद्धा खाऊ घालू नये. जेवण अगदी पोटभर करु नये. एवढेच नाही तर पशूंनासुद्धा खाऊ घालू नये. ते पापमुलक आहे. तसेच दुसऱ्या कोणाचीही वस्तू विचारल्या शिवाय घेणे अथवा वापरणे दोषयुक्त आहे.

नीतिशतक : १९ ते २२

मनुष्याने नेहमी शुद्ध सात्विक आहार घ्यावा. सत्पंथ तत्त्व प्रणालीनुसार मद्य, माँस तर वर्ज्यच केलेले आहे. पण लसूण, कांदा, भांग, तंबाखू, अफीम गांजा हे अमली पदार्थसुद्धा वर्ज्य केलेले आहे. नाच, छंद नाटक, सिनेमा तसेच जुवा, सोंगट्या, जुगार, सट्टा, रेस, लॉटरी, वगैरे उपायांनी श्रीमंत होण्याचा प्रयत्न करु नये. यामुळे सद्‌गुरु मार्गापासून तो दुरावतो.

नीतिशतक : २३ ते ३४

गुळीने रंगविलेले वस्त्र अथवा भडक वस्त्रे वापरु नये. वस्त्र साधे शुभ्र असावे. गुळीच्या वस्त्रास विचित्र वास येतो. त्यामुळे मन मलीन होते. नीच प्रवृत्तीच्या लोकांची संगत करु नये. पगडी, फेटा अगर टोपी तिरपी घालू नये. समाजात ते आढयतेचे लक्षण समजले जाते. आपल्यापेक्षा वयाने ज्ञानाने, अनुभवाने मोठा असल्यास त्यास मानाने वागावे, त्याची आदब पाळावी. कोणालाही अरे, तुरे अथवा अद्वातद्वा बोलून दुखवू नये.

शेजाऱ्यापाजाऱ्यांशी अदबीने वागावे. कोणालाही शिवीगाळ करुन दुखवू नये. कोणाचा न्यूनगंड शोधून त्याच्या वर्मावर घाव करु नका. कोणी द्वेषाने शिवीगाळ केली तर एकदम क्रोध येऊ न देता शांत चित्ताने बोला. कोणी सुडबुद्धिने वागले तरी आपण तसे वागू नका. सज्जन माणसाने अवगुणावर मात करुन सद्‌गुणाने वागण्याचा प्रयत्न करावा. तारुण्यमदाने धुंद होऊ नये.

नीतिशतक : ३५ ते ४२ :

व्यापारधंदा करतांना कोणालाही कमी मापून देऊ नये अथवा कोणाकडून अधिक मापून घेऊ नये. उद्योगधंद्यात अधिक लालचीपणा करु नये. माता पिता आणि गुरु, अनुभवी व्यक्ती यांचे वचन पालन करावे. वडिल भावजयीशी मातेप्रमाणे व लहान भावाच्या पत्नीशी सुनेप्रमाणे अथवा मुलीप्रमाणे वागावे. धर्मकृत्य करतांना पूजा-अर्चा, तप, ध्यान, सेवा, स्मरण करण्याच्या बाबतीत आळस करु नये. नित्य पूजन, भजन, आरती, सत्संगात हजर राहावे. ह्या बाबतीत चुकारपणा करणे योग्य नाही. गुरु गतगंगेत सत्संगात जाऊन मुखी आचार्य गुरु यांना प्रथम वंदन करावे. नंतर

सर्व गुरु बंधूस नमन करावे.

नीतिशतक : ४३ ते ५३

जो धर्माचे रक्षण परिपालन करतो तोच धर्मी व धर्म त्याचे रक्षण करीत असतो. सर्व-भक्षक अशा अहंकाराच्या धुंदीत जो सदैव असतो तो कुकर्मी होय. गुरुगतगंगेत अथवा पूजेत आल्या-नंतर एकमेव सृजनहार जो परब्रह्म परमात्मा त्याचे ज्योतिस्वरुपा तून ध्यान करावे. सत्पंथ मार्गात घटपाट पूजेच्या वेळो पंचा यतनाची उपासना केली जाते. आदि नारायण (परम पुरुषोत्तम सनातन सत्चिद् आनंद स्वरुप ईश्वर) आदिशक्ति (जगत्कर्ती-चित्कला परब्रह्मस्वरुपिणी शक्ती योगमाया) ब्रह्मा (रजगुणाधिष्ठित जगत् उत्पत्तिकर्ता व ज्ञानदाता) विष्णू (जगताचे पालन, पोषण व संरक्षण कर्ता) महेश (जगताचा संहार व लयकर्ता) अशा या पंचायतनाचे ज्योतीस्वरुपातून ध्यान, चिंतन स्मरण करणे हे सत्पंथाचे मूळ तत्व आहे.

युगतिथीचे व्रत, उपवास, जप, तप, पूजा, सेवा करणे, युग धर्मानुसार प्रत्येक महिन्याच्या शुद्ध बीजेच्या दिवशी चंद्र दर्शनाच्या दिवशी उपवास करावा व पूजा करावी. शुक्रवारच्या दिवशी चंद्र-दर्शन असल्यास गुरुवार, शुक्रवार अशा दोन दिवसांचा उपवास निरंकार, निर्जल करावा. भूकेल्यास भोजन देऊन तृप्त करावे. तहानलेल्यास जल देऊन शांत करावे. उघडयास पांघरुण देवून संरक्षित करावे. पात्रापात्र पाहूनच दान करावे. दसवंत (स्वकष्टार्जित कमाईचा दहावा भाग) सुक्रित (विसावा भाग) पूजेत गुरुमुखी यांच्या हस्ते धर्मास अर्पण करुन त्यांचा आशिर्वाद घ्यावा. सगे, सोयरे, इष्टमित्र यांच्याशी सौजन्याने वागावे. अतिथी, अभ्यागत, रुग्णाईत यांची सेवा करावी.

नीतिशतक : ५४ ते ६० :

परस्त्रीगमन वा चिंतन हा फार मोठा अनर्थकारी दोष आहे. कोणाकडेही वाईट नजरेने पाहू नये. स्त्रियांशी कामाव्यतिरिक्त जास्त गुंजन करु नयें. जाणून-बुजून खोटी साक्ष देऊ नये. खोटे पत्र दस्तऐवज वगैरे लिहून कोणालाही विनाकारण फसवू नये. लाच-लुचपत देऊन अथवा घेऊन कार्य साधून घेऊ नयें, विष घेऊन, जाळून घेऊन अथवा विहिरीत उडी टाकून अथवा मानेस फास अडकवून आत्मघात करु नये. अशी व्यक्ती अवगतीस जाते.

नीतिशतक : ६१ ते ६८ :

अग्नीवर उष्टे, खरकटे, घाणेरडे पाणी टाकू नये. कारण अग्नी ही देवता आहे. झाडे उपटणे, कापणे, तोडणे हा सुद्धा दोष आहे. कारण ते सजीव आहे. सकाळच्या प्रहरी फळे, फुले अथवा पानें तोडणे दोषास्पद आहे. ज्याला वाचा नाही अशा प्राणी-पशु-पक्षी यावर आळ घेऊ नये. हाडांचा विक्रय करु नये. तसेच गाय, बैल, म्हैस, घोडा, शेळी, गाढव, खेचरे, वगैरे प्राण्यांचा आपल्या स्वार्थाकरिता विक्रय करु नये. जीव, जंतू, सूक्ष्म, स्थूल जीवांना ते जरी स्वेदज उद्‌भीज असले व त्रास देत असले तरी त्यांना मारता कामा नये. नुसते मुखाने "मार" असे म्हटल्याने सुद्धा हिंसा घडते.

नीतिशतक : ६९ ते ७२ :

जमिनीचे मोल करु नका. ती अमूल्य आहे. कन्येने विश्वासाने बापाकडे ठेवलेले धन-ऐनवेळी उपयोगी पडेल या उद्देशाने जमा केलेले आपल्या प्रपंचाकरिता वापरु नये. योग्यवेळी तिला पूर्णांशाने परत करा. खोटे बोलून कुणाला लुबाडू नये, किंवा अडचणीत

आणू नये. केवळ हुंडयासाठी कुलवधूस छळू नये. धनावर व्याज, सवाई अगर दिढीने, दुप्पटीने रक्कम वसुल करणारा असेल त्याच्या घरी अन्न सेवन करु नये.

नीतिशतक : ७३ ते ७८ :

कोणाचीही वस्तु ठेव म्हणून ठेंवलेली हडप करु नये. गहाण फरोक्त कर्ज वगैरे बाबतीत खोटे दस्तऐवज करुन लुबाडू नये. कोणाचाही विश्वासघात करु नये कारण ते महान पातक आहे. कोणाचीही रस्त्यात पडलेली वस्तु आपलीच समजून उचलू नये, तसेच कोणाचीही वस्तु चोरीने, अन्यायाने उचलून घेऊ नये. तसे केल्यास आपण त्यांच्या ऋणात बांधले जातो. कोणा जवळुन उधार, उसनवार आणलेली रक्कम परत केल्याशिवाय राहू नये दुसऱ्याचे धन अन्यायाने हडप करुन उपभोग घेऊ नये. ऋणाबंधाच्या नियमाने त्यास पुढच्या जन्मी तेच पुत्र रुपाने अथवा अन्योन्य रुपाने परत करावे लागते.

नीतिशतक : ७९ ते ८५ :

सर्व भूत प्राणिमात्रांविषयी मनांत दया बाळगावी. हृदय नेहमी पवित्र भावनांनी युक्त असावे. हृदय शुद्धी हे सत्पंथशास्त्रात नीतिमत्तेचे प्रथम क्रमांकाचे कलम आहे. सुक्ष्म विकारांचा त्याग केल्याशिवाय हृदयशुद्धी होत नाही. शत्रूशी शत्रूप्रमाणे न वागता प्रेमाने वागावे म्हणजे त्याच्या मनातील किल्मिष दूर होईल. दुसऱ्यांच्या अंतर्यामीचे दुःख जाणून सहानुभूतीने त्यास सहकार्य करावे. भगवंताच्या कृपेने आपण मोठे असल्यास (धन, मान, प्रतिष्ठाज्ञान इत्यादि) अहंकार करु नये. रात्रंदिवस सचोटीने वागावे.

नीतिशतक : ८६ ते ९० :

कोणत्याही गोष्टीचा अतिलोभ करु नये. काम विकार आणि क्रोधी विचार ह्या दुष्ट शत्रूंना ताबडतोब त्याग करा. प्रत्येक मनुष्याने ध्यान, धारणा, समाधी, तपश्चर्या इत्यादिचे शास्त्रशुद्ध नियमानूसार दररोज अनुष्ठान करावे. तिर्थस्नान अथवा तिर्थयात्रा अवश्य कराव्यात. व्रत उपवासांची फलाकांक्षा धरु नये. देव म्हणून केवळ दगडाची पूजा करु नये. कारण मूर्तीत ईश्वराचे अस्तित्व कल्पावे लागते. मनुष्यानें पायरीपायरीने आपली अध्यात्मिक उन्नती करावी. अेकच पायरीवर अडकून राहू नये.

नीतिशतक : ९१ ते ९६ :

अमर होण्याकरिता सदैव नामस्मरण, जप पूजा ध्यानपूर्वक करा. सदैव अष्टांग योगसाधन करुन त्याचा अभ्यास करा. असत्य दर्शन अर्थात स्वटदर्शन अथवा नास्तिकता मनुष्याला आपल्या जीवनात कधीच यशस्वी होऊ देत नाही. वेदशास्त्रांचे तत्व व नीतिमत्तेचे तंत्र हे अनुभवायचे असतात. त्यावर अंधश्रद्धा ठेऊ नये, मनुष्याने मुर्खपणात राहू नये. आपणास समजले नसले तर जाणत्याचा सल्ला घ्यावा. जो आपल्यापेक्षा ज्ञानाने, बुद्धिने व मानाने मोठा असेल त्याजकडून धर्मतत्वाची जाण करुन घ्यावी. सदैव ज्ञानसृष्टीचा अवलंब करा.

नीतिशतक : ९७ ते १०० :

मी सांगतो तेच खरे, बाकी सारे खोटे अशा प्रकारचा खऱ्या खोट्याचा व्यर्थ वादविवाद घालू नये. गुरु वचनाच्या मर्यादेचे उल्लंघन करु नका. सद्‌गुरुंनी कथन केलेले ज्ञान संकु-

चितपणे स्वतःजवळच लपवून ठेवू नका. जो मनुष्य सत्यधर्माची, सन्मार्गाची शिकवण विचारेल त्यास यथाबुद्धि द्यावी. दररोज संध्याकाळी सायंसंध्या करा. हातात जपमाळा घेऊन भगवंताचे नामस्मरण करा.

स्थूलमानाने या आचारसंहितेवरुन पाहता मानवाच्या जीवनाची नैतिक चाकोरीच इमामशाहांनी रेखाटलेली आहे. आपले ऐहिक प्रेय, पारलौकिक श्रेय व पारमार्थिक ध्येय कशा आचरणाने गाठावे त्याबद्दल कळकळीने उपदेश केलेला आहे. या आचारसंहितेचा अवलंब केल्यास मानवातील दानवता मिटून तोनराचा नारायण होईल व नारायणाचा नरोत्तम होईल व नरोत्तमातून पुरुषोत्तम होईल.

प्रकरण ४ थे

सत्पंथातील काही सत्पुरुष

सत्पंथ प्रवर्तक इमामशाहा :

सद्गुरु इमामशाहा महाराज यांच्या काळातील राजकीय घडामोडी व त्यांच्या सामाजिक जीवनावर झालेला परिणाम या गोष्टीकडे विशेष लक्ष खेचले जाते. या काळातील धार्मिक जीवन व साहित्य यांचा अतिशय गुंता झालेला आढळतो आणि हा गुंता अत्यंत हळूवारपणं सोडवितांना उज्वल आणि प्रभावी अशा सत्पुरुषाच्या तेजस्वी व्यक्तिमत्वाचे आपणास दर्शन होते.

सद्गुरु इमामशाह देखील असेच एक प्रभावी संत होऊन गेलेत. १५ व्या शतकात त्यांच्या उपदेशाने व त्याच्या सरळ पद्धतीने सांगितलेल्या ज्ञानाने लोक प्रभावीत होऊन त्यांना गुरुस्थानी मानू लागले. त्यांनी उपनिषदाचे शुद्ध तत्वज्ञान सामान्य लोकांना समजण्यालायक बनवून ते साध्या आणि स्पष्ट भाषेत भजनांच्या, ज्ञानपदांच्या रुपाने लोकांना प्रसादरुपाने दिलेले आहे. गुजराथ, कच्छ, मारवाड, नेमाड, खान्देश या ठिकाणी बहुसंख्य हिंदू अनुयायांनी त्यांना सद्गुरु मानले आणि एक नविनच पंथ निर्माण झाला. हा पंथ दोन तीन नावांनी ओळखला जातो. काही लोक याला " सत्पंथ " म्हणतात, काही " इमामशाही पंथ " म्हणूनही ओळखतात. या काळात हिंदुस्थानात राजकीय क्षेत्रात मुसलमानी सत्तेचे वर्चस्व होते. हिंदू देवालये आणि धार्मिक साहित्य या दोन्ही गोष्टी या काळात मुसलमानांच्या जुलमी धोरणामुळे विछिन्न झाल्या होत्या. इमामशाही पंथाच्या

New sect came into existence

This is historically false statement

साहित्यावर देखील याच कारणामुळे मुस्लिम लोकांनी त्यांच्या धर्माची छाप पाडण्याचा प्रयत्न केला. इमामशाहा यांनी मुलतान येथे त्यांच्या वडिलांच्या मृत्यूसमयी शपथ घेतली होती की, मी हिंदुच अनुयायी बनविन आणि पुढचे माझे आयुष्य मी हिंदूंना हिंदू धर्मप्रमाणेच उपदेश करण्यात खर्च करीन इमामशाहीचे सर्वच अनुयायी हिंदू आहेत आणि त्यांचे रितीरिवाज ते हिंदू धर्मप्रमाणेच पाळत असतात. इमामशाहा यांच्यावर फक्त सद्गुरु म्हणूनच त्यांची अनन्यसाधारण श्रद्धा आहे.

False statement

Kabiruddin is father of Imamshah

इमामशाहांच्या जीवन वृत्तांताचे दोन भाग पडतात. पहिला भाग म्हणजे संत कबीरुद्दीनच्या हयातीत गेलेले इमामशाहांचे जीवन दुसरा भाग म्हणजे संत कबीरुद्दीनच्या मृत्यूनंतरचे इमामशाहांचे जीवन या दोन्ही काळात त्यांनी उपदेश देण्याचे व आपल्या दैवी शक्तीच्या साहाय्याने लोकांचे दुःख दूर करण्याचेच कार्य केले. परंतु संत कबीरुद्दीन त्यांच्या नातेवाईकांपासून संपूर्णपणे वेगळें झाले होते आणि नंतर ते शेवटपर्यंत त्यांच्या हिंदु अनुयायांचे गुरु बनूनच राहिलेत.

All relatives, including Imamshah, were muslims and their occupation was to work for spread of Islam

इमामशाहा यांचा जन्म पंजाबमध्ये “ उंच गावी ” झाला. उंच गाव हे खूपच जुने नगर आहे. हिजरीसन ८५६ म्हणजेच इ. स. १४५२ सालचा उल्लेख काही पुस्तकात आढळतो. एके ठिकाणी इमामशाहांचा जन्म २७ सफर ८४४ हिजरी व मृत्यू २५ रमजान ९१९ हिजरी असा उल्लेख आहे. “ तवारीखे पीर ” च्या लेखकाच्या मते हिजरी सन ८५६ तारीख २७ माहे रबी उस्सानीत दार्शविला आहे. या जन्म सनाबाबत वेगवेगळी मते दिसून आली तरी एवढ मात्र निश्चित आहे की, इमामशाहा हे गुजराथमध्ये आले तेव्हा प्रसिद्ध मुस्लिम राजा ते महंमद बेगड्याची कारकिर्द चालू होती. हिजरी सन ८६३ ते ९१७ म्हणजे इ. स. १४५८ ते १५११

Father of Imamshah is Kabiruddin

याबाबत दुमत आढळत नाही. काही हस्तलिखिते वाचून आपल्याला इमामशाहा यांचे बालपण समजते. इमामशहा हे कबीरुद्दीनच्या तिसऱ्या बायकोचे पुत्र होते. कबीरुद्दीनला एकूण सात बायका व त्यांची अठरा मुले होती. इमामशाहा यांच्या जन्माच्या आधी असा आदेश मिळाला की अविनाशाची अमरज्योत तुझ्या घरात प्रगट झाली आहे.

Wrong. Even this book on page 17 says his name was Abdul Rahim.
This proves this work of author is cooked-up

आश्चर्यचकित झालेल्या पित्याने जाऊन मुलाचे मुख न्याहाळले. आयुष्यात कधीही पाहिली नसेल अशी दिव्य कांती आणि तेजोमय मुख पाहाताच ते परमानंदात मग्न झाले आणि त्याचे नाव इमामशाह ठेवण्यात आले. लेखक चुन्नाराच्या पुस्तकाप्रमाणे आगाखान यांच्या पूर्वजांपैकी हे ३२ ते इमाम आहेत. परंतु पुढे “ पीरातन ” साठी होणाऱ्या भानगडी, शिवाय ज्ञान आणि दैवीशक्ती प्राप्त केल्याशिवाय जे मुसलमान धर्मातील धर्मगुरु म्हणून हक्क गाजवू लागले. हा सगळा गोंधळ पाहून ते गुजराथ बाजूला आलेत व स्वतः हिंदू बनून राहिले.

This again is a historically completely false statement

चार वर्षांचे वय झाल्यावर त्यांना शाळेत दाखल केले परंतु ते सर्वज्ञान संपन्न जन्मले असल्यामुळे त्यांनी शाळेत जाऊन अनेकांचे दुःख दुर करण्याचा उद्योग आरंभला. आंधळ्याला दृष्टी दिली, बहिऱ्याला श्रवणशक्ती दिली, तर मुक्याला वाचा दिली, निर्धनाला धनवान केले, वंध्येला पुत्रलाभ घडविला. अशा एक ना दोन या अद्भुत बालकाच्या प्रभावाने संबंध मुसलमान शहर त्यांच्या मागे धावू लागले. एकदा मुलतान शहरात काही “जोगी” लोक आलेत त्यांच्या कानावर बाल इमामशाहांची किर्ती गेली आणि ते या “ दिव्यशक्तीधारी ” बालकाला भेटायला आले. त्यांना लहान वयाच्या इमामशाहाने सर्व प्रकारच्या योगक्रियांचे दर्शन घडविले. आणि संसार हे काय आहे. जगत जगदीश आणि त्यांची माया हे

सर्व विस्तारपूर्वक समजावले. त्यामुळे त्या जगी लोकांचा अहंकार नष्ट होऊन त्याना सत् आणि असत् विवेक बुद्धीने कसे जाणावे हे ज्ञान प्राप्त झाले आणि त्यांनी आपल्या मुद्रिका काढून त्यांना अर्पण केल्या म्हणजेच त्यांना गुरु मानले. त्यावेळेस त्यांचे वय अवघे आठ वर्षाचे होते. असे वर्णन केले आहे.

False story. Concocted lies. For real event read Collectanea by Vladmir Ivanow

संत कबीरुद्दीनचा अंतःकाळ जवळ आल्याचे जाणून त्यांनी विचार केला की, पित्याचत्या मृत्यूचे दुःख इमामशाह वयाने लहान असल्यामुळे तो सहन करु शकणार नाही. म्हणून त्यांनी उपदेश देऊन त्यांना गुजराथेत पाठविले. तेथे ते सत्संग करु लागले. इकडे मुलतान शहरी संत कबीरुद्दीन यांची महाप्रयाणाची तयारी केली तेव्हा इमामशाहा सत्संग करतांना एकदम थांबले व म्हणाले, माझे पिताजी कबीरुद्दीन यांनी देह सोडला आहे. आपल्या पित्याच्या अंतसमयी आपण जवळ राहू शकलो नाही म्हणून त्यांच्या डोळयातून अश्रूधारा सुरु झाल्या. ते एकदम उठून म्हणाले मी आता दोनशे कोस असलेल्या मुलतान शहरी जात आहे. प्रेतयात्रा स्मशानात जाण्याआधी पोहोचलें पाहिजे. माझा जो हिस्सा आहे तो त्यांच्याकडून मला मिळाला पाहिजे. हे बोलणे काहींना बावळटपणाचे वाटले. परंतु जे पक्के गुरुभक्त होते ते ताबडतोब उठून त्यांच्याबरोबर जाण्यास तयार झाले. इमामशहांनी आपल्या अंगच्या दिव्य शक्तीने आकाश मार्गाने भक्तांच्यासहित बैलगाडीचा रथ उडविला आणि ते थोडयाच वेळात मुलतान शहरी पोहोचले. तेव्हा खरोखरच प्रेतयात्रा त्यांना सामोरी भेटली. इमामशहांनी प्रेतयात्रा थांबवून सांगितले की पिताजींचे कलेवर खाली उतरवा. माझ्या वडिलांकडे माझा हिस्सा मागावयाचा बाकी राहिला आहे. सर्वजण लौकिक संपत्तीचा हिस्सा समजले आणि इमामशाहा यांना वाटेल ते बोलू लागले. त्यांनी इमामशाहांना सांगितले की,

At the time of death of his father, Imamshah was not in Gujarat

आमच्या मुलतान शहरात अशी रीत आहे की, जो ज्ञानी पुरुष उपदेशक असेल त्याला नाती गोती, हिस्सा राहूच शकत नाही. हे शब्द इमामशाहांच्या हृदयात कट्यारी प्रमाणे शिरले आणि ते आपल्या बांधवांना म्हणाले तुम्ही ज्ञानाचे मर्म न जाणता पोकळ ज्ञानाच्या गोष्टी करीत आहात. तेव्हा हे मुलतानायांनो ऐका –

मुलतानीके बेनका, जब्ध लगे तो दिन । हिंदवाकों उपदेश दूँ, मुरीद न मेरा मोमीन ।। हिंदवा मेरी बनी रहे, मैं हिंदवा का होई । मुलतानी तुम सुन लो, हिंदवा हम संगी होई ।।

त्यांनी त्यावेळपासून एकाही मुसलमान बांधवास उपदेश न देण्याची प्रतिज्ञा केली. हे शब्द इमामशाहांनी मरेपर्यंत पाळलेच परंतु अजूनपर्यंत पाळले जात आहेत. जनाजा उचलण्यास सुरुवात केली परंतु तो हलतही नव्हता आणि इमामशहांची विनवणी चालूच होती. त्याच वेळी चमत्कार घडला कबीरुद्दीनच्या जनाजा-तून हात बाहेर आला व त्याने एक माळ इमामशाह यांना दिली. नंतर तोंडातून साखर दिली आणि आवाज आला की, "बाकी राहिलेला हिस्सा तुला इराणच्या 'पीरशाहा' कडून मिळेल तेव्हा तू इराणला जा. डब्ल्यु इव्हान्सच्या पुस्तकाप्रमाणे संत कबीरुद्दीन यांनी गुलाब आणि साखर दिली. परंतु इतर बहुतेक ठिकाणी माळ आणि साखरेचाच उल्लेख आहे. मुलतानवासी आपल्या उद्धट वर्तनाचा पश्चाताप करु लागले व हिंदूनी त्यांचा जयजयकार केला.

Iran

पित्याच्या आदेशाप्रमाणे इमामशहा इराणला जायला निघाले. प्रवास कठीण होता. साधनांची सुविधा नव्हती. तरीसुद्धा ते इराणला ३४ दिवसात जाऊन आले. तेथे गेल्यावर "पीरशाहा" त्यांना पाहून अतिशय खूष झाले, प्रसन्न झाले, त्यांच्याकडून इमामशाहांना काही दवी शक्ती प्राप्त झाली. इराणला 'पीरशाहा" जवळ असतांना इमामशाहांनी स्वर्गाची सफर सुरु केली अशी

Why he did not use miracle?

Pirshah / Peershah of Iran, who was muslim and work to spread islam

Only a person with blind faith can believe in such miraculous stories which are of 15th century

माहिती मिळते. यासाठी 'जिन्नतनामा" नावाचे काव्य इमामशहा यांच्या नावाने रचलेले आहे. इमामशहांनी दसोंद अर्पण करण्यासाठी आलेल्या तीन जोग्यांना आपल्या पित्याप्रमाणे आपल्या जवळ असलेल्या दैवीशक्तीचे ब्रह्मकळांचे दर्शन दिले. सद्‌गुरु इमामशाहा यांनी तोंड उघडताच जोगी लोकांना चौदा भूवन, चंद्र, तारे, सारे ब्रह्मांड दिसू लागले. हे दिव्य दर्शन अनुभवून ते लोक अत्यंत हर्षभरीत झाले. सन्मानाने दसवंत तेथे अर्पण करुन ते समाधानाने परत फिरले.

नंतर इमामशाहा सिंधु नदीच्या तीराने गुजराथ बाजुला जाऊ लागले. रस्त्यात जीवन नावाचा नावाडी नौकेने लोकांना नदी पार करीत असे. त्या दिवशी अचानक तुफान सुरु झालें व नौका बुडू लागली, जीवनने अनन्य भावाने आपल्या गुरुची मनोमन आराधना सुरु केली. त्यावेळी इमामशहांनी प्रत्यक्ष तेथे हजर होऊन पाण्यात बुडणाऱ्या जीवनाला बाहेर काढले व स्वत: नौका पवन वेगाने चालवून पैलतीरी नेऊन पोहोचविली. पुढे ते प्रवास करीत करीत " जुणबदीना " गावी आलें. खोजा धर्मस्थानातील उर्मट आणि सत्तांध लोकांची किर्ती त्यांच्या कानी गेली होती. म्हणून गरीब वेश धारण करुन ते खोजा धर्मस्थानात गेले तेथे त्या लोकांनी त्यांचा अपमान केला. खोजा लोकांचा अभिमान दूर करण्यासाठी ते येथे आले होते पण त्यांचे काही एक न ऐकता त्यांना जेवणही दिले नाही उलट एका असंस्कारी माणसाने त्यांना तीन लाकड्या मारल्या. इमामशहा यांना यत्किंचितही क्रोध आला नाही. ते अतिशय शांत आणि प्रसन्न चित्ताने या लोकांचा नाद सोडून चालू लागले. तेव्हा रस्त्यात एक प्रेमजी खोजा नावाचा मनुष्य पुढे आला आणि तो अतिशय आदराने इमामशहांना घरी घेऊन गेला. त्यांना भोजन दिले व त्यांची कृपा संपादन केली.

पुढे दिल्लीत गेल्यावर त्यांनी " शाहदुल्ला " या मशिदीत मुक्काम केला. काही लोकांनी कुतुहलाने त्यांना विचारले, " महाराज, आपण मुसलमान दिसता आणि नमाज का पढत नाही ? " तेव्हा इमामशाहा नम्रतेने म्हणाले, " माझी नमाज खुदाने मंजूर करुन टाकली आहे, तुमचा आग्रहच असेल तर हे मशिदीचे मनोरेच नमाज पढतील. " आणि खरोखरच मशिदीचे मनोरे खाली वाकले. इमामशाहा म्हणाले, ' जरी मी मुसलमान कुळात जन्मलो असलो तरी सर्वांचा एकच अशा परमेश्वराचे ठायी मी लीन आहे. माझ्यात धर्मभेद अथवा जातीभेद नाही कर्म-धर्मसंयोगाने मी इथे येऊन उतरलो आहे. " त्या वेळेस दिल्लीचे बादशाह " बहलोल लोदी " या अफगाण राजाचे राज्य होते. ते देखील उत्सुकतेपोटी इमामशहांचे दर्शन घेण्यास निघाले व इमामशहांचा उच्च कोटीतला साध्या भाषेतील उपदेश ऐकून बहलोलखान बादशहांचे मन प्रसन्न झाले. ते आदराने म्हणाले, " महाराज आपण आपल्या स्वखुशीने माझ्याकडची काहीतरी भेट स्विकारा, मला आनंद होईल. तेव्हा इमामशाहा म्हणाले, " हे बादशहा मला गाव किंवा कुठलीही भेट नको. त्याला मी काय करु ? मला फक्त परब्रह्म परमात्म्याच्या दर्शनाचीच गोडी आहे. इतर लौकीक गोष्टीची आशा नाही. " परंतु बादशाहाने त्यांना प्रवासाकरिता एक रथवजा बैलगाडी दिली.

Imamshah himself says he is a muslim and his namaz was accepted by Khuda

earlier in this book it is said that muslim rulers exploited and abused Satpanth. But here Lodi a Afghan muslim ruler of Delhi is supporting Imamshah.

This also exposes the false hood of this book

यानंतर अनेक ठिकाणी फिरत फिरत ते गुजराथमधील " अटुणा " गावी येऊन पोहोचले. " बॉम्बे गँझेटियर " अथवा " हिस्ट्री ऑफ गुजराथ " अशा अनेक पुस्तकातून इमामशाहांचा इतिहास वाचायला मिळतो. दिल्लीहून निघाल्यावर ते मध्य-प्रदेशातून भोपाळ, इंदूर, निमाडमधून थेट बऱ्हाणपूर येथे आले. व तेथून खान्देशात आले. त्यांनी ठिकठिकाणी धर्मोपदेश केला.

Earlier this book says Imamshah was in Gujarat at the time of death of his father. It now says Imamshah came to Gujarat now.

This exposes that this book is written with lies to fit into some false narrative.

Imamshah never visited Khandesh. Satpanth was brought to Khandesh by Leva Patidars.

पूर्व व पश्चिम खान्देशमधून जात असतांना त्यांनी बराच शिष्यसंप्रदाय वाढविला. खान्देशमधून प्रवास करीत असतांनाचे वर्णन सद्भक्त नायाकाकांचा परमशिष्य गंगासिंह गोहिल यांनी काव्यरुपाने केलेले आहे. त्यातून महाराष्ट्राच्या परिसरात व विशेषत: सोनगढ लाछोरा भागात सद्गुरु इमामशाहा बरेच दिवस राहिल्याचा उल्लेख आढळतो. अशा प्रकारचा कोचरब मुक्कामाचा कथा प्रसंग वर्णिलेला आहे. त्यात गुरु महाराजांनी निजामाचा गर्वभंग केला.

अशा प्रकारे अनेक सद्भक्तांना मार्गदर्शन करीत, दुःखितांचे दुःख दूर करीत ते दक्षिणेतून पश्चिम सागर किनाऱ्याकडे वळले. नवसारी, सुरत, कानम, खंबायत, भावनगर, जुनागड, राजकोट-हून बडोदा व तेथून पेटलाद, देवा या भागात गेले. मध्यंतरी कानममधून जात असता विख्यात लुटारु " नाया " चा समागम झाला. आपल्या तपः सामर्थ्याने त्यांनी त्याच्यात परिवर्तन घडवून आणले व सन्मार्गावर आणले. ही सर्व कथा " नाया " च्या चरित्रात ऐकायला मिळते. त्यांचा अनेक जातीच्या लोकांशी संबंध आला. रमजु कसाई, गोजरी अहिरण, मनरवाजी अहीर एका ब्रम्ह – राक्षस – खविमाचा त्यांनी उद्धार केला. जुम्मा खुराशांनी या विख्यात फकिराशी धर्मचर्चा संबंध घडून आला. मलिक महंमद हाजी कालू मलिक शअबान, याकुतशाह, बाकर-भिस्ती, गायिका मायावती, बन्नासिंह हाडा, जंभासिंह, तुंवार मंडासेन, जुगल बनवारा, हिरजी नाविक, सेजलदे, सवदास, मौलाजादा, अलकीखान, मलिका हिराबाई वगैरे लोकांचा सहवास घडला. अनेकांशी धर्मनीतिबद्दल चर्चा, वादविवाद, संवाद झाले. कित्येकांना ज्ञानी बनविले. गोस्वामी तुलसीदास, चैतन्य महाप्रभू, गुरुनानकशाह, महात्मा दादुदयाळ, संत कबीर, संत साध्वी

मीराबाई तसेच कित्येक योगी महात्मा पुरुषांशी त्यांचा सत्समागम घडून आला त्यांचे वाङ्मय बहूतेक गुजराथी भाषेतूनच आहे. इमामशाहांचे शिष्य म्हटले म्हणजे संत नायाजी, संत भाभाराम, संत साध्वी कोकीबाई आणि संत शाणाकाका हे होत. त्यांच्या जीवनातील काही ठळक ठळक प्रसंग गंगासिंह गोहिल यांनी आलेखित केलेले आहेत. त्यातील काही प्रसंग –

योगी निरंजननाथ :

एकदा सद्‌गुरु इमामशाह महाराज पीराण्यास काही लोकां-समवेत सत्संग करीत असता, दुपारी एका महाप्रभावशाली पुरुषाचे आगमन झाले त्याचे नांव निरंजननाथ, सद्‌गुरुंनी त्यांचा आदरभाव करुन, सहभोजन घेतले आणि त्यांना आगमनाचे कारण विचारले. योगीराजने सांगितले की, पीरजी आपल्या दर्शनासाठी आलो होतो व गिरनारला महाशिवरात्रीला संत आणि सिद्धांचा महामेळा असतो त्यात दत्तात्रेयांच्या दर्शनाचा लाभ घडून आला तर फारच उत्तम म्हणून गिरनारला जायचे आहे जर आपण येथेच त्या महागुरुंचे दर्शन घडवित असाल तर गिरनारला जाण्याचे श्रम वाचतिल तेव्हा सद्‌गुरुंनी त्यांना सांगितले की, आपण ज्या सिद्धपुरुष महागुरु विषयी गोष्टी करीत आहात तो अमर पुरुष कोणाच्याही आधिन नाही की त्याला बोलावून घरबसल्या त्यांचे दर्शन घेऊ शकू. सद्‌गुरु म्हणाले "पीराना" जवळ हो गती नाही की त्या महायोग्याला येथे बोलावून तुम्हाला त्यांचे साक्षात दर्शन करवू शकेल ! योगीराज ! आपण ह्या महागुरुच्या दर्शनाला अति आनंदाने व प्रेमाने गिरनारलाच जावे. अशा प्रकारे योग्याला त्यांनी आपल्या गतीची मर्यादा दाखवून दिली व त्यांना गिरनारला जाण्याचा सल्ला दिला. योगीराज नम्रतेने उभे राहिले व इमाम-शहांचा प्रेमाने निरोप घेऊन तीन पावले जाऊन अंतर्धान पावले

सत्पुरुष नायाजी आपल्या परम शिष्यास गंगासिंहास म्हणाले हे गंगा ! ही तर अगम्य गूढ वार्ता आहे. योगी पुरुषाला प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी निरखणे व त्यांचा संग घडून ज्ञान चर्चा, वार्तालाप करणे फारच दुर्लभ योगाच्या गोष्टी आहेत जे योगी असतात तेच ह्या गोष्टी जाणू शकतात.

काळदूतांशी संवाद :

सद्‌गुरु नायाकाका गुरुलिलेविषयी सांगतांना गंगासिंहास म्हणाले, एकदा सद्‌गुरु इमामशाहांच्या संगतीत पीराण्यास बसलेलो होतो. मध्यरात्रीचा समय होता. अचानक लख्ख उजेड पडून त्या उजेडातून काळदूत प्रगट होऊन उभे राहिले त्यांचे स्वरुप भयानक होते. सद्‌गुरुंनी त्यांचा आदरभाव करुन त्यांना येण्याचे कारण विचारले, तेव्हा त्यांनी शांत चित्ताने सांगितले, हे सायाजी तुम्ही तर दयेचे सागर आहात. म्हणून मेलेल्या जीवात्म्याला सुद्धा सजीव करुन उठवून बसविण्याचा व्यवसाय मांडून बसलेले आहात. ही कार्यवाही बंद करा. हे सांगण्यासाठींच आमचे आगमन झालेले आहे. मृत आत्म्यास त्याच्या कर्मावर सोडून द्या. सद्‌गुरु इमामशाह म्हणाले, "हे देवदूत हो तुम्ही जे म्हणतात ते कदाचित खरे असेल पण माझ्याने तसे होऊ शकेल असे नाही. पीर आपली पीराई (परपीडा हरण करण्याचे व्रत) सोडण्यास कधीही तयार नाही. वाटलं तर हे जगत् सोडून जाण्याचा आदेश मिळाला तर तो आनंदाने स्विकारण्यास मी तयार आहे पण पीराईचा त्याग करु शकणार नाही. काळदूत पूणपणे त्याचा आशय समजून गेले. अत्यंत आनंदाने ते म्हणाले, " पीरजी ! तुम्हाला सत्याचा मार्ग दिसत आहे म्हणून तुम्ही दुसऱ्यांच्या दुःखाने पीडित होत आहात. कित्येकांना तर हा मार्गसुद्धा दिसत नाही. कारण की ते स्वतःच्या स्वार्थासाठीच जीवन जगतात. तुम्ही सत्याचे उपासक आहात तर

सदैव याच पवित्र मार्गाने वागा " असे म्हणून झुकून काळदूत विलय पावले.

नायाकाका गंगाजीस म्हणाले, गंगाजी ! हा प्रसंग तर सद्गुरुंच्या संगतीत बसून या डोळ्यांनी आम्ही न्याहाळला आहे.

फकीर जुम्माशाह :

एके दिवशी एक फकीर आला. त्याचे नाव जुम्माशाह. तो ज्ञानी फकीर सद्गुरुंच्या चरणाशी झुकून विनयाने खाली बसला व म्हणाला, "हे साई ! इतके वर्ष गेली आम्ही शोधून शोधून थकलो परंतु केव्हाही भगवंताचे दर्शन घडले नाही. कृपा करुन सांगा की ईश्वराचे दर्शन कोणत्या उपायाने होऊ शकेल ? माझ्या तर आयुष्याचा पैलपार आला, पण भगवंताने अजूनही या दीनदासावर दर्शन देण्याची कृपा केली नाही. या दुनियेचा त्याग केला पण दिलदार मिळाला नाही. साईने नाहक देह बनविला आहे. "

हे साई भगवंतांची भक्ती केल्याशिवाय केव्हाही शांती लाभणार नाही. तुम्ही एकाग्रतेने त्याची जिकीर करा म्हणजे तो परमात्मा एक दिवस जरुर येऊन मिळेल. सद्गुरु इमामशाहांनी फकीराला सत्य घटना सांगितली. ते ऐकताच फकीराने आपली चूक कबूल केली आणि म्हणाला " हे साई आपण सांगतात ते अगदी सत्य आहे. मी आता पर्यंत भक्तीचा मार्ग विसरुन गेलो होतो आणि म्हणूनच या दुनियेत खूप रखडलो. कोठेही सुख वा शांती मिळाली नाही. आता आपल्या चरणाजवळ आलो. आपण कृपा करुन सत्य मार्गावर आणले. मार्ग चुकलेल्या फकीराला आपण समज देऊन ताळ्यावर आणले.

गंगासिंह गोहिलवर सद्गुरु इमामशहांची करुणा :

गंगासिहांच्या मनात सद्गुरु [नायाजी] दर्शनाची भावना जागृत झाली व तो चितोडगडहून गुजराथेत आला. कुकसच्या संत धामामध्ये दाखल झाला. सद्गुरुचे दर्शन घडले. त्यावेळी सद्गुरु नायाजींनी सद्गुरुंचा महिमा वर्णन करुन सांगितला. तेव्हा सद्गुरु इमामशहांच्या दर्शनाची अभिलाषा त्याच्या मनात जागृत झाली म्हणून तो पिराण्यास आला. आणि पाहतो तर तो आपण ज्यांच्या दर्शनाकरिता आलो ते महापुरुष समाधिस्त झालेले आहेत. तो सद्गुरुच्या ध्यानास बसला. खरी प्रेमलागणी होती. बरोबर मध्य रात्रीस सद्गुरु इमामशाहा महाराज आले आणि त्यांनी गंगासिहास दर्शन दिले. त्या भाग्यशाली सद्भक्ताने सद्गुरु चरण पकडले आणि म्हणाला " हे नाथ माझा अनुराग खरा होता. म्हणून आपले दर्शन घडले. मी खरोखरच भाग्यशाली झालो. "

गंगासिहाच्या हृदयात अपार आनंद झाला व पर्यटन करीत करीत तो गुरुंच्या धामावर कुकसला येऊन पोहोचला. सद्गुरु नायाजींनी त्याचे हसत मुख निरखून घेतले व समजून गेले की गंगाजीने जे पाहिजे ते प्राप्त करुन आणले आहे. ते म्हणाले, " गंगाजी आज तुझे जन्माचे सार्थक झाले. तू दुसरे काहीच न मागता सद्गुरु लिलामृत मागितले यावरुन तूझे प्रेम खरोखरच धन्यतेस पात्र आहे. " तेव्हा गंगासिह म्हणाला, " गुरुदेव मला तर सद्गुरु लीलामृत–गुरुदेवाचे चरित्राचे पान करायचे आहे. मला ही गुरुलीला ऐकवा. " गंगासिह विनवू लागला.

सद्गुरु नायाजींनी गंगासिहास सांगितले, " गंगासिह तूझी ही इच्छा जरुर पूर्ण होईल. समय प्राप्त झाल्यावर तुझी ही लीला-

मृत श्रवणाची अभिलाषा मी तृप्त करीन. त्यायोगे तुझ्या हृदयात सुख व शांती प्राप्त होईल.

मानसिंगजी महिडाच्या शंकेचे समाधान :

महीकाठाहून मानसिंगजी महिडा नावाचा राजपूत सद्गुरुंच्या दर्शनाला आला. विनयाने म्हणाला, " स्वामीजी, आपल्या विषयीलोकांमध्ये अशी वंदता आहे की, पीर इमामशाह मोमीनला शिष्य बनवित नाही फक्त हिंदूनाच शिष्य बनवून त्यांना 'दीन" चा बंदा बनवतात. जर तुम्ही खरोखर अशा गोष्टींना प्राधान्य देऊन स्वतःस धन्य समजत असाल तर त्यात भलाई नाही.

कोन हिंदू कोन मुसलमान, साहिब घर आये मेहमाना ।।
साच पेखो ओर हक बखानो, सोई साईके बने दिलजानो ।
हिंदवा सोही इमान बखाने, हिंदवा रहे सोई गुणखाने ।।
जात पात साथा घर नाही, भेद अभेद दिखे कबू नाही ।।

" मानसिंगजी " तुम्ही जी गोष्ट सांगतात ती कदाचित बरोबर असेल पण मला हे नाही समजत की, कोण हिंदू, आणि कोण मुसलमान ? भगवंताने बनविलेल्या या दुनियेत आपण सर्वच मेहमान आहोत. येथे राहून सत्याला ओळखा. ईश्वरनामाचे स्मरण करा. अशीच माणसे ईश्वराचे दिलजान बनतात. बाकी जे हिंदु आहेत ते आपल्या स्वधर्माचे आचरण करुन आपले हिंदुत्व कायम राखतात. माझ्या उपदेशाने ते काही मुसलमान होत नाहीत. असा जातीजातीचा भेद तर लोकांनी निर्माण केला आहे. पण ईश्वराच्या दरबारात कोणताच भेद नाही.

आम्ही तर नामाशी स्नेह जोडणारे आहोत. आम्ही हाच उपदेश देतो की तुम्ही या भगवंताच्या नावाशी आपले नाते जोडा.

आमचा हा उपदेश भलेही ज्यांना पसंत नसेल त्याने मानू नये. मानसिंगजी जो गुणवान असतो तो समजू शकतो. योगियाची वाणी ज्ञानीजनच समजू शकतात. दुसऱ्यास त्याची गोडी नसते नायाजी सांगतात कीं गुरुचा उपदेश हाच आहे की तुम्ही उठता, बसता, निजता, खातापिता, काम करतांना भगवंताचे नामस्मरण कधीही विसरु नका. सद्गुरुचा उपदेश श्रवण करुन मानसिंगजी शांतचित्ताने आपल्या मनातील शंकेचे समाधान करुन घेऊन माघारी परत फिरला.

Earlier this book said Imamshah never preached to Muslims. But at this point this book says Imamshah had muslim followers.

This proves again that the author have made changes to suit some false narrative i.e., Satpanth is Hindu religion.

सद्गुरु इमामशाहांचा दरबार :

सद्गुरु इमामशाहांचा दरबार या डोळ्यांनी पाहून मी धन्य झालो. हे गंगाजी मी स्वतः त्यांच्यावरुन ओवाळून घेईन अशाप्रकारचा तो दरबार खरोखर अवर्णनीय होता. त्यात हिंदू, मुसलमान सर्वच जातीचे, धर्माचे, वर्णाचे लोक येऊन सद्गुरु सन्मुख बसून अमृततूल्य उपदेश ऐकून विशुद्ध अंतःकरण रुप बनून जात. तसेच योगी सतानंदजी, योगी हारितनाथ, योगी दिगंबरदास असे कित्येक सत्पुरुष महानयोगीवर संत धामावर येऊन गेले. त्यांची परम पावक चरित्रे श्रवण करुनच इमामशाहांच्या हृदयात अपरिमित आनंद दाटून आला.

ईश्वर अजात आहे. त्याच्या दारी कोणी उच्च कोणी नीच नाही. कोणी लहान कोणी मोठा नाही. केवळ एकच गोष्ट महान आहे आणि ती म्हणजे " एकमेव ईश्वराचे स्मरण " ह्या शिवाय कोणतीही गोष्ट महान नाही. सर्व उपाधीचा त्याग करुन तुम्ही ईश्वराची निर्मल विशुद्ध अंतःकरणाने भक्ति करा. त्याशिवाय कधीच तुमचा उद्धार होण्यासारखा नाही. वादविवाद, तर्क, कुतर्क सोडून भक्ती करा. भगवंताला नित्य ओळखा. हा मानव देह फार दुर्लभ आहे. तो वारंवार मिळू शकत नाही ज्ञानी पुरूष ही गोष्ट

मान्य करतात. पण जे अज्ञानी असतात ते मात्र स्वतःच्या अभिमानाच्या गोष्टी करतात. स्वतःच्या विद्याबलाभिमान याने नथ्थम जोगी, हुबलसेन वगैरे मुख्य होते, त्यांनी सद्गुरु महाराजांवर आपल्या इलम-विद्येचा प्रयोग करु लागले पण सद्गुरुंवर त्यांच्या विद्येचा काहीच परिणाम होत नव्हता. ते सर्वजण खजिल झाले व सद्गुरु चरणावर लीन झाले. हा पीर फकीराचा दरबार होता. त्याचा कोणीही पार पाऊ शकेल असे नाही. नायाजी विशुद्ध अंतःकरणाने सद्गुरुचे यशोगान गात आहे. अशाच रितीने गंगाजी सद्गुरु चरणी लीन होऊन खरी शांती अनुभवताहेत. सद्गुरु चरणा समान अखंड सुखाचा आस्वाद कोठेही प्राप्त होत नाही

सद्गुरु इमामशाहा आणि सुलतान मेहमुद बेगडा :

एके दिवशी अहमदाबादहून सुलतान मेहेमुदाचे आगमन झाले. सद्गुरुंनी विचारले, " पातशाह " आपले आगमन कशाकरिता झाले हे समजले तर माझ्या मनाचा संशय दूर होईल. सुलतान म्हणाला, " पीराणा आपणास एक प्रश्न विचारायचा आहे तो असा की, तुम्ही " दीन " च्या बंद्याविषयी तोंड का फिरविता, तुम्ही केवळ हिंदूनाच शिष्य बनवितात पण मुसलमानांना जवळसुद्धा बसू देत नाहीत. मला ही गोष्ट फार खटकते. तुमच्या हृदयात ' दीन " च्या बंद्याविषयी असा अभाव का उत्पन्न होतो ? "

इमामशाहा म्हणाले, " खरी गोष्ट अशी आहे की, मुलतानला मी प्रतिज्ञा केलेली आहे कि आजपासून मी कधीही मुसलमानांना शिष्य बनविणार नाही. केवळ हिंदूच माझे शिष्य होतील. सुलतान मेहेमुद म्हणाले, " हे सायाजी साऱ्या शहरात चर्चेचा विषय झाला आहे. मी आपली निंदा ऐकली तेव्हापासून हृदयात व्यथा निर्माण झाली. पीर इमाम विषयी लोक काय

See page 48 to find the falsehood

False statement Hazaj Beg his personal assistant and shishya was muslim till death.

If Satpanth was "real" religion they why Muslims are kept away?

For a preacher of religion, followers from all religions should be welcome.

अपप्रचार करीत आहेत. खरी गोष्ट समजावून घेण्याकरिता मी तुमच्याकडे आलो आहे. माझी तुम्हाला एक प्रार्थना आहे की तुम्ही " दीन " पासून कधीही मुख फिरवू नका. एवढी कृपा तर जरुर करावी लागेल. " इमामशाहा म्हणाले मी " दीनजनांना " म्हणजे मुसलमानांना शिष्य बनविण्यासाठी साफ इन्कार करतो आणि म्हणूनच माझी निंदा होत असेल आणि " दीन " चे लोक मला गुन्हेगार म्हणून ओळखत असतील तर ती चूक आहे. एकदा मी वचनबद्ध झालेलो आहे. मी शब्दांचे पालन करणे हे माझे कर्तव्य आहे. हिंदू माझे आहेत आणि मी हिंदूंचा आहे. " दीन " ला माझा लेशमात्र इन्कार नाही.

See here the book proves muslim rules were not against Satpanth.

This means the author's observation in the beginning that Muslim rules were against Satpanth is false and an after-thought

सद्गुरु इमामशाहांचे हे स्पष्ट वचन ऐकून सुलतान खरोखर शांत झाला. " माझ्या हृदयात जो एक नासमझपणाचा अंश होता तो आता पार निघून गेला आहे. " असे म्हणून विनयाने झूकून बादशाह मेहमूद परत फिरला. या प्रसंगाचे वर्णन करीत असता संत नायाजींचा पट्टशिष्य गंगासिंह गोहिल म्हणतो की हा प्रसंग मला माझ्या सद्गुरु नायाजींनी कथन करुन सांगितला आणि त्या आधाराने मी त्या प्रसंगाचे वर्णन करीत आहे.

संत इमामशाहा आणि संत निर्वाण साहेबांचा समागम :

संत निर्वाण साहेब मारवाडच्या जायल गुरुद्वाराहून वि. स. १५३७ मध्ये सुरतला आले. सुरतच्या नखरेबाज नबाबीच्या मदाचे मर्दन करुन नबाबी महालयासमोरील पटांगणात आपले विशाल स्थान बनविले. संत, योगी, पीर, वलींच्या दर्शनाचे निर्वाण साहेब अनुरागी होते. तेथे इमामशाहांशी त्यांचा समागम घडला. त्या प्रसंगाचे वर्णन केले आहे.

सुफी-संत इमामशाहाचे मुलतानकडून आगमन झाले.

गुजराथमध्ये आल्यावर अहमदाबादच्या सुलतान मेहमुद बेगडयाने त्यांची कसोटी घेतली. खऱ्या सोन्याप्रमाणे जनतेने या महापुरुषास ओळखले व त्या प्रभावाचा सुगंध सर्वत्र दरवळला. संत निर्वाण-अहमदाबादला आले तेव्हा प्रथम हजरत शाह आलमच्या दर्शनास गेले. त्यानंतर सद्गुरु इमामशाहांच्या दर्शनाची त्यांना उत्कंठा लागली. इमामशाहांचे विचार व आचार शुद्ध पवित्र जाणून व ज्ञानदानाची अगाध शैली जाणून लोक त्यांना वली या महापुरुष रुपानेच ओळखत असत, त्यांच्या या गुणामुळेच निर्वाणसाहेब त्यांच्या दर्शनास पीराणा येथे गेले.

सद्गुरु इमामशाहा म्हणाले, "संत निर्वाणजी आपण रामाचे चाहते आहात म्हणून रामावर प्रेम करतात, कोणी कृष्णाचे चाहते, तर कोणी रहमानचे चाहते असतात. परंतु दुनियेला उत्पन्न करणारा एकच साई, ईश्वर, खुदा आहे. लोक त्यासच वेगवेगळया नावाने हाक मारतात. जगाची बुद्धीच द्वैती बनलेली आहे. दोघांचा मालक एक दोन कधीही नव्हते आणि असणार नाही. अशा मार्ग चुकलेल्यांना आपण मार्गावर आणतात, आणि हे कार्य करीत असता एका फकीराशी आपला एवढा अनुराग जागला ही खूपच आनंदाची गोष्ट आहे निर्वाणजी आपण महान संत पुरुष आहात. निर्वाण व इमामशाहा तुम्ही व मी एकच आहोत. दोघांचा रस्ता पण एकच आहे. मी धर्माचा पावन प्रचाराचा महत्वाचा भाग बजावित आहे तर आपण अत्यंत निःपक्ष, निरपेक्ष रितीने जगताची सेवा करीत आहात. आपण कोणत्याही विशिष्ट आशयाच्या धर्माच्या आवरणापासून दूर – मुक्त राहून सेवा करतात. म्हणून आपणास "निर्वाण साहेब" म्हणतात. दोघांचा बराच वेळ वार्तालाप झाला. इमामशहांच्या पायावर लोटांगण घालून त्यांनी जड अंतःकरणाने निरोप घेतला.

Stage 2 of religious conversion, where it is preached that All-mighty is one. All religions are same etc.

Book: Nirvan Charitra Prakash

हा पावन प्रसंग आलेखन करणारा ब्राह्मण "कवी दुला-राम" ने "निर्वाण चरित्र प्रकाश" नामक ग्रंथात लिहिलेले अंतिम शब्द हृदयात ठसतात. ते म्हणतात की, तो दिवस केव्हा उगवेल की असे पीरफकीर आणि महान संत, पुरुष, वली, योगी, महात्म्याचे दर्शन घडण्याचा योग प्राप्त होईल.

Hazar Beg is renamed as Hazar Veer to give Satpanth a Hindu look

सतपंथातील दुसरे सत्पुरुष : संत हाजरबेग :

सद्गुरु इमामशाहांच्या शिष्यवर्गात पाच प्रमुख शिष्य झालेले आहेत. १) हाजर बेग २) नायाकाका ३) भाभाराम ४) कीकी बाई ५) शाणाकाका हीं त्यांची नावे होत. यांच्यापैकी हाजरबेग हा दिल्लीच्या शाही कुटुंबातील एका प्रमुख दासीचा मुलगा. गुरु इमामशाहांच्या दिल्लीच्या प्रवासा दरम्यान त्यांच्या दैवी शक्ती-च्या प्रभावाने प्रभावित होऊन त्यांच्या सेवेने प्रसन्न चित्त होऊन "हाजर बेग" ह्या संबोधनानेच सद्गुरु इमामशाहांनी त्याला गौरविले.

Shahi Family = Muslim family

कित्येक ठिकाणी असा उल्लेख आढळतो की इमामशाहा हे इराणमधून येत असतांना अफगाणिस्तानातील एक सेवक त्यांच्या बरोबर आला तोच हाजरबेग होय. दंतकथेप्रमाणे हा सेवक त्यांच्या सेवेत सदैव फार तत्पर असे म्हणून त्याचे नाव हाजरबेग असे पडले. दुसरे असेकी इराणच्या काही भागात "हाजरा" नावाच्या भटक्या लोकांची टोळी असते. त्यांच्यातील एक इमाम-शाहांवर प्रभावित होऊन तेथूनच त्यांच्याबरोबर त्यांच्या सेवेत लागला, असावा अशी वदंता आहे.

इमामशाहा महाराजांनी त्यांच्या अंतिमप्रयाण समयी हाजर बेगला सांगितले की, माझ्या निर्वाणानंतर तुझा मृत्यू होईल आणि पीराणा येथील दर्ग्याच्या समोर वीस पावलावर तुझे दफन होईल.

उन्हाळयातील भर दुपारच्या वेळी अतिशय उन्हात सुद्धा तुझी कबर थंड राहील. माझे सर्व अनुयायी सर्व प्रथम तुझ्या कबरेवर पुष्पहार चढवतिल तेव्हाच माझ्या दर्ग्यात प्रवेश करतील. " अशा प्रकारचा आशिर्वाद देऊन सद्गुरु इमामशाहा महाराजांनी त्यांना गौरविले. आणि खरोखरच इमामशाहांच्या निर्वाणा नंतर हाजर बेगचे निर्वाण झालेले आहे. खरोखरच हाजरबेगची कबर भर उन्हाळयात दुपारच्या वेळी सुद्धा थंडगारच राहते व सेवक प्रथम हाजरबेगलाच फुले चढवून आत सद्गुरुच्या दर्शनास जातात.

There is no bog logic here. The tomb of Hazar beg is surrounded by Marble tiles. Marble has a natural property where by it remains cooler compared to other stones/tiles. Hence his tomb is cooler compared to other areas nearby the tomb.

हाजरबेगच्या कबरीमधून अद्याप सुद्धा बरेच दैवी चमत्कार अनुभवास येतात. कबरीवर नेहमी गलफ (वस्त्र) घातलेला असतो. सत्पंथी अनुयायां शिवाय अन्य लोकांतसुद्धा त्यांचा बराच प्रभाव पसरलेला आहे. कित्येक लोक त्यास हनुमंताचा अवतार समजतात.

Attempt to give hindu link

सद्गुरु इमामशाहा महाराजांना बाई बुढाई नावाची एक बहीण होती. सद्गुरु महाराजांच्या आज्ञेने हाजरबेगने तिला सत्पंथाचे सारे रहस्य समजावून सांगितले. इमामशहांच्या आज्ञेनेच तिने हाजरबेग कडून दीक्षा घेतली होती. एक विश्वासु धर्मोपदेशक म्हणून सुद्धा हाजरबेगने उत्तम कामगिरी बजावलेली आहे. हाजरबेग त्या काळातील एक असाधारण कोटीतील प्रभावशाली. तत्वनिष्ठ सुफी संत होते.

धन्य तो हाजरबेग, धन्य ते सत्पंथाची सद्भक्ती ॥
धन्य त्यांची गुरुभक्ती ॥।

सत्पंथातील तिसरे सत्पुरुष : संत नायाकाका महाराज :

गुजराथमधील कानम जिल्ह्यातील " ठाकरडा " कुळात

नायाकाकांचा जन्म झालेला होता. कित्येक लोक त्यास भिल्ल किरात जातीचा समजतात. पण कवी बन्सीलालच्या नोंदीत ठाकरडा कोळी म्हणून नोंदलेले आहे. [ठाकरडा कोळी म्हणजे राजपूत पुरुषाने कोळी कन्येशी विवाह करुन झालेल्या संततीस ठाकरडा म्हणतात.] त्याचे वाडवडिल लुटमारीचा धंदा करीत व उदर निर्वाह चालवित. नाया देखील तसेच काम करीत असे. तो कोणा वरही दया दाखवित नसे.

एकदा संवत १५१५ कार्तिक वा।। १ च्या दिवशी म्हणजे इ. स. १४५८ च्या सुमारास सद्गुरु इमामशाहा महाराज आपला परमशिष्य हाजरबेग यास बैलगाडीने घेऊन कानम जिल्ह्यातील चांदोद गावी जाण्यास निघाले असता कानमच्या निबिड अरण्यात नायाने त्यांची गाडी अडविली. सद्गुरु इमामशाहांनी नायाकडे एक नजर टाकली व ते अंतर्यामी समजून गेले की हा पूर्वकर्माने दोषित झालेला आपलाच मित्र आहे याला सरळ मार्गावर आणणे आपले कर्तव्य आहे. असा विचार करुन सद्गुरु त्यास म्हणाले, " नाया अरे मी तर फकीर आहे. मजजवळ पैसा अडका तर नाही. पण तुला खरोखरच धनवान व्हायचे असेल तर तू ही जी लूटमार करुन पैसा मिळविलो त्या पापाचे धनी तुझे कुटुंबीय आहे की नाही हे तू त्यांना विचारुन ये तो पर्यंत आम्ही इथेच थांबतो.

नाया त्याचप्रमाणे घरी गेला. त्याने आपले वडील पशुर, बहीण गंधोर, मुलगी धीरज, बायको केशर या सर्वांना पापात सहभागी होण्याबद्दल विचारले पण त्या गोष्टीस कोणीच कबूल झाले नाही. हे पाहून नायाचे हृदय एकदम पालटले. सद्गुरु महाराजांजवळ येऊन त्याने पश्चात्ताप करुन हा नीच व्यवसाय सोडण्याबद्दल आणि सद्गुरुंच्या सेवेत दाखल होण्याबद्दल प्रतिज्ञा

केली. सद्‌गुरुंनी त्यास ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला. त्याची सर्व आंतरिक स्थितीच पालटली गेली. क्षणात सर्व अज्ञान-अविद्या नष्ट होऊन ज्ञानोमय प्रकाश पसरला. ज्ञान-अज्ञान, दर्शन-अदर्शन, या दोनही वृत्ती सोडून जे ब्रह्मस्वरुपी लीन राहिलेले असतात ते केवळ ब्रह्मवेत्ता नाही पण साक्षात ब्रह्मस्वरुप परमात्माच असतात. अशाप्रकारचा अभेदभाव नायाच्या हृदयात जागृत झाला. सद्‌गुरुंनी नायाला सांगतले. दुनियेतील दुःख दूर करण्यासाठीच महापुरुष पृथ्वीवर अवतरतात. तू योगी आहेत मानव कल्याणाकरिता सतत प्रयत्न करावा. अन्य आत्मियांना या मार्गावर आण.

संत नायाजी एकदा उत्तर गुजराथमधील पाटण शहरात आले तेथे भूमानंद नावाचा ब्राह्मण स्नान करुन मंदीरात जात असता त्याला नायाजींचा स्पर्श झाला. तो नायाजीस अद्वातद्वा बोलू लागला. तरीही नायाजी शांतच. ब्राह्मणाचे पित्त खवळले त्याने नायाजीला थप्पड मारली तरीही ते शांतच होते. ही संत पुरुषाची सहनशीलता पाहून ब्राम्हणाचे हृदय द्रवले. आणि तो नायाजीच्या चरणावर पडला. भूमानंद ब्राम्हण नायाजींचा भक्त झाला.

अशाच प्रकारे पालनपुरला जाऊन संभाजी राजाला त्यांनी उपदेश केला. लुणावडा येथील उदोजी राणा, राजपिपला येथील राजा प्रभूराज, चांपानेर येथील राजा पताई रावळ, धरमपूर येथील राजा जगतसिंह वगैरे राजेमहाराजांच्या भेटी घेऊन "सत्" धर्माचा प्रचार केला.

एके दिवशी रात्रीच्या प्रहरी जुनागढ शहरात फिरत असता तेथील मुसलमान राजा तातार खान घोरीच्या सैनिकांनी त्यांना सैतान समजून अटक केली. तीन महिनेपर्यंत कोणीही विचारपूस

न करता त्यांना अंधार कोठडीत डांबून ठेवले. बरोबर तीन महिन्यांनी तातारखानला भयानक स्वप्न पडले. काळाच्या चार दूतांनी त्याला खूप मारले व त्याला जतविले की, काळकोठडीत तू एका संत पुरुषाला डांबून ठेवले आहेस त्याला मुक्त कर नाही तर तुझा काळ आजच पुरा होईल. तेव्हा त्याने ताबडतोब चौकशी करुन त्या संत पुरुषाचे पाय धरले व क्षमा मागितली. तेव्हा नायाजींनी कठोर शब्दात कल्याणाचाच उपदेश देऊन आशिर्वाद दिला व सांगितले, तातार ज्या दिवशी तुझ्या कडून अथवा तुझ्या वशजाकडून अशा संत पुरुषाचा अपमान होईल त्या दिवशी जुनागढहून तुझी राजगादीच नष्ट होईल तोपर्यंत तुम्ही सुखाने राज्य कराल.

संत नायाजी गिरनार पर्वतावर ध्यानमग्न झाले. गुरु गहेनी नाथांचा तेथे समागम झाला त्यांच्या सान्निध्यात योग साधना करुन प्रभू साक्षात्कार व गुरुदेव दत्तात्रेयाचे दर्शन घडून आले. संत नायाजी जेथे गेले तेथे त्यांनी परमपावन उपदेश करुन लोकांना युगधर्माची माहिती देऊन वेदान्तिक सिद्धान्तानुसार ईश्वरानुसंधान करण्याचा मार्ग दर्शविला. अशा रितींने परिपूर्ण पंचवीस वर्षपर्यन्त आपले हे पर्यटनाचे कार्य करुन संत नायाजी परत गुजराथेत आले असता त्यांना सद्गुरु इमामशाहांचा समागम घडला. “ नायाजी तू सतत पंचवीस वर्षापासून मानव कल्याणाच्या पावनपथाचे विचरण केलेस. आता तू शांतचित्ताने एकाच ठिकाणी, कुकस येथे तुझे स्थान बनव व जनतेचे दुःख दूर कर. इमामशाहानी नायाजीला आज्ञा केली. कुकस गावी विक्रम संवत् १५४१ मध्ये म्हणजे इ. स. १४८४ च्या सुमारास संत नायाजीचे आगमन झाले. तेथील साऱ्या भाविक जनतेने त्यांचा आदरसत्कार केला पण यवनांनी मात्र त्यांचा अनादर करुन निघून जावे म्हणून प्रयत्न केले पण

तरीही नायाजी शांतचित्ताने जनतेची सेवा करीत राहिले.

एके दिवशी नायाजी शांतचित्ताने ध्यानमग्न बसले असतांना अचानक गेबीनाथांचे आगमन झाले. सिद्धपुरुष गेबीनाथ म्हणाले, नायाजी तुझ्या पूर्वभवातील तुझे तारक गुरु सोहंनाथ महाराज तुला शोधत तुझ्या जवळच आलेले आहेत. एवढी सूचना देऊन गुरुगेबीनाथ अंतर्धान पावले. नायाजींनी ताबडतोब सुरतेस प्रयाण केले, तिथे शोध केल्यानंतर सुद्धा सोहंनाथ गुरु महाराजांचा शोध लागला नाही, शेवटी उत्तर खंडामधून " निर्वाण " नावाचे एक योगी पुरुष आल्याचे समजल्यावरुन नायांजी तेथे गेले. पूर्वी सोहंनाथ होते ते हल्ली " निर्वाण " होऊन मानवाच्या कल्याणा करीता आले. साधुसंत अशा रितीने जनतेचा विचार करतात. सोहंनाथ [निर्वाण] महाराज म्हणाले, " नायाजी तू पूर्ण योगी पुरुष आहेस म्हणून सदा सर्वदा लोककल्याणाचा वचार कर. सोहनाथ–निर्वाणाच्या चरणी वारंवार लागून प्रणाम करीत संत नायाजी विनवू लागले, " दयानिधी " या दीन नायावर सदैव करुणा करावी. माझी हीच याचना आहे. "

नंतर वसो गावाजवळ येताच एका योगी पुरुषाची आठवण झाली. व दैवयोगाने त्यांची मार्गातच गाठ पडली. तो योगी म्हणजे भाभाराम होय. तो पूर्वभवातील योगभ्रष्ट योगी होता. ह्याच योगी भाभारामाच्या दर्शनाकारत्ता योगी नायाजी आले होते. दोघा योग्यांचे वाटेतच मिलन झाले. आनंदाचा पूर उमटला. भाभारामला सद्‌गुरु इमामशाहा महाराजांची तीव्रतेने भेट घेण्याची इच्छा झाली. तेव्हा नायाजी म्हणाले, " प्रिय भाभा, मनुष्याच्या आत्मोन्नतीचा समय येताच सद्‌गुरु आपण होऊनच सद्‌भक्ताला शोधीत येतात. " नायाकाकांच्या मुखातून हे शब्द बाहेर पडतात तोच समोरुन सद्‌गुरु इमामशाहा महाराज आपल्या

परमसेवक हाजरबेग सह बैलजोडीने येत असतांना दिसले. दोघांनी धावत जाऊन गुरु चरणी दंडवत पडले. सद्गुरुंनी त्यांना स्वतःच्या हातांनी उचलून हृदयाशी लावले व त्यांच्याशी योगवशिष्ठय आणि अथर्ववेदीय योग साधने विषयी बरेचसे वर्णन केले. व थोडया दिवसांनी एकमेकांचा निरोप घेतला.

संत नायाजींच्या दिव्य शक्तीने अनेक चमत्कार नकळत घडून आले. संताला त्याची शुद्ध नसते. कारण ते अतिंद्रिय ज्ञानाने ईश्वराशी तादात्म्य पावलेले असतात भगवंताची चिद्शक्ती अशा महात्म्याकरवी कार्य करवून घेत असते. त्यालाच आपणच चमत्कार म्हणतो. अशा प्रकारच्या काही दैवीलीला संत नायाजीं-करवी झालेल्या आहेत. अन्न सत्राचे भांडार अखूट राहणे, दुष्काळाचे निवारण होणे कॉलरा निर्मूलन होणे, असाध्य रोग्यास सुआरोग्य प्राप्त होणे, महारोगाने पीडलेल्यास रोगमुक्त करणे, गणिकेचा उद्धार करणे, भाविकेला भक्तीपारायण करणे, सुलतान मेहेमुद बेगडया सारख्या करडया राजासुद्धा स्तंभित करणे गेहाजी सारख्या लुटारुस सन्मार्गावर आणणे वगैरे चमत्कार त्यांच्याकडून घडले. हे सर्व त्यांचा परमसेवक गंगासिंह गोहिल या चितोडगड येथील भक्ताने शब्दांकित केलेले आहे.

एके समयी नायाजींनी जनतेला आपण आता समाधी घेणार आहोत असे सांगितले, तेव्हा जनता अतिशय व्यथित झाली. त्यांनी परोपरीने विनविले की, एवढयात समाधी घेऊ नका. नायाजींना जनतेच्या हितासाठी एक वर्ष पृथ्वीतलावर राहण्याचे ठरविले. शेवटी भाद्रपद शुद्ध बीजेच्या दिवशी समाधी घेण्याचे ठरविले. सर्व जनसमुदाय त्यांच्या भेटीला लोटला. आपली व्यथा ते नायाजींना सांगू लागले. नायाजी म्हणाले तुम्ही असे समजता

कि मी येथून प्रयाण केल्यानंतर तुमच्यापासून दूर जाईन पण मी सदासर्वदा तुमचाच होऊन राहीन. आजही मी तुमच्यातच आहे, तुम्हाला काय मागायचे ते मागून घ्या." धन, दौलत, पुत्र, जमीन सुख वगैरे ज्याला जे मागायचे होते ते त्याने मागितले. काही सद्भाग्यांनी वैराग्याची मागणी करताच ते त्यांना मिळाले.

संत नायाजी समाधीस तयार झाले. सर्व आम जनता रडत होती. त्यांचे ते प्रेम पाहून निर्मोही संत नायाजींच्या डोळ्यातून गंगा-यमुना सुरु झाल्या. गंगासिंह गोहिल तर बालकाप्रमाणे रडत होता त्याची ही दशा पाहून संताच्या हृदयात कटचार लागावी त्याप्रमाणे ते घायाळ झाले व त्यांनी गंगासिंहांची समजूत घातली संत नायाजींनी स्वतःच्या हाताने आचार्यतिलक केला. आणि हात पकडून आपल्या गादीवर बसविले व म्हणाले, " गंगाजी तू या संत धामाचा सांभाळ करावा. सद्गुरुंच्या प्रतापाने तुला सदैव सुख आणि शांती प्राप्त होईल.

संवत् १५८९ च्या भाद्रपद शुद्ध बीजेच्या दिवशी संत नायाजी समाधिस्त झाले. एक योगी पुरुष अवनीतलावर आला आणि परहिताकरीता अगम्य लिला करुन लोकांचा लाडका बनलेल्या मेहमान संताने यालोकांमधून महाप्रयाण केले. संत नायाजींचे चरित्र आलेखन करणारा शाहीर बन्सीलाल शेवटी म्हणतो, संत नायाजी पद्मासन घालून समाधिस्त बसले. समाधी स्थानात त्यांच्या आदेशानुसार समाधी बनविण्यात आली. संताचा जयजयकार करीत मानव मेरु संतधामामधून हळूहळू विरळ झाला. गंगासिंह मात्र आसनावर बसून अश्रू ढाळीतच होता. सद्गुरुंचे हृदय द्रवले. ते आले गंगाजींला भेटले. वियोगीनीला पती मिळावा त्याप्रमाणे सद्गुरु आणि शिष्याचे पूनर्मिलन झाले. गंगाजीच्या हृदयाला शांतता मिळाली.

सतपंथातील चौथे सत्पुरुष : संत भाभाराम महाराज :

सत्पंथ प्रवर्तक सद्गुरु श्री इमामशहांच्या सद्भक्त मालिकेतील तिसरा भक्त संत भाभाराम महाराज होय. गुजराथमधील चरोतर परगण्यातील म्हणजे हल्लीच्या खेडा जिल्ह्यातील "वसो" या गावी पाटीदार ज्ञातीत "कांझा" कुटुंबात केशवदास नावाचे कुलवान गृहस्थ राहात असत. ते धर्मनिष्ठ राजपुरुष होते. त्यांचा बादशाही दरबारात खूपच मान न दबदबा होता. त्यांची विमलादेवी नावाची पतिव्रता शीलवान पत्नी होती. ती सुद्धा धर्मपरायण होती. उभयतानी तीर्थयात्रा बऱ्याचशा केलेल्या होत्या. जीवीबाई नावाचे एक कन्यारत्न होते. घरात बरेच नोकर चाकर होते, पण अतिथी संत अभ्यागताचे ती स्वतः आपल्या हाताने आतिथ्य सत्कार करी.

विमलादेवी एके दिवशी खूप आजारी पडली आणि चिरनिद्रेत पडली. घरात शोककळा पसरली आणि त्याचवेळी बाहेरुन एका महापुरुषाची " गंगामैया " अशी हाक आली. सेवकाने येऊन सांगितले, 'महाराज, ज्या गंगामैयाला आपण हाक मारता आहात त्या कधीही उठू शकणार नाही. अशा मरण शय्येवर पडलेल्या आहेत. सेवकाचे शब्द ऐकताच महापुरुष आत गेले आणि कमंडलूतील पाणी विमलादेवीवर शिंपडले आणि म्हणाले, " गंगामैया येथून कोठेही जाऊ नकोस, येथून जर गेलीस तर संत अभ्यागताचा सत्कार कोण करील ? माते ऊठ. असे म्हणून जोराने तीर्थ तिच्या मुखावर शिंपडले तो काय आश्चर्य विमलादेवी झोपेतून जाग्या झाल्याप्रमाणे ऊठून बसल्या त्या संताच्या चरणावर झुकल्या, त्या संताने विमलादेवीला आशिर्वाद दिला आणि निघून गेले. ते कोठे गेले हे मात्र समजले नाही.

केशवदास धर्मपरायण असल्यामुळे साधुसंतांच्या सेवेकरीता पुनः काशीला गेले. एकदा कुंभमेळव्याच्या ठिकाणी हरिद्वारला जाऊन त्यांनी संत पुरुषांची खूप सेवा केली. त्यापैकी एका महापुरुषाने त्यांची ती वृत्ती पाहून त्यांना आशिर्वाद दिला. "बेटा, केशवदास तुझ्या घरी एक योगी अवतार धारण करील. आणि तुझे कुळ उज्वल करील. तो महान प्रभावी आत्मा लोककल्याणा साठी अवनीतलावर अवतरील. तुझे जीवनसुद्धा धन्य होईल तुझे कल्याण होवो असा आशिर्वाद दिला. त्यांनी त्या महापुरुषाला दंडवत करुन ते थेट वसोला आले.

काही काळानंतर विमलादेवीला गर्भ राहिला. तिचे सारे चित्त ईश्वर भजनाकडे आणि संत महात्म्यांच्या सेवेकडे लागले. महापुरुषाचे शब्द खरे ठरले. वि. स. १५०५ मध्ये माता विमलादेवीला एक सुंदर तेजस्वी बालक झाले. आकाशात मंगलवाद्ये वाजू लागली. चंदनव पुष्पवृष्टी झाली. केशवदासाच्या अंगणात सनई चौघडा वाजू लागला. याचकांना तृप्त केले, चारण, भाट, ब्राह्मण वगैरेंना अपार दक्षिणा दिली. पुरोहितास पाचारुन नामाभिधान केले. "भाभाराम" हे पवित्र नाव ठेवले.

बालपणापासून देवधर्म व मंदीराकडे ओढ पाहून केशवदासांना समजूत आले की महापुरुषाच्या कृपाशिर्वादाप्रमाणे आपला हा बालक योगीच असावा. पाच वर्षाचा झाल्यावर त्याला शाळेत घातले. पूर्वभवी सुसंस्कारी असलेल्या त्या प्रगत आत्म्याला जागविण्याची गरजच पडली नाही. लौकिक दृष्टीने शाळा शिकून लवकरच त्याने सर्व विद्यात प्राविण्य मिळविले.

तारुण्यात पदार्पण करताच भाभारामचा पेटलाद येथील पेथाभाई पटेल यांच्या सुंदर कन्येशी रोहिणीशी विवाह झाला.

त्यांच्या स्वर्गासमान संसारात एका गोंडस मुलाची प्राप्ती झाली. मुलाचे नाव शंकर ठेवले. अशा आनंदी संसारात अचानक एक संकट आले. केशवदास मरणासन्न झाले. व थोड्याच दिवसात त्यांना स्वर्गातील बोलावणे आले. सती विमलादेवीने पती पाठोपाठ स्वर्गारोहण केले. भाभारामाला हा दारुण वियोग अगदी असह्य झाला, तो विरक्त झाला. त्याने अनेक तलाव, विहिरी, बांधलया. गोरगरीबांसाठी मोफत औषधोपचार केंद्र सुरु केले. लहान बालकांसाठी पाठशाळा काढल्या. तीर्थक्षेत्री धर्मशाळा बांधून यात्रे करुंची तशा प्रकारे सेवा करु लागला काशी, हरिद्वार, बद्रीनाथ, केदारनाथ, वगैरे अनेक क्षेत्रावर जाऊन अन्नदान, वस्त्रदान, द्रव्य-दान करुन सदैव सत्पुरुषांची सेवा करुन त्यांच्या सत्संगात गढला गेला. त्याचे मन भगवान सदाशिवांच्या वियोगाने तळमळत होते. त्याला वसो येथे राहायला लक्ष लागत नव्हते.

आपल्या स्वामीची ही दशा पाहून रोहिणी त्याचे चरण धरुन म्हणाली, " प्राणनाथ, मला तुमचीच अभिलाषा आहे. स्वामी मी आता येथून आपला निरोप घेत आहे. मला आज्ञा द्या. एके समयीची ही पद्मरेखा अप्सरा या जन्मात रोहिणी रुपाने आली व पूर्वसंकेतानुसार आपल्याला येऊन मिळालो होती. माझा हा समय पूर्ण झाला म्हणून मला या जगात राहता येत नाही. म्हणून मला हास्यवदनाने निरोप द्या. जाता जाता रोहिणीने भाभारामला विनंती करुन सांगितले, "तुम्ही योगी आहात आणि योगीच राहणार. एके समयी या योग साधनेत चोविस वर्षे वाया गेले होते. तुमचीही तपश्चर्या व्यर्थ गेली होती ही हरलेली बाजू जिंकण्या करिता कटिबद्ध व्हा. वेळीच जागृत होऊन योगी बनून जगतास पावन करा. असे म्हणून तिने आपल्या पतीच्या मांडी-वर डोके टेकवून चिरविश्रांती घेतली. भाभारामास अतिशय दुःख

झाले. रोहिणी, तुझी अकळीत गती हा भाभाराम कधीही ओळखू शकला नाही. हा असह्य वियोग भाभा कधीही सोसू शकणार नाही. अशा प्रकारे शोक करीत भाभारामने रोहिणी हिच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार केले.

भाभाराम तिथयात्रेस जायला निघाला. तेव्हा त्याचा पुत्र शंकर साश्रुनयनाने समोर आला. तेव्हा भाभारामने त्याचे सांत्वन करुन, " ईश्वर तुला सदैव सुखात ठेवो. " असा आशिर्वाद दिला. त्याने आपल्या संपत्तीचा काही भाग आपल्या मुलाला देऊन आपली बहिण जीवीबाई हिच्या दोन्ही मुलांना प्रेमजी आणि हिरजी यांना वाटून दिली आणि स्वतः मुक्त झाला. गृहत्याग करुन भाभा राम देवाला आला. तेथे सुद्धा तो स्थिर होऊ शकला नाही. तेथून वनखंडीला आला. त्याचेच नाव चंपकवन असेही होते. तेथे तलावाच्या काठी भाभारामाने आपली योगसाधना सुरु केली. बारा वर्षे ओली पाने खाऊन व नंतर बारा वर्षे कोरडी पाने खाऊन निर्वाह केला, असे म्हणतात

अशा या योग्याच्या जीवनात एक अघटित घटना घडली. संत भाभारामची पूर्वभवाची जोवाभावाची एक बहीण नटपूर नाडियादहून दैवयोगाने भाभारामजवळून जात असताना भाभारामनें तिला कोणत्याही प्रकारचे अंतर न देता वागविले. कीकीबाईचे जन्मगाव आलिद्रा होते. तिला दोन मुले होतीं. ती विधवा होती. कीकीबाई खरोखर महासाध्वी वीदुषी आणि सद्-भक्त होती.

भाभाराम एकदा ध्यानमग्न असता काही योगी लोक जात असता त्याच्या आश्रमानजीक विश्रांती साठी थांबले. त्यातील एका योग्याने भाभारामला ओळखले, तो योगी दुसऱ्या योग्यांना सांगू

लागला. " अरे हा तर आपला इंद्रकील पर्वतावरील तपेश्वरी योगी, आपला चोविस वर्षांचा तपश्चर्येचा अपूर्ण राहिलेला कार्यभाग पूर्ण करण्याकरिता येथे राहिला आहे. असे म्हणून योगी अडबंग-नाथाने आपल्या सर्व साथीदारांना म्हणजे योगी जान्हवीदास, योगी सतानंदजी, योगी रसिकनाथ, वगैरे सर्व संघाला त्याचा पूर्वभव सांगून भाभारामला योगनिद्रेतून जागविले. संत भाभारामला सर्व सिद्ध पुरुष साथीदाराचे दर्शन होऊन फारच आनंद झाला. अतिशय उल्हासित अंतःकरणाने ते एकमेकांना भेटले. अनेक ज्ञानचर्चा झाल्या.

तीर्थाटनाला निघ लेले संत नायाजी पावन पर्यटन करीत चंपकवनात आले. भाभारामच्या स्थानी त्यांच्या जवळ येऊन योगी पुरुषाचे दर्शन घेतले. संत भाभारामांनी संत नायाजींचे चरित्र ऐकण्याची इच्छा प्रदर्शीत केली. आणि संत नायाजींनी आपले चरित्र भाभारामला एकविले ते म्हणाले, सद्‌गुरुंनी माझ्या पूर्वीच्या तीन जन्मांचे दर्शन करवून भगवंताच्या दिव्य स्वरुपाचे दर्शन घडविले व धन्य केले. त्यांनी या लुटारु नायाला नरातून नरोत्तम बनविले सद्‌गुरुंनी युगधर्माचे भान कर वले त्यायोगे मी जागृत झालो, भाभाराम म्हणाले 'नायाजी, आपणास ज्या सद्‌गुरु इमामशाहांचा समागम झाला त्या पावन पुरुषाच्या दर्शनाची अभिलाषा आहे. " नायाजी म्हणाले तुझी मनोकामना जरुर पूरी होईल असे म्हणतात तोच आपला परमसेवक हाजरबेग सह इमामशाहा महाराजांचा रथ तेथे दाखल झाला. अकल्पित रितीने तीनही योगीयांचा समागम झाल्याने सर्वांना अत्यानंद झाला. संत नायाने व संत भाभारामने सद्‌गुरुचरणी लोटांगण घातले दोघांना आपल्या हाताने उठवून इमामशाहांनी आपल्या हृदयाशी लावले

चरोतर विभागातील पेटलाद या गावी सुनिती आणि

निजानंद हे ब्राह्मण दांपत्य राहात होते. बरेच वर्षे पर्यन्त ते संतानरहित होते. ते संत सत्पुरुषांची नेहमी सेवा करीत. बऱ्याच दिवसांनी ब्राह्मणी गर्भवती राहिली. परंतु नऊ, दहा, महिने वर्षही होऊन गेले तरी ती प्रसूत होत नव्हती. अशा तऱ्हेने सात वर्षे निघून गेली. वैद्य, हकिम, देवभक्त, ऋषी वगैरे वर्व उपचार झाले पण व्यर्थ. शेवटी भाभारामकडे जाऊन त्यांनी आपली व्यथा सांगितली. भाभाराम म्हणाले, " हे बालक मनोहारिणी मायेपासून दूर जाण्याकरिता बाहेर येत नाही. येणाऱ्या बालकाला मुक्त ठेवण्याचो तुझी इच्छा असेल तर तो जरुर बाहेर येईल. ब्राह्मणीने दृढतेने उत्तर दिले, " महाराज, माझ्या उदरातून पुत्राचा जन्म झाला तर मी त्यास संत चरणी अर्पण करीन. " उभयता घरी येताच ब्राह्मणीला मुलगा झाला. तो मुक्त झाला म्हणून भाभा-रामने त्याचे नाव मुक्तीराम ठेवावयास सांगितले. यथावकाश उभयतांनी त्या बालकास संत चरणी अर्पण केले. भाभारामने आपल्या लाडक्या शिष्याला अनेक गुह्य गोष्टी उकलून सांगितल्या. शेवटी हे ही सांगितले की, मुक्तिराम, जोपर्यंत येथे साधुसंत सत्पुरुषांचे स्वागत सत्कार सेवा होईल, तोपर्यंत सर्व ऐश्वर्य नांदेल. त्यात खंड पडला तर हे सर्व ऐश्वर्य लयाला जाईल. यासाठी बेटा या धामाचे महत्व जाणून तू ही वहिवाट चालव. माझा तुला पूर्ण आशिर्वाद आहे.

संत गंगासिंह गोहिल, सती मेघावती, संत भोजराज, साध्वी कीकीबाई वगैरे सर्वांना प्रेमाचा संदेश देऊन व शुभ आशिर्वाद देऊन संत भाभाराम समाधीच्या तयारीला लागले. कीकीबाईला त्यांनी चंपकवनात आश्रम बांधावयास सांगितले कारण तेथेच तुझे ऋण होते म्हणून तेथेच तू कार्य कर. असा आशिर्वाद त्यांनी दिला.

संवत् १५८९ च्या भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या दिवशी सद्गुरु

भाभाराम स्वस्थ चित्ताने शिवालयात गेले आणि शांतचित्ताने आसन मांडले. मंदिराचा आतला दरवाजा बंद करुन ध्यानस्थ बसले. सकाळी एक प्रहर उलटल्यानंतरच मंदिराचा दरवाजा उघडण्याची सद्‌गुरु भाभारामची आज्ञा होती. एक प्रहर उलटल्या नंतर भोजराजजीने शिव मंदिराचा दरवाजा उघडला. सद्‌गुरु भाभाराम कोठेही दिसले नाही. शिवलिंग सुद्धा दिसत नव्हते. फक्त शिवलिंगाच्या जागी शाळुंकेत एक ज्योत झगमग जळत होती. ज्योतिस्वरुप सद्‌गुरु भाभारामला वंदन करुन जनता परत जाऊ लागली. ऋषीपंचमीच्या दिवशी भाभाराम अंतर्धान पावून ज्योति स्वरुप बनले.

सतपंथातील पाचवी भक्तीमती स्त्री : भक्तीमती साध्वी कीकीबाई :

वसोहून जवळच असलेल्या आंखिद्रा या गावी हरसुखभाई नावाचा पाटीदार पटेल आपल्या कुटुंबासह राहात होता. अंगणात येणाऱ्या जाणाऱ्या सताची ते सेवा करीत पण त्यांना संतान नव्हते. हे एकच दुःख त्यांना होते. एके दिवशी सिद्ध अडबंगनाथांचे आगमन त्यांचे घरी झाले. त्यांनी त्यांचा आदरसत्कार केला मणिबाच्या चेहऱ्यावरील दुःख पाहून त्यांनी तिला आपली व्यथा विचारली. व्यथेचे कारण समजताच त्यांनी हरसुखभाईंना सांगितले की, " बेटा हरसुख तुझ्या नशिबी पुत्रसुख नाही केवळ एक कन्या योग आहे पण ती तुझ्या एक्काहत्तर पिढ्यांचा उद्धार करील. यथावकाश महापुरुषाचा आशिर्वाद फळाला आला व वि. स. १५१९ च्या श्रावण शुद्ध शितला सप्तमीच्या मध्यरात्री कन्यारत्न झाले. कन्येचे नाव पुरोहितांनी " कीकीबाला " असे सांगितले

वयाच्या पाचव्या वर्षापासून कीकीबाई मंदिरात जाऊन

आरतीचा आनंद लुटी. साधुसंतांचा सत्कार करी. बारा वर्षाची झाली असता सद्‌गुरु अडबंगनाथाचे पुनरागमन झाले. संताने कीकीबाईला उपदेशाच्या अमृतमय वाणीचा वर्षाव करुन तिच्या हृदयाला पावन केले.

कीकीबाईला सोळा वर्षाची झाल्यावर नटपूर–नाडियाद येथील पटेल रुखडजींचा मुलगा मंडाण पटेल बरोबर तिचा विवाह झाला. पुढे भगवत्कृपेने ती दोन मुलांची माता झाली. तिच्या आयुष्यात अचानक अतिशय दुःखद घटना घडुन आली. तिचा पती अकस्मात आजारी पडून पथारीवश झाला. शेवटी कीकीबाईला आपल्या दोन मुलांचा चांगला सांभाळ करण्याचे वचन घेऊन मंडाण पटेलने रामराम म्हणून अंतिम श्वास घेतला. पती निधनानंतर तिला चौफेर भयानकता भासू लागली. त्यात दुष्काळाचे दिवस. एके दिवशी घरातील सर्व सामानाची आवराआवर करुन तिने नेमका सामान गाडीत भरला व आपल्या दोन्ही मुलांना गाडीत बसवून स्वतः गाडी हाकली. कित्येक वर्षानंतर तिने आलिद्राचा रस्ता धरला होता. मार्गात एके ठिकाणी मध्यान्ह समयी दोन्ही मुलांना तहान लागली असता तेथे दूरवर एक आड दिसला पाणी काढता काढता दोर मध्येच तुटून घडा आत पडला. तेव्हा एका विशाल वृक्षाखाली लहानशा कुटीरमध्ये एका तपेश्वरी महात्म्याकडे जाऊन आपली व्यथा सांगितली, ते संत भाभाराम होते. त्यांनी मुलांना थंड पाणी प्यायला दिले. त्यांनी ध्यानमग्न होवून कीकीबाईला ही आपली पूर्वभवाची बहिणच आहे असे ओळखले. त्यांनी तिला त्याच ठिकाणी वास्तव्य करण्यास सांगितले तो भाग चंपकवनाचा होता.

योगीभाभामराची स्थिती पाहून कीकीबाईच्या डोळयात

अश्रू उभे राहिले. तेव्हा भाभारामाने विचारले, बहिण कीकीबाई तू कां रडतेस ? तेव्हा ती म्हणाली, " महाराज, माझ्या हृदयात आपली ही दशा पाहून दुःख झाले. मन व्यग्र झाले मला रडण्याचे काही एक कारण नाही. तेव्हा योगी पुरुषाच्या अकळित गति-विषयी सद्‌गुरु भाभारामने कीकीबाईला यथार्थ रीतीने समजावले. अशा रीतीने सद्‌गुरु संगतीन कीकीबाईच्या हृदयात ज्ञान प्रकाश प्रकट झाला दिवसानुदिवस त्या धामावर साधुसंत योगी आणि अतिथिंची आवक वाढू लागली. कीकीबाई आपल्या परीने जेवढी शक्य असेल तेवढी सेवा चाकरी करु लागली संत भाभारामद्वारे तिची वैखरी वाणी प्रासादरुप बनू लागली.

संत सेवा करता करता कीकीबाई संत स्वरुपच बनून गेली. पारसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सुवर्ण होते तद्‌वतच कीकीबाईतसुद्धा दिव्य प्रभाव प्रगट होऊ लागला. संत भाभाराम सदैव ध्यानमग्न स्थितीत असत. त्याना प्रत्येक वेळी जागविणे योग्य नव्हते. नाना लोकांचे नाना प्रश्न. जेव्हा भाभाराम जागृत होऊन भानावर येत तेव्हा काकीबाई आपल्या हृदयाची होणारी स्थिती समजाऊन सांगी तेव्हा भाभारामने सांगितले, कीकीबाई, तू सुद्धा संताची बहिण आहेस. दुःखितांच्या दुःखाचे निदान करुन उपाय तूच सुचवायचा जो पर्यन्त मी ध्यानमग्न असेन तोपर्यन्त माझे हे कार्य तूच करावेस " संतांच्या या आदेशानुसार कीकीबाईत एक सबळ प्रेरणा जागृत झाली. व पुढे जनतेच्या साऱ्या दुःखाचे निवारण करणारी, त्यांच्या साऱ्या आशा आकांक्षांना पूर्ण करणारी प्रेरणा-ती बनली. दिवसभर अतिथी अभ्यागतांची संतांची सेवा व रात्री भगवत ध्यान अशा प्रकारचा तिचा नित्याचा कार्यक्रम होता ध्यान साधनाने ती सुद्धा योगीरुप होऊन खूपच उंच कक्षेला पोहचली होती.

कीकीबाईला भगवंताने मुक्तहस्ताने अप्रतिम सौंदर्य दिलेले होते. संताच्या आतिथ्य धामात अनेक प्रकारची माणसे येत. एके दिवशी एक भुला-भटक्या साधू आला. तो वेगळ्याच नजरेने कीकीबाईकडे पाहू लागला. हे लक्षात येताच कीकीबाईने त्याला ज्ञानामृत पाजून शुद्धीवर आणले तो साधू लीनतेन मातेच्या चरणावर पडून म्हणाला, " माते, मला क्षमा कर. माझा अपराध माफ कर. कीकीबाईने त्याला शांत केले. एकदा संत धामात संत मंडळी जेवत असतांनाच शे–दिडशे साधूंचा तांडा संत भाभा-रामच्या दर्शनास आला. मातेने त्याच पंक्तीत सर्वांना बसवून जेववून तृप्त केले. सर्वजण आश्चर्यचकित झाले. या मातेने एवढे पक्वान्न केव्हा केले असतील. कीकीबाईचे हातचे ते अमृतोपम अन्न खाऊन सर्व संतजन आपणास भाग्यवान मानू लागले.

एकदा योगी अडबंगनाथ, जान्हवीदास, सतानंदजी आणि रसिकनाथ हे चारही पुरुष जगतात पर्यटन करीत असता चंपक-वनात आले. योगी भाभारामच्या आश्रमात प्रवेश करताच कीकी बाई सामोरी गेली. अत्यंत विनम्र भावाने त्यांना तिने प्रणाम केला. सिद्ध पुरुष अडबंगनाथांनी तिचयाकडे सखोल दृष्टीने पाहिल्यावर त्यांना भूतकाळ आठवला योग्याने अनिमिष दृष्टीपात करताच कीकोबाई भानावर आली. याच गुरुदेवांनी संसाराची असारता बालपणात आपल्याला समजावली होती. कीकीबाई अडबंगनाथाच्या चरणी दंडवत पडली. त्या महापुरुषाने तिला उठविले व म्हटले, " उठ बाळ, ह्या जगात सेवेतच आपल्या जन्माचे कल्याण आहे. कीकीबाई स्वस्थ झाली. अन्य तीनही योग्यांच्या चरणी तिने लीनतेने प्रणाम केला. सर्व योगी व भाभा राम यांचा सत्संग घडला. त्यांनी एकत्र बसून अगम्य ज्ञान गोष्टींची चर्चा केली.

एकदा चंपकवनातून देवाकडे येत असता रस्त्यातच संत भाभाराम व संत नायार्जींचे मंगल मीलन झाले. ते त्यांना आपल्या आश्रमात घेऊन गेले. संत नायार्जींचे दर्शनाने कीकीबाईला आनंद झाला संत नायाजींच्या आगमनाबरोबर तिने मंगल गीत गाऊन त्यांचा स्वागत सत्कार केला संत नायाजींचा आणि संत भाभा-रामचा बराच वेळ वार्तालाप झाला. अत्यंत प्रेमाने उल्हासित झालेली दोघा बहिण–भावांची मने सद्‌गुरु दर्शनाकरिता अत्यंत आतुर झाली. नायाजीं म्हणाले तुमची ही इच्छा लवकरच सिद्ध होईल. असे म्हणत आहेत तोच आपला परमसेवक हाजरबेग या सह सद्‌गुरु इमामशाहाचा रथ तेथे दाखल झाला. सर्वांना मोठा आनंद झाला. सर्वांनी सद्‌गुरु चरणी लोटांगण घातले व त्यांच्याशी बऱ्याच विषयावर चर्चा केली, सत्संग केला. सद्‌गुरु इमामशहांनी त्या सद्‌भक्तांना परमेश्वराचे स्वरुप, त्यास प्रगट करण्याचा मार्ग योगज्ञान, आत्मज्ञान, ज्ञानोंत्तर जीवात्म्याकडून होणारे जगत् कल्याण, आत्मोन्नती वगैरे बाबतीत सात दिवसापर्यंत समजावून सांगितले. सात दिवसानंतर सद्‌गुरु इमामशाहांनी त्यांचा निरोप घेतला.

साध्वी कवियत्री कीकीबाईच्या जीवनात अनेक प्रसंग आलेले आहेत. एका व्यापाऱ्याच्या वेषाने आलेल्या भगवत्स्वरुपाचा अविस्मरणीय प्रसंग तिने आपल्याच शब्दात आलेखन केलेला आहे. एक वणझारा (व्यापारी) मालाच्या थैल्या घेऊन आला. भाभारामला झोप लागलेली होती. कीकीबाईने त्यास मधुर शब्दात ठणकाविले, भाई एवढया रात्री तुझे मालाचे पैसे कोण देईल ? " माताजी घेण्या देण्याचा हिशेब तर भाभारामशी आहे. त्याची तू फिकीर करु नकोस. असे म्हणून त्या गोण्या त्याने व्यवस्थित ठेवून दिल्या. आपले कार्य पूर्ण झाले असे पाहून तो

व्यापारी जाण्याकरीता निघाला. तेव्हा कीकीबाईने त्याजकडे पाहिले आणि ती चकितच झाली. त्वरेने तिने त्याचे पाय धरले. तेवढयात भाभाराम उठले व त्यांनी त्या महात्म्याचे चरणी मिठी मारली. तेव्हा तो महात्मा भाभारामला म्हणाला, अरे, अरे हे कांय आमच्या सारख्या वणझाराच्या चरणी एवढा महात्मा पडतो हे योग्य नाही. तेव्हा भाभाराम म्हणाले, " प्रभु आता हा मायेचा खेळ सोडून द्या, कारण की मी आपल्या साऱ्या गोष्टी जाणल्या आत्मियस्वजनांशी असे अलगपण ठेवू नका असे म्हणतच त्यांच्या डोळयातून अश्रूधारा वाहू लागल्या ते पाहून प्रेमळ प्रभूने त्यांना आपल्या हृदयाशी लावले. दोघ बहिण–भाऊ भगवंत स्वरुपाच्या चरणी पडले. आपला परमपावक वरदहस्त त्यांच्या शिरावर ठेवीत भगवान अंतर्धान पावले.

वि. स. १५९८ भाद्रपद शु॥ २ या दिवशी संत नायाजींनी महाप्रयाण केले. ह्याचा आघात संत भाभारामच्या हृदयावर झाला. त्यांनी त्या महापुरुषाबरोबर प्रयाण करण्याचे वचन दिलेले होते म्हणून त्यांनी प्रयाणाची तयारी सुरु केली. त्या समयी त्यांचा पट्टशिष्य मुक्तिराम व्याकूळ अंतःकरणाने आला परमप्रेमाने हृदयाशी लावून त्यांनी त्याचे सांत्वन केले. संत नायाजींचा शिष्य गगासिंह गोहिल तर रडतच संत भाभारामच्या चरणी पडला. त्याची अवस्था पाहून योगी म्हणाले, अशा समयी ज्ञानी मनुष्य धीर सोडून केव्हाही अश्रू ढाळीत नाही. म्हणून बाळा शांत हो आता कीकीबाईने सद्‌गुरु चरणावर मस्तक ठेवले. आपल्या बहिणीच्या हृदयाची व्यथा पाहून भाभाराम सद्‌गदित झाले ते म्हणाले, " किकीबाई तू ज्या रुपाचे दर्शन करतेस असेच धाम चंपक वनात जाऊन कर. कारण तेथे तुझे ऋण आहे. म्हणून मी तुला सांगतो, देवात मोहू नकोस. चंपक वनात तुला सर्वकाही

मिळेल. वि. स. १५८९ च्या भाद्रपद महिन्यात शु।। ५ च्या दिवशी गुरु भाभारामचे महाप्रयाण झाले. दुसऱ्या दिवशी कोकीबाई सद्गुरुच्या आदेशानुसार चंपकवनात जाण्यास निघाली. परंतु तिला पाऊल उचलत नव्हते तेव्हा भाभारामने तिला दर्शन दिले. आता तिच्या चित्तात अवसान आले होते. हळूहळू ती चंपक वनात जाऊन पोहचली.

सद्गुरुंनी स्थान दर्शविले त्या स्थळावर मंदिर बांधले गेले. त्यांच्या संस्थापनविधीचा समय आला त्यावेळी कोकीबाई दीनतेने गुरुच्या ध्यानाकरिता बसून प्रार्थना करु लागली. " गुरुदेव आपण ज्योतिस्वरुपात स्थित आहात आणि आपणास आता ज्योतिस्वरुपाने प्रकट व्हावे लागेल. भाभाराम स्वयं ज्योतिस्वरुपात प्रकट झाले. सर्व सद्भक्तांच्या जयघोषाने वातावरण निनादित झाले. सद्गुरु भाभारामनंतर कोकीबाईने १२ वर्षे पर्यंत गुरुधाम चालविले कार्तिकी पौर्णिमा, वसंत पंचमी, धुलीवंदन गुढीपाडवा अक्षयतृतीया, जन्माष्टमी, ऋषीपंचमी, विजयादशमी, शरद पौर्णिमा आणि दिपावलीच्या दिवसात भंडारा होऊन साधुसंतांच्या प्रसादाची व्यवस्था होत असे शेकडो हजारो मानव तृप्त होऊन जात

दिवाळीसारख्या आनंदाच्या दिवशीसुद्धा कोकीबाईच्या हृदयात वियोगाची दारुण व्यथा जागत असे ऋषिपंचमीच्या दिवशी तर विरहानलाचे संतप्त आश्रूंनी ती सद्गुरु महाराजांच्या चरणपादुका भिजवून टाकी वि. स. १९५१ च्या ऋषिपंचमीच्या दिवशी मंगल सूर्योदयाच्या वेळी तर विरहानल अगदी असह्य होऊन ती मंदिरात आली आणि गुरुमहाराजांना म्हणाली, " गुरुदेव मला यायचे आहे. मला बोलवायला पाठवा तिच्या हृदयातील संताप जाणून संत भाभाराम म्हणाले, किकीबाई भावनावश होऊन संताप करु

नकोस. मनास आवर. तू ज्ञानी आहेस. ईश्वराच्या इच्छेशिवाय काहीच होत नाही. तुला अजून दहा वर्षे जगायचे आहे तरी तू चिंता करु नकोस. शांत हो. सद्गुरु विरहव्यथा त्यांच्या उपदेशाने कायमची दूर झाली. दहा वर्षाचा काळ भराभर निघून गेला

देवाहून रूणाला येण्यास बारा वर्षं पूर्ण झाली. हृदयातील. विरह व्यथा शांत झाली होती. सूर्योदयाच्या आधी प्रहरभर रात्रीला म्हणजे ब्रह्ममुहुर्ताला उठून स्नानादिक कर्मातून निवृत्त होऊन कीकीबाई सेवा पूजा करण्यास तत्पर होई. सद्गुरुंच्या धामात जाऊन ती दीनतेने याचना करु लागली, " सद्गुरुदेव आता तर वेळ पूर्ण झाला. मला आपल्या पावन चरणावर स्थान द्या. असे म्हणून संत चरणावर झुकून पडली. सोनेरी सूर्योदय झाला. लोक संतधामात आले. पाहिले तो संत भाभारामच्या चरणावर कीकीबाई दंडवत प्रणाम करीत झुकलेली दिसली. त्यांनी तिला जागविण्याचा प्रयत्न केला. पण संत चरणी तिने खरोखरच पूर्णविराम घेतलेला होता. वि. स १६०१ च्या भाद्रपद शु।। ५ म्हणजे ऋषीपंचमीच्याच दिवशी मंगल प्रभातीच तीने या लोका मधून अंतिम प्रयाण केले.

सत्पंथातील सहावे सत्पुरुष : संत शाणाकाका महाराज :

सत्पंथाच्या मालिकेतील सद्भक्त संत शाणाजी हे होत. गुजराथमधील लेवा पाटीदार जातीत त्यांचा जन्म झाला. बालपणातच धार्मिक संस्कार त्यांचेवर झालेले असल्याने तारुण्यात पदार्पण करताच आपले सर्व जीवन संसार-विन्मुख होऊन संत महात्मा, सत्पुरुषाच्या सेवेत वाहून घेतले. संत इमामशहा महाराजांच्या नित्य सान्निध्यामुळे व त्यांच्या अनुग्रहाने त्यास ईश्वर स्वरुपाच्या ध्यानस्वरुप स्मरण चिंतनाचे ज्ञान होऊन आत्म

Shana Kaka was Leva Patidar

साक्षात्कार झाला. संत भाभाराम, संत नायाजी, साध्वी कीकीबाई यांच्या सान्निध्यात आल्यावर त्या नररत्नास अधिक तेज चढले. इमामशहांचा परमसेवक हाजरबेग व शाणाजी यांची वारंवार ज्ञानचर्चा होई.

सद्गुरु इमामशाहांच्या संपर्कात आणल्यानंतर नाया लुटारुत झालेले परिवर्तन व त्यास झालेले योगज्ञान याचा प्रभाव शाणाजी वर झालेला होता कारण ह्या घटना त्याने आपल्या डोळ्याने पाहिलेल्या होत्या. त्यामुळे सद्गुरुंचा प्रभाव तो जाणून होता मधून मधून या सर्व योगियांचे निरनिराळ्या ठिकाणी मिलन, सत्संग, ज्ञान चर्चा होत असे. त्या प्रत्येक वेळी सद्भक्त शाणाजी सद्गुरु महाराजांच्या सोबत असे. एकदा कुकस येथे संत नायाजींच्या आश्रमात सद्गुरु इमामशाह महाराजांचा मुक्काम होता. त्यांच्या सोबत हाजरबेग व शाणाजी सुद्धा होते. आणि योगायोगाने संत भाभाराम व साध्वी कीकीबाई हे सुद्धा त्या ठिकाणी येऊन मिळाले. सद्गुरु इमामशाहासोबत त्यांचा शिष्य शाणाजीला पाहून भाभारामला अपार आनंद झाला. ते म्हणाले, " शाणाजी, आपण सद्गुरुंशी अनन्य प्रिति जोडलेली आहे. अशी प्रेमलगनी लावणारांची धन्यता होय. " शाणाजी म्हणाले, " भाभाराम, सद्गुरुंची गति समजून येत नाही परंतू जो सद्गुरुंचा होऊन राहतो तोच सद्गुरुंना जाणू शकतो. भाभाराम आपण तर योगी पुरूष आहात. जनहिताकरिता अवतार धारण केलेला आहे. मी एक तर केवळ सद्गुरु चरणी शांत चित्ताने बसून राहणारा अल्पजीवात्मा आहे. या बिकट भवसागरातून माझी जीवननौका पार नेणारा गुरुशिवाय अन्य कोणीही नाही.

संत सद्गुरु इमामशाहा जेव्हा अंतर्धान होण्याचा विचार करु

लागले तेव्हा सर्व सद्‌भक्तगणांच्या समक्ष त्यांनी आपल्या धामाचा उत्तराधिकारी म्हणून शाणाजींची नियुक्ती करुन आपल्या हातांनी त्यास गादीवर बसविले. आणि सर्व वहिवाट कारभार त्यांच्या स्वाधीन करुन आपण स्वतः निवृत्त झाले. नंतर त्यांनी समाधी घेतली सद्‌गुरु इमामशाहांनी आपल्या कुळातील-वंशातील स्वजनांना गादीचा अधिकारी न नेमता केवळ हिंदुलाच आपला वारसदार म्हणून सर्वाधिकारी बनविले. सद्‌गुरु इमामशाहांनी आपली प्रतिज्ञा मात्र यथार्थ केली. शाणाजी गुरु महाराजांना म्हणतात, " गुरुदेव मी तर आपला गुलाम आहे. दास आहे. रात्रंदिवस आपल्या सेवे-वाचून मला काही नको. आपणच नाही का मला शिकविले. ? धन, दौलत, संपत्ती, वैभव मान हे सर्व ईश्वरभक्तीपासून परावृत्त करणारे आहे. माझ्याकडून हे अधिकार काढून घ्या. दुःख आणि शोकाने व्याकुळ झालेला शाणाजी एका रात्रीस आपल्या सद्‌गुरुंच्या समाधीजवळ बसून डोळ्यातून अश्रू ढाळीत आपल्या हृदयातील व्यथा सांगू लागला एकाएकी त्यास सद्‌गुरुंची अगम्य वाणी ऐकू येऊ लागली. " शाणाजी, तू घाबरु नकोस. सदासर्वकाळ मी तुझ्याजवळच आहे. चिंता करु नको. तुझी जबाबदारी पूर्ण कर. आता शाणाजी शांतीने दिवस व्यतित करु लागले. एके दिवशी विरोधी लोक त्यांना मारण्यासाठी धावून आले. पण अभय दिल्याप्रमाणे सद्‌गुरुंनी त्यांचे रक्षण केले.

Imamshah was buried

सद्‌गुरु इमामशाह महाराज, संत नाथाकाका, संत भाभाराम यांनी समाधी घेतल्यानंतर सद्‌भक्त हाजरबेगही अंतर्धान झाले होते. आता फक्त आपले मन मोकळे करण्यास एकच स्थान होते ते म्हणजे साध्वी कीकीबाईचे रुण. मधून मधून तेथे जाऊन त्या विदुषी जवळ ज्ञानचर्चा, सत्संग करीत तिचे विचार व मार्गदर्शन ऐकून

घेत. एकदा साध्वी कीकीबाईजवळ त्यांनी एक पावन प्रसंग वर्णन करुन सांगितला. एके दिवशी झोप लागत नव्हती म्हणून उठून बाहेर चौकात आलो. पाहतो तो सद्‌गुरु इमामशाह महाराज, संत भाभाराम, सदभक्त नायाकाका हे तीनही महापुरुष एकत्र सत्संग चर्चा करीत आहेत. जवळ त्यांचा परमभक्त हाजरबेगही होता अशा मंगल समयी कोण जाणे कोठून आणि कशा रीतीने जंगशाह नावाचा एक फकीर तेथे आला ते समजले नाही. पण त्यांच्या जवळ जाऊन झुकून प्रणाम करुन म्हणाला, आज तिघही एकत्र येऊन बसले आहात पण तुम्हा तिघात कोण प्रभाव दाखवतो ते पहायचे आहे. साईला केवळ एकच आशा होती आणि ती म्हणजे वारंवार नश्वर जगतात येणे जाणे घडू नये हीच होय. आवागमनाचा फेरा मिटावा हीच याचना आहे.

जंगशाह फकीर होता पण हिंदु संत साधूत खूप फिरलेला असल्याने तो अवागमनाच्या गोष्टी करीत होता. सद्‌गुरु इमामशाह प्रतिज्ञेमुळे काही करु शकत नव्हते तरी पण त्यांनी एक हात लांब करुन त्यास माळा दिली. नंतर नायाजीने त्याला कानात महामंत्राचा उपदेश दिला आणि भाभारामने आपला वरदहस्त स्थापन केला. तद्‌नंतर जंगशाह तेथेच माळा जपत शांत चित्ताने बसला. तीन प्रहर रात्रीनंतर ते तिघे महापुरूष अंतर्धान पावले जंगशाह मात्र तेथेच होता. तो सात दिवस तेथे होता आठव्या दिवशी ध्यान सोडून तो आसनावर उठून उभा राहिला. नंतर मात्र तो कोठे गेला हे समजलेच नाही. असा पावन प्रसंग कीकी बाईस सांगून रूणहून शाणाकाका पोराणाच्या मार्गास लागला.

भक्त शाणाजीला सतावण्याकरिता आलेला बादशाह शांत चित्ताने त्याच्या चरणी झुकून परत गेला. या महापुरूषाच्या

अंतर्धान विषयीची नोंद अशी आढळते.

शाणाजी पडदे हुआ, ता दिनका कहु बयान ।
अगली रेन गुरुदेवजी, दरशे कृपा निधान ।।
गुरुजी मे आवत चहु, अब तो तुमारो पास ।
चरण कमलमे रखो, मैं हू तुम्हारा दास ।।
शाणा सदा मेरा रहा, मोसे रहा न दूर ।
मेरा सोही मेरा बने, मोसे रहे हजूर ।।

अशा रीतीने शाणाजीने आत्यंतिक इच्छा प्रदर्शित करुन सद्‌गुरु चरणी तो विराम पावला. असा हा निराभिमानी संत सर्वांना सांगत असे की, माझ्यात काहोच नाही. मी तर सद्‌गुरुंचा सेवक आहे. सर्व करूणा आणि लीला सद्‌गुरुंची आहे.

: समारोप :

एखाद्या राजमंदिरात अनेक द्वारे असावीत किंवा एखाद्या भव्य वृक्षास अनेक शाखा, उपशाखा असाव्यात त्याप्रमाणे हिंदुस्थानातील हिंदुधर्मासारख्या प्रचंड धर्मात अनेक धर्मपंथ निर्माण झालेत कोणताही धर्म घेतला तरी त्यात भिन्न भिन्न असे धर्मपंथ निर्माण व्हायचेच. भारतात जे अनेक संप्रदाय निर्माण झाले त्याला वर्णाश्रम धर्मव्यवस्था विस्कळीत होणे हे एक कारण आहे. मानवी आचार धर्मातील प्रमाद महात्मा पुरुष काढून त्यांचे जीवन उन्नत करण्यासाठी प्रयत्न करतात. त्यांच्या या प्रयत्नासच पुढे संप्रदायाचे स्वरुप येते. म्हणून सर्व संप्रदाय हे एकाच झाडाला फुटलेल्या शाखा प्रशाखा आहेत व झाडाचे मूळ सनातन वैदिक धर्मच होय.

आज जगात बरेच धर्मपंथ, संप्रदाय प्रचलित आहेत. सनातन धर्म, बौद्ध. जैन, इस्लाम, कॅथालिक, यहुदी वगैरे अनेकानेक धर्म, वैष्णव. शैव, शाकल्य, ब्राह्म, वगैरे अनेक देवतांच्या उपासनेवरुन ते ते पंथ निर्माण झाले. त्या प्रत्येक पंथामधून अनेकानेक उपपंथ निर्माण झाले, वारकरी, नाथ महानुभव, स्वामिनारायण, प्रणामी असे पंथ निर्माण झाले. "सत्पंथ" हा त्यातलाच एक विशेषत्वाने वेगळे स्वरुप धारण केलेला संप्रदाय आहे.

भागवत धर्मातील वैष्णव मार्गाची उपासना करावयास शिकविणारा हा संप्रदाय आहे. सत्पंथ संप्रदायाचे प्रवर्तक सत्पंथाच्या निर्मितीविषयी माहिती देतांना सांगतात की, हा सत्पंथ आजकालचा किंवा शे-पाचशे हजार वर्षाचा नसून अनादि काळापासूनचा आहे. मी नवीन काहीही सांगितलेले नसून मूळ सनातन युगधर्माला उजाळा दिलेला आहे.

सत्पंथ संप्रदायाचे संस्थापक " सद्गुरु इमामशाह " हे होत. ते स्वतः जरी मुसलमान होते, तरी हिंदूंचे पुरस्कर्ते होते. सद्गुरु इमामशाह महाराजांनी सत्पंथ ह्या सनातन वैदिक धर्माचेच व मुक्तिमार्गाचेच दिग्दर्शन केलेले आहे. सत्पंथाचे मूळ स्थान–जन्मस्थान सत् [निर्गुण निराकार परब्रह्म स्वरूप] होय. या सत्च्या आधारानेच हे अखिल विश्व ब्रह्मांड उभारले गेले. सत् हे त्रिकालाबाधित निरुपमेय एकमेवाद्वितीय ब्रह्म होय.

सत्पंथात घटपाट कलश पूजा विधी हा भाग महत्वाचा मानला जातो. युगधर्मानुसार सद्गुरु इमामशाहांनी अथर्ववेदाला प्राधान्य दिलेले आहे घटपाट कलश पूजाविधी मंत्र हे अथर्ववेदाच्या अनुरोधाने तयार केलेले आहेत. असा उल्लेख सत्पंथ साहित्यात आढळतो. अथर्ववेद व त्यांच्या उपनिषदांना आधारभूत मानून सद्गुरु इमामशाहांनी हा सत्पंथ दिग्दर्शित केलेला आहे.

सद्गुरु इमामशाहांनी दिग्दर्शित केलेल्या सत्पंथ मार्गात " नीतिशतक " [शंभर नियमांची] आचार संहिता दिलेली आहे. त्याप्रमाणेच सत्पंथीयांचे आचरण व्हायला हवे असे ते सांगतात.

सत्पंथ संप्रदाय आणि वारकरी, महानुभाव व सुफी संप्रदाय यातील साम्य :–

तत्वज्ञान–कर्म, सत्व, रज, तमस हे त्रिगुण जगतातील संपूर्ण वस्तूमात्रात कमी अधिक प्रमाणात विद्यमान आहेत. असे सत्पंथ संप्रदायात सांगितलेले आहे. वारकरी आणि महानुभाव आणि सुफी ह्या पंथातही या त्रिगुण तत्वांचे महत्व आहेच. यम आणि नियमांचे पालन करणे. यम म्हणजे अहिंसा, सत्य, अस्तेय,

ब्रह्मचर्य, अपरिग्रह आणि नियम म्हणजे शौच, संतोष, तप स्वाध्याय व ईश्वर प्रणिधान या दहाही नियमांचे सत्पथ, वारकरी महानुभाव व सुफी संप्रदायात वर्णन केलेले आहे. " वैराग्याचे " महत्व या चारही संप्रदायात आहे.

आचारधर्म– शरीरशुद्धीला महत्व, कामक्रोधादि विकारांना आटोक्यात आणणे महत्वाचे आहे. क्षुधितास-भुकेलेल्यास भोजन. दानधर्म करणे, शारीरिक शुद्धता, मानसिक पावित्र्य, आत्मिक उन्नती व श्रेयप्राप्ती इत्यादि आचारधर्मांमुळे ईश्वर प्राप्ती होणे सहज शक्य होते आणि सत्पंथ वारकरी, महानुभाव व सुफी संप्रदायातही ह्याचे महत्व सांगितलेले आहे. सत्पंथाचे अनुयायी सर्व हिंदुच आहेत आणि त्यांची आचारसंहिता संपूर्ण हिंदुधर्ममार्गा प्रमाणेच आहे.

आधारभूत ग्रंथ– सत्पंथ हा भागवत धर्मातील वैष्णव मार्गाची उपासना करावयास शिकविणारा आहे. वारकरी संप्रदायातही ज्ञानेश्वर व नंतर होऊन गेलेल्या संतांनी गीता भागवता सारख्या भक्तिधर्माचा पुरस्कार करणाऱ्या ग्रंथाचे विवरण केलेले आहे. गीतेतील तत्वज्ञान हे मूळ उपनिषदातील तत्वज्ञान आहे. सद्गुरु इमामशाहांनीदेखील सत्पंथाचे दिग्दर्शन [अथर्ववेद] उपनिषदाना आधारभूत मानूनच केलेले आहे. महानुभावांच्या सिद्धान्तसुत्रातही उपनिषदे, गीता इ. शास्त्रांचे सार असल्याचे दिसून येते.

अवतार कल्पना– जीवोद्धारासाठी परमेश्वर अवतार घेतो ही श्रद्धा महानुभाव पंथाच्या भक्तिमार्गाचा आधार आहे महानुभव पंथात कर्मसिद्धान्त व अवतारवाद हे वैदिक परंपरेतील स्वीकारले आहेत हीच कल्पना वारकरी व सत्पंथातही आहे.

भक्तिमहात्म आणि गुरु महात्म्य : ज्ञान, ध्यान, भक्ति, कर्म, नामस्मरण, जप, पूजा, इ. चे सत्पंथ, वारकरी, महानुभाव व सुफी संप्रदायातही महत्व आहे. वारकरी व सुफी हे संप्रदाय अद्वैती आहे. तर महानुभाव व सत्पंथ हे द्वैती आहेत.

गुरुभक्तीचे सुफी पंथात अतिशय महत्व आहे. तसेच गुरु महात्म्य हे वारकरी, महानुभाव व सत्पंथातही वर्णिलेले आहे. शिष्यपरंपरा या चारही संप्रदायामध्ये आहे. वरील विवेचनातील सत्पंथाशी असलेले साम्य पाहता सत्पंथ संप्रदाय हा विशेष प्रसिद्धीस आलेला दिसून येत नाही. तो मागे कां पडला ? त्याचा प्रचार कां झाला नाही ? त्याची कारणे खालील प्रमाणे –

सत्पंथ हा अनादि कालापासून प्रचलित असलेला, युग धर्मानुसार बाह्य स्वरुपात बदल झालेला, पण अंतरंगरुपाने मूळ सनातन वैदिक धर्माचाच एक भाग आहे. सत्पंथात निर्गुण, निराकाराची उपासना, प्रणवब्रह्माचे स्मरण, चिंतन, ज्योति स्वरुप भगवंताचे ध्यान, कलश घटपाटाची उपासना, दशावतारांची उपासना, शुक्रवार चंद्रदर्शनाचे व्रत, उपवास करणे. भूमिदान देणे वगैरे अनेक प्रथांचे मूलतः समालोचन न झास्याने व विधर्मी लोकांनी सत्पंथ संप्रदायाच्या अनुयायांवर केलेल्या अत्याचाराने या संप्रदायाचा पाहिजे तसा प्रचार होऊ शकला नाही.

केवळ इमामशाह प्रणित मार्गाचे सत्पंथ उपासक आचरण करतात म्हणून तथाकथीत हिंदुधर्मीयांनी त्यांची अवहेलना केली. त्यांना बाटलेले मुसलमान समजून त्यांची विटंबना केली. अर्ध दग्ध धर्म पाळतात, विधर्मीयांच्या धर्मांचे अवलंबन करतात असे समजून त्यांना अतोनात छळले, वाळीत टाकले, त्यांच्याशी

रोटी–बेटी व्यवहार बंद केला आणि सर्वांत महत्वाचे कारण म्हणजे सत्पंथाचे वाङमय हे गुजराथीतून असल्यामुळे ते सामान्य जनापर्यन्त पोहचू शकले नाही. आता मात्र फंजपूरच्या सत्पंथी मंदिराचे गुरु महाराज प. पु. जगन्नाथ महाराज यांनी गुजराथीतील वाङमयाचे मराठीतून भाषांतर केले आहे. त्यामुळे सत्पंथाचा प्रचार आणि प्रसार व्हायला निश्चितच उपयोग होईल.



: परिशिष्ट :

सत्पंथाचे मुख्य तीर्थक्षेत्र पीराणा येथे एक लोखंडी बेडी असून त्याद्वारा लोक आपल्या भविष्यातील गूढ प्रश्नांची उत्तरे मिळवित असतात. गंगाकुआ ही प्रसिद्ध विहीर आहे. ही सद्गुरु इमामशाहांच्या समाधिस्थानाच्या पूर्व बाजूस कंपाऊंडला लागून आहे. तसेच भाभाराम व कोकीबाई यांचे धर्मक्षेत्र प्रसिद्ध आहे. भाभारामचे ठिकाण खेडा जिल्ह्यातील " देवा " या गावी तर कोकीबाईचे त्यापासून दोन मैलावर असलेले " रूण " या गावी आहे. नायाकाकांचे " कुकस " हे धर्मस्थान प्रसिद्ध आहे फैजपूर सत्पंथ मंदिर हे प्रसिद्ध ठिकाण आहे. याखेरीज सत्पंथ संप्रदाया ची अन्य धर्मस्थळे अनेक आहेत. ती खालीलप्रमाणे –

Bedi is a tool to fool people by which blind faith is encouraged

गुजराथ मध्ये कानम जिल्ह्यातील आवाखल, पीसाई, खंबात येथील बालेशाहांचे मंदिर सौराष्ट्रातील भावनगर येथील सत्पंथी मंदिर, सुरत येथे बोडामुखी सत्पंथी मंदिर, कानबाई सत्पंथ मंदिर, उखामुखी सत्पंथ मंदीर, बारभाई सत्पंथी मंदिर इच्छाराममुखी सत्पंथी मंदिर, इंदरपुरा सत्पंथी मंदिर वगैरे मंदिरे आहेत. डुमस, भीमपूर भाटपूर, भाटा, अठवा, कादोपोर, निमराई. बमरोली, उभरात,वगैरे गावोगावी ही मंदिरे आहेत. कच्छमध्ये अंगीया, खिडोई, कोटडा, मांडवी वगैरे ठिकाणी मुख्य व अन्य गावोगावी सत्पंथी मंदिरे आहेत. त्याशिवाय साबरकाठा जिल्ह्यात ज्या ठिकाणी कच्छीकडवा पटेल सत्पंथी बांधव शेती व्यवसाय करण्यासाठी वसलेले आहेत त्या त्या प्रत्येक ठिकाणी सत्पंथी मंदिरे आहेत. मध्यप्रदेशातील बऱ्हाणपूर, खंडवा, निमाड जिल्हा, खरगोन, राजपिपला व नर्मदाकाठावरील अनेक गावी सत्पंथी मंदिरे आहेत. महाराष्ट्रात धानोरा, अमळनेर, आकोट,

These are all small places of worship, generally ordinary temples for benefit of local people

सुरजीअंजन वगैरे गावी तसेच चोपडा, शिरपूर, धुळे, नंदुरबार, यावल, रावेर, भुसावळ या तालुक्यातील सत्पंथी मंदिरे, पुजाघरे देवघरे आहेत त्या प्रत्येक ठिकाणी सद्गुरु इमामशाह प्रणित सत्पंथ घटपाट विधियुक्त पूजा अर्चा, आरती, ध्यान, सेवा, सत्संग वगैरे कार्यक्रम चालू असतात.

फैजपूर येथील सत्पंथी मंदीर :

पूर्व खान्देश म्हणजेच जळगाव जिल्ह्यात फैजपूर येथे सत्पंथ संप्रदायाचे एक विस्तृत बांधकाम केलेले दोन मजली धर्मस्थान " श्री सत्पंथी मंदिर " आहे. त्या ठिकाणी मंदिराच्या ईशान्य कोपऱ्यात धर्मध्वजा आहे. हे स्थान जवळ जवळ ३०० वर्षापासून फैजपूरला आहे. सुमारे १०० वर्षापूर्वी येथे धर्मध्वजवर आकाशातून शुभ्र व सुगंधी फुलांची पुष्पवृष्टी झाली होती. जुने लोक सांगतात की, त्या फुलांना अलौकि सुगंध होता आणि तेथून एका महापुरुषाची स्वारी अदृष्य रुपाने जात असल्याने ती पुष्प-वृष्टी झाली होती. आजही हे ठिकाण लोकांच्या श्रद्धेचे, भक्ति भावाचे एक पवित्र स्थान म्हणून भरभराटीत आहे. हल्ली या वास्तूचा बराच जिर्णोद्धार झालेला आहे. एक आदर्श प्रेक्षणिय स्थळ म्हणून या परिसरात त्याचा नावलौकिक आहे.

गुढीपाडव्याच्या दिवशी निशाण–ध्वज अर्पण करणे, संतती प्राप्तीसाठी नवस करुन त्यानुसार बालकाचे जाऊळ उतरविणे [प्रथम केश खंडण करणे] अखंड घृतज्योतिसाठी तूप अर्पण करणे वगैरे अनेक प्रकारच्या बाधा मानता या मंदिरात उतरविल्या जातात.

पीराण्यास ज्याप्रमाणे शकुनावली पाहण्यासाठी बेडीची

प्रथा आहे तशा प्रकारची शकुनावली पाहण्याची प्रथा फैजपूर येथील सत्पंथी मंदिरात प्रश्नावली आहे. त्या प्रश्नावलीस नंदिकेश्वर प्रश्नावली म्हणतात. फार जुन्या काळापासून ही प्रश्नावली असून अभिमंत्रित फाशावरुन विचारलेल्या प्रश्नाचे अचूक उत्तर त्यावरुन मिळते.

या मंदिराचे हल्लीचे गुरुमहाराज प. पु. जगन्नाथ महाराज हे आहेत. त्यांची ही अकरावी पिढी चालू आहे. गुरु महाराज स्वतः शिकलेले असून तो कलावंतसुद्धा आहेत. गुरु महाराजांनी मंदिराच्या आतील भिंतीवर अतिशय सुंदर अशी चित्रे रंगविलेली असून काही वचने देखील लिहिलेली आहेत. मंदिर अतिशय प्रसन्न आहे. मंदिरात जाण्याआधि पाय धुवावे लागतात व तशी सोय तेथे केलेली आहे. गुरु महाराज नुसते बुवाबाजी करणार बुवा नाहीत तर ते उत्तमप्रकारे शेतीही करतात. आणि मंदिराच्या सौंदर्यात नित्यनियमितपणे भर घालीत असतात. भक्तांच्या शंकांचे ते उत्तमप्रकारे निरसन करतात.

List of books

: संदर्भ सूची :

अ. नं.	सूची	लेखक / प्रकाशक
१)	अमृतवाणी	श्री. जगन्नाथजी महाराज, फैजपूर
२)	गुरुवंदना	श्री. जगन्नाथजी महाराज, फैजपूर
३)	मनहर ज्ञान	श्री. पुरुषोत्तमजी महाराज, फैजपूर
४)	महात्मा सद्गुरु श्री. इमामशाह महाराज	श्री. पुरुषोत्तमजी महाराज, फैजपूर
५)	मराठी साहित्याचे आदिबंध	उषा माधव देशमुख
६)	नित्यपाठ व शिक्षापत्री	श्री. जगन्नाथजी महाराज, फैजपूर
७)	वारकरी संप्रदाय उदय व विकास	भा. पं. बहिरट व प. ज्ञा. भालेराव
८)	सूफी संप्रदाय तत्वज्ञान आणि कार्य	सेतु माधवराव पगडी
९)	श्री सत्पंथ नवनीत	श्री. जगन्नाथजी महाराज, फैजपूर
१०)	श्री सत्पंथ ज्ञान पदसंग्रह	श्री. जगन्नाथजी महाराज, फैजपूर
११)	श्री सत्पंथ घटपाट पूजा विधी यज्ञ	श्री. जगन्नाथजी महाराज, फैजपूर

realpatidar.com

प्रकाशित झालेले सत्पंथ साहित्य –

१)	श्री सद्गुरु इमामशाह महाराज जीवनवृत्तान्त (मराठी)	५–००
	(गुजराथी आवृत्ती)	१५–००
२)	श्री सत्पंथ ज्ञानपद संग्रह (भजनावली) मराठी गुरुवाणी, योगवाणी, आगमवाणी, उपदेशवाणी.	७–००
३)	मनहर ज्ञान (मराठी भावार्थासह)	४–००
४)	अमृतवाणी – दोहावली (मराठी भावार्थासह)	२–५०
५)	शिक्षापत्री आणि नित्यपाठ	
	गुजराथी आवृत्ती	५–००
	मराठी आवृत्ती, प्रसिद्धीच्या मार्गावर	
६)	गुरुवंदना (मराठी गुजराथी हिंदी पदे व थाळ)	३–००
७)	श्री सतपंथ घटपाट पूजा विधी मंत्र. मराठी	१५–००
	गुजराथी	१५–००
८)	श्री सतपंथ नवनीत (मराठी)	३०–००
९)	श्रीमद् दशावतार (मराठी व गुजराथी) प्रसिद्धीच्या मार्गावर	
१०)	श्री सतपंथ संप्रदाय–स्वरुप व कार्य	१६–००

प्रकाशित्त होणारे आगामी साहित्य –

१) मुनिवर चेतावणी २) ऋषिवर चेतावणी
३) संतवाणी ४) मुळबंध

मिळण्याचे ठिकाण –

श्री सत्पंथी मंदिर, फैजपूर
ता. यावल जि जळगांव